रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक १४८ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल
रायगड, बुधवार, दि. ५ नोव्हेंबर २०२५
किंमत ४ ₹

## इस्लामपूर आता ईश्वरपूर

**सांगली :** सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर शहराचे नाव आता अधिकृतपणे ईश्वरपूर असे करण्यात आले आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही माहिती दिली असून, केंद्र सरकारच्या मंजुरीनंतर राज्य शासनाने याबाबतची अधिसूचना जारी केली आहे. बावनकुळे यांनी सांगितले की, मंगळवारी गृहमंत्रालय आणि महाराष्ट्र शासनाने अधिसूचना जाहीर केली. त्यानंतर इस्लामपूरचे नाव ईश्वरपूर करण्यात आलं. राज्य सरकारने शिफारस केल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अखत्यारीतील मंत्रालयाने प्रस्तावाला मंजुरी दिली. शहरासोबतच, इस्लामपूर नगरपरिषदेचे नावही बदलून ईश्वरपूर नगरपरिषद असे करण्यात आले आहे.

निसर्ग हॉलिडेज्, अलिबाग
थायलँड पटाया १६/११/२५, २६/११/२५, ३०/११/२५ ४ स्टार हॉटेल ४ रात्र/पाच दिवस विजा फ्री ₹45000/-
दिल्ली, आग्रा, अमृतसर, वैष्णोदेवी १८/१२/२५, २३/१/२०२६ वन साईट ट्रेन/ वन साईट प्लेन थ्री स्टार हॉटेल, ८ रात्र/९ दिवस ₹19999/-
केरळ, कोचीन, मुन्नार, टेकडी, वडकला, देवेंद्र, कन्याकुमारी २२/१/२६ दोन्ही साईट थ्री टायर ट्रेन एसी/थ्री स्टार हॉटेल ८ रात्र/९ दिवस ₹17999/-
बेंगलोर, म्हैसूर, उटी, कुन्नूर १/१२/२०२५ दोन्ही साईट थ्री टायर ट्रेन थ्री स्टार हॉटेल ६ रात्र/ ७ दिवस ₹13500/-
प्रभाकर पटेल : ९८८०२४१६६९
चंद्रकांत म्हात्रे : ९२६०७४५३२६/ अभिनव ठोंबर : ७७२१९२७४०४

### वेधक

## विनायक तेलंग नवे कार्यकारी अभियंता



**रायगड :** रायगड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचा अतिरिक्त कारभार राहुल देवांग यांच्याकडे होता. आता मात्र पूर्णवेळ अधिकारी या विभागाला प्राप्त झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता विनायक तेलंग यांना बढती मिळाली असून, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सोमवारी दुपारी त्यांनी पदभार स्वीकारला. गेल्या अनेक वर्षांपासून विनायक तेलंग हे पान ५ वर

## तलाठी भरती लवकरच होणार

**मुंबई :** राज्याच्या महसूल विभागातील तलाठ्यांवर कामाचा प्रचंड ताण आहे. सध्या तलाठ्यांच्या संख्येपेक्षा कामाचे प्रमाण जास्त असल्यामुळे एका तलाठ्याकडे तीन ते चार गावांचा कारभार आहे. त्यामुळे नागरिकांना कागदपत्रांची कामे वेळेत मिळत नाहीत. मात्र, डिसेंबरअखेरीस राज्यातील तलाठ्यांच्या १७०० पेक्षा जास्त रिक्त पदांच्या भरतीची प्रक्रिया सुरू होणार आहे. भरती झाल्यानंतर तलाठ्यांवरील कामाचा ताण कमी होईल, तसेच नागरिकांची कामे वेळेत मार्गी लागतील. ही भरती स्पर्धा परीक्षा देणाऱ्या तरुणांसाठीही मोठा दिलासा ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यामुळे राज्यभरातील सर्व तरुण उमेदवारांचे या भरतीकडे लक्ष लागून राहिले आहे.

## रेल्वे अपघातात दहा जण ठार

**नागपूर :** रायगडहून वेगात येणारी रेल्वे पॅसेंजर मालगाडीवर आदळली. त्यामुळे झालेल्या भीषण अपघातात दहा जणांचा मृत्यू झाला असून, पंचवीसहून अधिक प्रवासी जखमी झाल्याचे सांगितले जाते. मृतांमध्ये महिला आणि लहान मुले यांचा समावेश अधिक असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, मंगळवारी दुपारी चारच्या सुमारास बिलासपूर (छत्तीसगड)जवळ लाल खदान परिसरात हा भीषण अपघात घडला. अपघात इतका भीषण होता की, मालगाडीला धडकल्यानंतर कोरबा-पॅसेंजर ट्रेनचे अनेक डबे पूर्णपणे क्षतिग्रस्त झाले. अनेक डबे रुळाखाली उतरले. अपघातानंतर ट्रेनमधील हादरलेल्या प्रवाशांनी एकच कल्लोळ केला.

# आयोगाची 'स्टार' खेळी

## मतचोरीकडे दुर्लक्ष; निवडणुकीवर लक्ष

**| मुंबई | प्रतिनिधी |**

सदोष मतदारयाद्यांमुळे मतचोरी करुन महायुती सरकार सत्तेवर आल्याचा आरोप महाविकास आघाडीकडून सातत्याने करण्यात येत आहे. त्यामुळे मतचोरी रोखण्यासाठी मतदारयाद्यांमधील घोळ आधी निस्तरण्यात यावा, त्यानंतरच राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात याव्यात, अशी मागणी महाविकास आघाडी आणि मनसेच्यावतीने १ नोव्हेंबर रोजी मुंबईत काढण्यात आलेल्या सत्याच्या मोर्चातून करण्यात आली होती. दरम्यान, निवडणूक आयोगाला खडे बोल सुनावले होते. परंतु, सत्ताधारी महायुतीपुढे लाचार झालेल्या आयोगाने जनतेच्या मागणीकडे दुर्लक्ष करीत निवडणुका घेण्याचा डाव टाकला आहे, असा आरोप करण्यात येत आहे. राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्या आहेत. दुबार-तिबार मतदारांचा प्रश्न सोडविण्यासाठी 'डबल स्टार'चा फंडा पुढे आणला आहे. दरम्यान, याविरोधात राज्यभरातून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

राज्यात मागील सात वर्षांपासून प्रलंबित असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल अखेर वाजला आहे. निवडणूक आयोगाने मंगळवारी (दि. ४) पत्रकार परिषद घेत राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. त्यानुसार या दोन्ही संस्थांसाठी येत्या २ डिसेंबर रोजी निवडणूक होणार असून, त्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर होणार आहे. या निवडणुकीत १ कोटींहून पान ५ वर



### यंदा उमेदवारांच्या खर्चाच्या मर्यादेत वाढ

यंदा नगरपालिका व नगरपंचायत निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांसाठी खर्चाची मर्यादा वाढवण्यात आली आहे. त्यानुसार अ वर्ग नगरपालिकांच्या अध्यक्षपदासाठी १५ लाखांची मर्यादा, तर क वर्ग नगरपालिकांसाठी ७ लाखांची खर्चमर्यादा ठरवण्यात आली आहे. मतदारांच्या सुविधेसाठी एका खास ॲपची निर्मिती करण्यात आली आहे.

### ३१ ऑक्टोबरच्या यादीनुसार मतदान

राज्यातील नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी ३१ ऑक्टोबरला प्रसिद्ध झाली आहे. त्यानुसार मतदान होणार आहे. त्यामध्ये एकूण १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ मतदार असतील. त्यामध्ये ५५ लाख २२ हजार ८७० महिला मतदार असतील. या निवडणुकांसाठी राज्यात एकूण १३ हजार कंट्रोल युनिट्स स्थापन करण्यात आले आहेत.

### उमेदवारी अर्ज ऑनलाईन भरावा लागेल

नगरपंचायतीत १ सदस्य व १ अध्यक्ष असतो. त्यामुळे त्यात मतदारांनी दोन मते द्यावी लागतील. नामनिर्देशन हे पूर्णतः ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले जातील. आयोगाने यासंबंधी एक पोर्टल तयार केले आहे. उमेदवारांना त्यावर आपले अर्ज भरता येतील. एका प्रभागात एका उमेदवाराला अधिकाधिक चार उमेदवारी अर्ज भरता येतील. संकेतस्थळावर अर्ज भरल्यानंतर त्याची प्रिंटआऊट संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांकडे जाऊन जमा करावी लागेल. उमेदवारी अर्जासोबत जातवैधता प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे. पण, ज्यांनी उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी जातवैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्यांना अर्ज केल्याची पावती सादर करुन आपला अर्ज भरता येईल. आलेल्या पत्र्यांमुळे पर्यटक प्रवाशांना भरपावसात भिजत, तर कधी भरउन्हात उभे राहून बोटींची वाट पाहावी लागत आहे.

### आघाडी-मनसेच्या शिष्टमंडळाला भेट नाकारली

**नवी दिल्ली :** राज्यात एकीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल वाजत असतानाच, राजधानी नवी दिल्लीत मोठा राजकीय संघर्ष उफाळून आला आहे. मतदार याद्यांमधील गोंधळाविरोधात तक्रार दाखल करण्यासाठी गेलेल्या महाविकास आघाडी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या शिष्टमंडळाला केंद्रीय निवडणूक आयोगाने भेटण्यास स्पष्टपणे नकार दिल्याने संतप्त नेत्यांनी आयोगाच्या कार्यालयातच ठिय्या दिला. मतदार याद्यांमधील घोळासंदर्भात तक्रार करण्यासाठी मनसे आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांचे शिष्टमंडळ सोमवारी केंद्रीय निवडणूक आयोगाची भेट घेण्यासाठी दिल्लीत दाखल झाले. या शिष्टमंडळात शिवसेना ठाकरे गटाचे खासदार अनिल देसाई, अरविंद सावंत, पान ५ वर

## रायगडात दहा न.प.च्या निवडणुका

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील अलिबागसह दहा नगरपरिषदेच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. प्रदीर्घ कालावधीनंतर या नगरपरिषदांचा निवडणुका डिसेंबरमध्ये होणार आहेत. प्रशासाकडून त्याची हालचाल सुरू झाली आहे. जिल्ह्यातील नगरपरिषदांचा कार्यकाळ २०२१ मध्ये संपला. तेव्हापासून नगर परिषदेवर प्रशासकीय राजवट सुरु आहे. प्रशासनाद्वारे शहरांचा कारभार चालविला जात होता. नगरपरिषदांवर पूर्ण वेळ प्रशासन अधिकारी म्हणून मुख्याधिकारी काम पाहात होते. नगरपरिषदेची निवडणूक लांबणीवर गेल्याने गेली चार वर्षांपासून नगरपरिषदेचा कारभार प्रशासकामार्फत चालत होता. निवडणुका कधी होणार याकडे राजकीय कार्यकर्त्यांचे लक्ष लागून राहिले होते. अखेर ही उत्कंठा संपली आहे. ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात नगरपरिषदेच्या अध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर झाले. नगरपरिषदेच्या सदस्यपदांचे आरक्षण बुधवारी (दि.८) ऑक्टोबरला जाहीर करण्यात आले. या आरक्षणामध्ये महिला व पुरुषांना समान संधी देण्यात आली आहे. त्यानंतर कार्यक्रम कधी जाहीर होणार याकडे लक्ष लागून राहिले होते. अखेर नगरपरिषदेचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. जिल्ह्यातील अलिबाग, मुरूड, रोहा, महाड, श्रीवर्धन, पेण, उरण, माथेरान, खोपोली व कर्जत या नगरपरिषदांच्या निवडणुका पार पडणार आहेत.

# आता पाल्हे पुलाचा नंबर?

- कमकुवत पुलावरुन अवजड वाहतूक सुरूच
- सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष



**| चौल | प्रतिनिधी |**

अलिबाग-रोहा मार्गावरील वढाव येथील साकव कोसळल्यानंतर पुन्हा एकदा अलिबाग तालुक्यातील साकव, पुलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. दरम्यान, याआधी नागरवाडी, त्यानंतर सोमवारी वढाव येथील साकव कोसळला. आता पाल्हे पुलाचा नंबर लागेल की काय, अशी अवस्था या पुलाची झाली आहे. रात्री-अपरात्री हा पूल कोसळून महाड येथील सावित्री पूल दुर्घटनेची पुनरावृत्ती होण्याची भीती आहे. मात्र, याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग विभागाला काहीच सोयरसूतक नाही, अशी परिस्थिती आहे. कारण, या पुलावरुन राजरोसपणे अवजड वाहतूक सुरू असतानाही त्याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत आहे. तालुक्यातील सहाण पान ५ वर

> पाल्हे पुलाच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे. या पुलावरील अवजड वाहतूक बंद करण्यात आली आहे. परंतु, जर का अवजड वाहतूक सुरू असेल, तर वाहतूक विभागाला पत्र देऊन कारवाई करण्याचे आदेश देण्यात येतील.
> – मोनिका धायतडक, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग

## आज देहेनमध्ये अध्यात्मिक परिषद

**| रायगड | जिल्हा परिषद |**

आगरी सामाजिक संस्था अलिबाग आयोजित आध्यात्मिक परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी (दि.५) देहेन येथील हनुमानम मंदिर सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थित हा सोहळा पार पडणार आहे.

यावेळी शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांच्यासह परिषदेचे अध्यक्ष साहित्यिक अमृत पाटील उपस्थित राहणार आहेत.

सकाळी साडेनऊ ते सायंकाळी साडेपाच या वेळेत ही परिषद असणार आहे. दीप प्रज्वलन, पुरस्कार वितरण, सत्कार, मान्यवरांचे मार्गदर्शन हे पहिल्या सत्रात होणार आहे. त्यानंतर दुसऱ्या पान ५ वर

## शासन रेशन दुकानदारांवर मेहरबान?

- रास्तभाव धान्य दुकानदाराकडून आदिवासींना अळ्या, लेंडीयुक्त धान्य वाटप



**| पाली | प्रतिनिधी |**

शासनामार्फत देण्यात येणाऱ्या ज्या धान्यावर आदिवासी, सर्वसामान्य जनतेचे पोट भरते, तेच धान्य आता सर्वसामान्यांसाठी जीवघेणे ठरते आहे. वाघोशी विभागातील रेशनिंगधारक नागरिकांना मिळणाऱ्या रेशनिंगच्या धान्यात जिवंत आल्या आणि उंदीर व पालीच्या लेंड्या सापडल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

वाघोशी विभागातील रास्तभाव धान्याचे दुकान कुंभारघर येथे आहे. या विभागात विशेषतः बहुतांश प्रमाणात आदिवासी वस्त्या आहेत. या आदिवासी नागरिकांचे जगण्याचे एकमेव साधन म्हणजे शासनाकडून रास्तभाव धान्य दुकानावर मिळणार शिधा. मात्र, रास्तभाव धान दुकानदाराकडून नागरिकांना अक्षरशः अळ्या व लेंडीयुक्त धान्य वितरित करण्यात येत असल्याची बाब नुकतीच उघडकीस आली आहे. काही आदिवासी वृद्ध महिला रेशनिंगचा शिधा घरी घेऊन आल्यानंतर त्या धान्यात अळ्या व लेंड्या असल्याचे पान ५ वर

## आवासच्या यात्रेवर पावसाचे सावट



(छायाचित्र : समीर मालोदे)

> यावर्षी पावसामुळे ग्राहकांची संख्या कमी दिसली. खरेदीला प्रतिसाद कमी मिळाला आहे. त्याचा खरेदीवर परिणाम झाला. ५० टक्के खरेदीवर परिणाम झाला आहे.
> – नवीन गुप्ता, विक्रेता

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

दिवाळीनंतर आवास येथील नागेश्वरची यात्रा मंगळवारी सुरू झाली. या यात्रेवर पावसाचे सावट पडल्याचे बोलले जात आहे. वेगवेगळ्या प्रकारची दुकाने असतानादेखील खरेदीला अल्प प्रतिसाद मिळाला. खरेदीवर ५० टक्के परिणाम झाल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

कार्तिक शुध्द चतुर्दशी समाधिस्त सोहळ्याचे पुण्यस्मरण यात्रेच्या रुपाने साजरे करण्यात येते. यादिवशी आवास येथील यात्रा अलिबाग तालुक्यातील पहिला यात्रा म्हणून मानले जाते. अलिबाग तालुक्यातील निसर्गरम्य, किनारपट्टीलगत असलेल्या आवास गावातील नागेश्वराच्या यात्रेची परंपरा गेल्या अनेक वर्षांची आहे. ही परंपरा याही वर्षी जपण्यात आली. आवास येथील श्री नागेश्वरच्या यात्रेमध्ये खाद्य पदार्थांसह हार, फुले, खेळणी आदी साहित्यांची दुकाने सजली होती. पान ५ वर

## जिल्ह्यात कुष्ठरोगाच्या उच्चाटनासाठी मोहीम

- पाच लाखांहून अधिक घरांचे होणार सर्वेक्षण
- १७ नोव्हेंबरपासून आशा सेविका, स्वयंसेविका देणार भेटी

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

रायगडजिल्ह्यातदि.१७नोव्हेंबर ते दि. २ डिसेंबर या पंधरवड्यात कुष्ठरोग शोध मोहीम राबविण्यात येणार असून, सुमारे २३ लाख ३० हजार ८७१ लोकांची तपासणी करण्यात येणार आहे. सध्या रायगड जिल्ह्यामध्ये ३९० कुष्ठरुग्णांवर औषधोपचार सुरू आहेत. २०२७ पर्यंत जिल्ह्यात कुष्ठरोग्याची संख्या शून्यावर आणण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जिल्हा प्रशासन काम करीत असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी सांगितले.

या मोहिमेदरम्यान जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लोकसंख्येचे १०० टक्के व शहरी भागातील जोखीमग्रस्त ३० टक्के लोकसंख्येचे प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील एकूण ५ लाख ६ हजार ८४१ घरांना आशा सेविका व स्वयंसेवक भेटी देणार आहेत. यासाठी एकूण १ हजार ९९५ पथके व ३७५ पर्यवेक्षवा यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. तरी, या मोहिमेदरम्यान घरी येणाऱ्या आरोग्य पथकास सहकार्य करावे, असे आवाहन नेहा भोसले यांनी केले आहे.

### कुष्ठरोगाची लक्षणे

शरीराच्या कुठल्याही भागावर फिकट लालसर न खाजणारा बधीर चट्टा-डाग, त्या ठिकाणी घाम न येणे, जाड बधीर तेलकट त्वचा, त्वचेवर लहान लालसर गाठी असणे, कानाच्या पाळ्या जाड होणे, त्वचेवर थंड व गरम संवेदना न जाणवणे, भुवयांचे केस विरळ होणे, डोळे पूर्णपणे बंद करता न येणे, हातातून वस्तू गळून पडणे, चालताना पायातून चप्पल निसटणे, हाताची व पायाची बोटे वाकडे असणे, हात मानेपासून पाय घोट्यापासून लुळा पडणे.

समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधून त्यांना त्वरित बहुविध औषधोपचाराखाली आणणे. नवीन कुष्ठरुग्ण शोधून बहुविध औषधोपचाराद्वारे संसर्गाची साखळी खंडित करुन होणारा प्रसार कमी करणे, समाजात पान ५ वर

> या मोहिमेदरम्यान आशा सेविका, स्वयंसेवक व आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन सर्वेक्षण करून संशयित कुष्ठरुग्ण शोधणार असून, नागरिकांनी आजाराबाबत गैरसमज व भीती न बाळगता घरी येणाऱ्या पथकाला सहकार्य करावे. तसेच जनजागृती, तपासणी व उपचार या त्रिसूत्रीने कुष्ठरुग्ण शोध अभियान यशस्वी करावे.
> – नेहा भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी, राजिप

### अलिबाग-रोहा मार्गावरील

## पूल, रस्त्यांचा प्रश्न कायमच

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

स्वखर्चाने रस्ते तयार करून देण्याचे आश्वासन आमदार दळवी यांनी यापूर्वी दिले होते. मात्र, शासनाचा निधी असतानादेखील हा रस्ता पूर्ण करण्यात ते अपयशी ठरले आहेत. गेल्या पाच वर्षांपासून अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्याचा प्रश्न कायम असून, आता या मार्गावरील पूल, साकवचा प्रश्नही गंभीर झाला आहे.

अलिबाग-रोहा मार्गाच्या दुरवस्थेबाबत सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात आहेत. हॅम योजनेतून जवळपास २०० कोटी रुपयांचा निधी या रस्त्यासाठी मंजूर झाला. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून या रस्त्याचे काम ठप्प झाले आहे. ठेकेदाराचे सुमारे १४ कोटी रुपये थकल्याने हे काम बंद करण्यात आल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून समोर आली आहे. अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्याच्या कामासाठी सुरुवातीला काम देण्यात आलेल्या ठेकेदाराने परवडत नसल्याचे कारण सांगून काम सोडून गेले. त्यानंतर दुसरा ठेकेदार नेमण्यात आला. मात्र, त्यानेही 'नव्याचे नऊ दिवस' या उक्तीप्रमाणे काम केले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचा ठेकेदारांवर अंकुश राहिला नसल्याने अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्यांची अवस्था दयनीय झाली आहे. या मार्गावरील पुलांसह रस्त्यांची अवस्था दयनीय झाली आहे. खड्डेमय पान ५ वर

### अधीक्षक अभियंत्यांनी केली पुलाची पाहणी

पूल दुर्घटनेनंतर सार्वजनिक बांधकाम विभाग खडबडून जागे झाले. अधीक्षक अभियंता सुषमा गायकवाड यांनी मंगळवारी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास पडलेल्या पुलाची पाहणी केली. हा पूल नव्याने उभारणी होईपर्यंत पर्यायी रस्त्याची विचारपूस केली. मात्र, पर्यायी मार्गावरील पुलांचीदेखील अवस्था बिकट असल्याने हा प्रश्न निर्माण झाला. मात्र, हा पूल तातडीने तयार करण्याच्या सूचना कार्यकारी अभियंता यांना देण्यात आल्या आहेत.

### वढाव पूल दुर्घटनेचा एकमेव साक्षीदार स्वप्नील गायकरने सांगितला थरारक अनुभव

## 'तो' सुदैवाने बचावला!

प्रमोद जाधव

**| रायगड |**

कामावरून घरी जात असताना वढाव-खानाव येथील पुलाजवळ आल्यावर अचानक पुल कोसळला. त्यामुळे जोरदार तो आदळला. हातासह छातीला दुखापत झाली. मात्र, दैवबलवत्तर म्हणून तो बचावला असल्याचे सांगण्यात आले.

स्वप्नील गायकर असे या तरुणाचे नाव आहे. हा तरुण वावे येथील रहिवासी आहे. हॉटेल मॅनेजमेंटचे शिक्षण घेऊन तो गेल्या अनेक वर्षांपासून या क्षेत्रात काम करीत आहे. अलिबागमधील रॅडीसन हॉटेलनंतर तो झिराड येथील व्हीला येथे नोकरीला आहे. गेल्या काही वर्षांपासून तो काम करीत आहे. नेहमीप्रमाणे संध्याकाळी काम झाल्यावर साडेपाच वाजण्याच्या सुमारास त्याची दुचाकी घेऊन निघाला. पाऊस आल्याने अलिबागमध्ये थांबला. पाऊस गेल्यावर पुन्हा तो घरी वावेकडे दुचाकीवरून जात होता.

एका बाजूला पाऊस पडल्यास भिजण्याची धास्ती, दुसऱ्या बाजूला काम आटोपल्यावर घरी जाण्याची ओढ होती. अशा मनःस्थितीत मार्गक्रमण करीत असताना वढाव ते खानावदरम्यानच्या पुलाजवळ आल्यावर अचानक त्याची गाडी अचानक खाली सरकू लागली. काही वेळ तो स्तब्ध झाला. काय घडतेय हे त्यालाही कळत नव्हते. अशातच एकदम जोरदार दणका मिळाला. त्यात त्याची गाडी आणि तोदेखील काही अंतरावर फेकला गेला. क्षणभर काही झालेय हे त्यालाही कळले नाही. घटनास्थळी तो दोन ते तीन मिनिटे एकटाच होता. दरम्यान, याठिकाणावरुन जाणाऱ्या काही बाब पादचाऱ्यांच्या ही बाब लक्षात आल्यावर त्याला तात्काळ काढण्यात आले. त्याला दुखापत झाली होती. त्याही परिस्थितीत तो खानावच्या दवाखान्यात गेला. त्यानंतर अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात अधिक उपचारासाठी गेला. डॉक्टरांनी तपासणी करून एक्स-रे काढले. त्याच्या हाताला व छातीला दुखापत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. सध्या तो अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात उपचार घेत आहे. पोलीस फक्त पंचनाम्यासाठी आले. त्यानंतर कोणीही अधिकारी त्याला भेटण्यासाठी आले नसल्याची खंत स्वप्नीलने व्यक्त केली.



### प्रशासनाच्या कारभारावर नाराजी

दैव बलवत्तर होते म्हणून मी वाचलो, असे वढाव पूल दुर्घटनेचा एकमेव साक्षीदार असलेल्या स्वप्नील गायकरने सांगितले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यक्षमतेवर त्याने नाराजी व्यक्त केली असून, वेळीच उपाययोजना केली असती, तर ही दुर्घटना घडली नसती, असेही स्वप्नील म्हणाला.

# आठ चोरटे जेरबंद

## एचआयएल कंपनीत चोरी

| रसायनी | प्रतिनिधी |

भारत सरकारची रसायनी येथील एचआयएल (हिल) इंडिया लिमिटेड कंपनीच्या आवारात चोरी करणाऱ्या आठ चोरांना रसायनी पोलिसांनी मुद्देमालासह अटक केली आहे. याप्रकरणी पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मध्यरात्रीला चोरट्यांनी एच. आय. एल. कंपनीच्या आवारात प्रवेश केला. त्यांनी २१,००० रुपये किमतीचे कॉपर वायरचे दोन बंडल आणि कापलेले तुकडे (प्लास्टिकचे काळे आवरण असलेले एकूण ३० किलो वजनाचे) चोरले. तसेच, एका जुन्या टेम्पोमधून ५,६०० रुपये किमतीची आठ किलो वजनाची कॉपर वायर (प्लास्टिकचे आवरण असलेली) चोरून नेत असताना पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. एकूण २६,६०० रुपयांच्या मुद्देमालासह आरोपींना अटक करण्यात आली आहे.

यात दीप भगवान सोनावळे, रा. खाने आंबिवली, ता. खालापूर, राज किशोर जगदीश वर्मा, रा. लोहप, ता. खालापूर, अकबर मोहम्मद जावेद खान रा. मानखुर्द गोवंडी, मुंबई मूळ उत्तर प्रदेश, बकरीदी उर्फ अमील शाकीर अली शेख, रा. मानखुर्द मंडल जनता नगर, गोवंडी, मुंबई मूळ उत्तर प्रदेश, मोहम्मद अल्ताफ शेख, रा. मानखुर्द मंडल जनता नगर, गोवंडी, मुंबई मूळ उत्तर प्रदेश, अदनान जाहीर खान, रा. मंडाला इंदिरानगर, गोवंडी, मुंबई मूळ उत्तर प्रदेश, अमन मेश सरोज, रा. ३० फिट रोड, साईबाबा मंदिर जवळ, गोवंडी मूळ उत्तर प्रदेश, अभिषेक रामू चौरसिया, रा. मानखुर्द, तीस फिट रोड, साईबाबा मंदिर जवळ, गोवंडी मूळ उत्तर प्रदेश.

या घटनेतील टेम्पो घेऊन पळून गेलेल्या एका अज्ञात इसमाचा पोलीस शोध घेत आहेत. या आठ जणांवर रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मंगेश बाचकर हे करीत आहेत.

# फ्लॅट आणि पैसे परत न करता केली फसवणूक

**नवीन पनवेल** : फ्लॅट न देता भरलेली रक्कम ही परत न केल्याप्रकरणी संभाजी शिवाजी सपकाळ यांच्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात २९ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

दिलीप दळवी हे फणसपाडा, सीबीडी बेलापूर येथे राहात असून, ते सेवानिवृत्त आहेत. त्यांनी संभाजी सपकाळ यांच्या ऑर्चिड ब्लोसॉम या नावाच्या प्रोजेक्टमध्ये फ्लॅट घेण्याचे ठरवले. यावेळी त्यांनी सात लाख आठ हजार रुपये चेकद्वारे दिले. यावेळी सपकाळ यांनी भरलेली रक्कम परत केली नाही किंवा व्यवहार रद्द झाल्यास व्याजासह रकमेचा एक चेक दिला होता. यावेळी प्रोजेक्टचे काम पूर्ण झाल्यानंतर बुकिंगप्रमाणे फ्लॅट देण्यात येतील, असे सांगितले. २०१६ पासून पैसे घेऊन फ्लॅटदेखील दिलेला नव्हता. दळवी हे कंपनीच्या ऑफिसवर गेले असता ऑफिस बंद मिळून आले. मोबाईल क्रमांकवर संपर्क साधला असता उडवाउडवीची उत्तरे देऊन फोन उचलण्याचे बंद केले. दळवी यांच्याकडे दिलेला चेक त्यांनी बँकेत टाकला असता तोदेखील बाऊन्स झाला.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे धामणी, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ५६/३/अ | एकूण क्षेत्र ०-३५-७० हे.आर. | १.५० |
| ५६/१ | एकूण क्षेत्र ०-३२-२० हे.आर. | २.१५ |

**मौजे शिंगढोळ, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ५१/७ | एकूण क्षेत्र ०-४७-०० हे.आर. | ०.२२ |

**मौजे ओलमन, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १३९ | एकूण क्षेत्र ०-३४-६० हे.आर. | ३.२५ |

**मौजे कोठींबे, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ११०/२ | एकूण क्षेत्र २-०३-०० हे.आर. | १.८५ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ५ (पाच) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :- ०५/११/२०२५
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ता:- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७



दि. ०४/११/२०२५

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे वांदेली ता. मुरूड जि. रायगड येथील खालील नमुद असलेली जमिन मिळकत. सदर मिळकतीचे विद्यमान मालक सुरेश पांडुरंग ठाकुर यांनी विक्री व्यवहारास काढलेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरोसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीशी विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटिस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिलेले आहे. त्या संबंधीत मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| वांदेली ता. मुरूड | २६ | ०-०१-००<br>पो.ख.०-०१-८०<br>एकुण ०-०२-८० | ०.०६ |

वर वर्णन केलेली मिळकत या जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात इतर कोणाचीही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार वहिवाटीचे येणेजाणेचे मार्ग, वारसहक्क आदी कोणत्याही प्रकारचे हक्क व हितसंबंध असल्यास वा त्यांचे वरील मिळकतीच्या सदर विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणारे यांच्याकडे कळवावी. येणेप्रमाणे सदर विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील. व त्यानंतर मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

दि. ०४/११/२०२५
**ॲड. मोहनिश मनोहर ठाकुर**
रा. चिंचघर, पो. बोर्ली, ता. मुरूड, जि. रायगड
मो.नं. ८०८००१९११५



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, खालील नमूद केलेली बागायत जमिन मिळकत सबिना मुख्तार बागवान यांच्याकडुन माझे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चौल ता. अलिबाग, जि. रायगड | २१२१ | ५.००.०० | ५०.०० |

सदर बिनशेती जमीन मिळकत ही या नोटीसीचा विषय आहे.

तरी वर नमूद बागायत जमिन मिळकत व त्यामधील घर मिळकतीबाबत कुणाचेही ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन सात दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील बागायत जमिन मिळकत व त्यामधील घर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, असे समजुन इतर कोणाचाही कायदेशीर हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक आमच्या अशिलांच्या हक्कात सोडून दिलेले आहे, असे समजून व कायदेशीर बाबींची पूर्तता करून माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ०५/११/२०२५
**ॲड. गीता सं. पवार**
०५, श्रुती सारंग सहकारी सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हण आळी,
ता. अलिबाग, जि. रायगड



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, खालील नमूद केलेली बागायत जमिन मिळकत व त्यामधील घर मिळकत फहद मुख्तार बागवान यांच्याकडुन माझे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चौल (दक्षिण भाग) ता. अलिबाग, जि. रायगड | २१२२/२ | ०-०५-२० | २.६५ |

तसेच त्यामधील ग्रुप ग्रामपंचायत चौल हद्दीतील घर मिळकत क्रमांक ३७२५, क्षेत्र ५१० चौ.फूट (४७.३९ चौ.मी.) इतके क्षेत्र असलेली घर मिळकत.

सदर बागायत जमिन मिळकत व त्यामधील घर मिळकत ही या नोटीसीचा विषय आहे.

तरी वर नमूद बागायत जमिन मिळकत व त्यामधील घर मिळकतीबाबत कुणाचेही ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन सात दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील बागायत जमिन मिळकत व त्यामधील घर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, असे समजुन इतर कोणाचाही कायदेशीर हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक आमच्या अशिलांच्या हक्कात सोडून दिलेले आहे, असे समजून व कायदेशीर बाबींची पूर्तता करून माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ०५/११/२०२५
**ॲड. गीता सं. पवार**
०५, श्रुती सारंग सहकारी सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हण आळी,
ता. अलिबाग, जि. रायगड



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक सिताबाई रामदास सावंत यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे तमनाथ तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ५१/२/अ | एकुण क्षेत्र ०-२६-४० हे आर पॉ | १-३७ |
| ५४/२/ब | एकुण क्षेत्र ०-२०-०० हे आर पॉ | १-१५ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक ०५/११/२०२५

खरेदीदारातर्फे वकील **ॲड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस
समोर, आमराई रोड, कर्जत, ता. कर्जत
जि. रायगड ४१०२०१

खरेदीदारातर्फे वकील **ॲड. निलेश कान्हू मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळमजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस
समोर, आमराई रोड, कर्जत, ता. कर्जत
जि. रायगड ४१०२०१



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक १. श्री. विशाल विजय देशपांडे, २. श्री. विजय गोपीनाथ देशपांडे, ३. श्री. वैभव विजय देशपांडे यांचे ताबेकब्जातील व वहीवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्श्यातील खालील परिशिष्ठामध्ये वर्णन केलेली जमिन आमचे अशिल श्री. अन्थोनी सुंदरम पिल्लई यांनी त्यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहू जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मौजे कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| भूमापन क्र. | उपविभाग क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|---|
| ३३ | २ | ०.११.०० | ०.०६ |

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने, कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमिन निर्वेध व बोजारहीत आहे असे समजणेत येवून सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पूर्ण केला जाईल. व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दिनांक : ०५/११/२०२५
**ॲड. मोनाली रामदास हजारे**
एम.कॉम.एल.एल.बी
पत्ता- दहिवली, ए. व्ही. एफ रेसिडेन्सी,
ललानी रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड
मो. नं. ९२६०१०९२८२


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


### कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

**ई-निविदा आमंत्रण सूचना दिनांक 04/11/2025**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने वरिष्ठ क्षेत्रीय अभियंता, रत्नागिरी यांच्याकडून पुढील कामांसाठी खुली ई-निविदा मागवण्यात येत आहे. **कामाचे नाव** - एसईएन/चिपळूण विभागांतर्गत काँक्रीट स्लीपरचे खांचे भरणे. **निविदा अधिसूचना क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2025-64, अंदाजित खर्च:** ₹ 16,72,538/-, **ईएमडी** - ₹ 33,500/-, **ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ:** 27/11/2025 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी यांच्याशी संपर्क साधा. (वेबसाईट: https://www.ireps.gov.in)



### जाहीर सूचना

जनतेस याद्वारे **सूचना** देण्यात येते की, याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या आणि यापश्चात **"मालमत्ता"** असे उल्लेखित कृषिक जमिनीच्या सर्व खंड आणि तुकड्यांकरिता मुनिश मनमोहन आनंद, पॅन क्र. AAAPA8810C, शिल्पा मुनिश आनंद, अंकरिश मुनिश आनंद आणि आयुश मुनिश आनंद यांच्या शीर्षकाची आम्ही तपासणी करीत आहोत.

मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागाविरुद्ध किंवा त्या संदर्भात विक्री, हस्तांतरण, देवाणघेवाण, योजना, धारणाधिकार, प्रभार, गहाणवट (न्याय्य किंवा अन्यथा), भेट, न्यास, मृत्युपत्र, वारसा, ताबा, भाडेकरार, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, अभिहस्तांकन, भाडेकरू, पोट-भाडेकरू, परवाना, काळजीवाहू आधारे, भागिदारी करारनामा, वहिवाट, विभागणी, कर्जे, प्राप्य बाबींचे हायपोथिकेशन, हमी, आर्थिक मोबदला, देखभाल, भोगवटा, हक्कसोड किंवा कोणत्याही करारपत्र, करारनामा, दस्तऐवज, मृत्युपत्राअंतर्गत, उत्तराधिकार, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, खटला, *प्रलंबित कायदेशीर कारवाई*, कायद्याच्या कोणत्याही न्यायालयाचा हुकूम किंवा न्यायालयीन आदेश किंवा कोणत्याही प्राधिकरणाद्वारे पारित निवाडा किंवा कोणत्याही हुकूमाअंतर्गत किंवा कायद्याच्या प्रचलनाद्वारे या मार्गे किंवा कशाही प्रकारे मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये, करिता, पैकी किंवा वर कोणताही हक्क, शीर्षक, हिस्सा, दावा, लाभ, आक्षेप, इस्टेट, मागणी आणि/किंवा हितसंबंध असे काहीही असणाऱ्या **कोणत्याही** किंवा सर्व व्यक्तींनी (कोणत्याही बँका किंवा वित्तीय संस्था किंवा एनबीएफसी किंवा इतर कोणतेही सावकार समाविष्ट) येथील दिनांकापासून ७ दिवसांच्या आत त्याबाबत **objections@veritaslegal.in** येथे सहाय्यक कागदोपत्री पुराव्यांसह आम्हाला लेखी सूचित करावे व त्याची हार्ड कॉपी खालील उल्लेखित पत्त्यावर सादर करावी, असे न केल्यास अशा व्यक्ती किंवा व्यक्तींचे दावा(वे)/कथित दावा(वे)/आक्षेप, जर असल्यास, दुर्लक्षित केले/त्याग केले असे समजण्यात येईल आणि सर्व हेतू आणि कारणांकरिता सोडून दिले आणि/किंवा त्याग केले असे समजण्यात येईल आणि कशाही प्रकारे कोणत्याही पद्धतीने बंधनकारक असणार नाही.

**वरील उल्लेखित अनुसूची**
*(मालमत्तेचे वर्णन)*

गाव सतिर्जे, तालुका अलिबाग आणि नोंदणीकरण उप-जिल्हा आणि जिल्हाः रायगड, महाराष्ट्र येथे वसलेल्या असलेल्या आणि स्थित कृषिक जमीन किंवा मैदानाचे सर्व खंड आणि तुकडे आणि वर्णन खालीलप्रमाणेः

| गट क्र. | गाव | तालुका | क्षेत्रफळ (एच.आर.) | मूल्यांकन (रु. पै.) |
|---|---|---|---|---|
| १२२ | सतिर्जे | अलिबाग | ०-४०-०० | ८.७५ |

आणि सदर मालमत्तेच्या चतुःसीमा खालील प्रमाणेः
पूर्वेस किंवा त्यादिशेने : गट क्र. १२३
पश्चिमेस किंवा त्यादिशेने : गट क्र. १२२ चा उर्वरित भाग
उत्तरेस किंवा त्यादिशेने : गट क्र. १२१ चा उर्वरित भाग
दक्षिणेस किंवा त्यादिशेने : गट क्र. १५७

**दिनांकः ५ नोव्हेंबर, २०२५**

**व्हेरिटाज लीगल**करिता
ॲडव्होकेट्स आणि सॉलिसिटर्स
सही/-
**रुस्तम मुल्ला,**
भागिदार
फोर्बस बिल्डींग, १ ला मजला, चरणजित राय मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१.



### जाहिर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहिर नोटीशीद्वारे, कळविण्यात येते की, 1) शाहेदा यायाभाई कांचवाला, 2) निलोफर यायाभाई कांचवाला, 3) शब्बीर यायाभाई कांचवाला, 4) कुरेश बदर मस्कती यांचे मालकीची, ताबेकबजातील व वहिवाटीतील खालील वर्णनाच्या शेतजमिनीच्या मिळकती, आमचे अशिलांनी, त्यांचेकडून, कायम खरेदीखताने खरेदी करण्याचे ठरविली आहे. सदर जमिनींचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे कर्नाळा, तालुका पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे. आर. पॉं. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| 30 | 1/1/1/ब | 0-59-00<br>पो.ख. 2 - 21 - 00<br>एकूण 0-80-00<br>**0-32-50**<br>**पो.ख. 0 - 21 - 00**<br>**पैकी 0-53-50** | 0.94<br><br>पैकी 0.52 |
| 30 | 1/1/ई/4 | 0-40-00 | 0.47 |
| 30 | 1/1/क/2 | 0-40-00 | 0.47 |
| 30 | 1/1/ड/3 | 0-40-00 | 0.47 |

आमचे अशिल वरील मिळकतींपैकी सर्व्हे नं. 30/1/1/1 या मिळकतीचे एकुण क्षेत्र **हे.आर-पॉं.0-80-00 पैकी हे.आर.पॉं.0-32-50, पो.ख.0-21-00, आकार रु.पै.0.52** एवढे क्षेत्र शाहेदा यायाभाई कांचवाला, निलोफर यायाभाई कांचवाला, शब्बीर यायाभाई कांचवाला यांचेकडून कायम खरेदीखताने, खरेदी करण्याचे ठरविले आहे.

तसेच, आमचे अशिल वरील मिळकतीपैकी, स.नं. 30/1/1/ई/4 हि मिळकत शाहेदा यायाभाई कांचवाला आणि स.नं. 30/1/1/क/2 हि मिळकत कुरेश बदर मस्कती आणि स.नं.30/1/1/ड/क हि मिळकत निलोफर यायाभाई कांचवाला यांचेकडून कायम खरेदीखताने, खरेदी करण्याचे ठरविले आहे.

येणेप्रमाणे, वर्णनाच्या जमिनींमध्ये, कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा, मालकी हक्क, हक्कहितसंबंध, कुळवहिवाट, ताबाकब्जा, गहाण, दान, बक्षीसपत्र, साठेकरार अगर अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी, हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून, सात (7) दिवसाच्या आंत त्यांची हरकत कागदोपत्री पुराव्यासहीत, खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवाव्यात. मुदतीत हरकत न आल्यास, वरील मिळकत निर्वेध, विनाहरकत व बोजारहित आहे, असे समजुन आमचे अशिल, सदर जमिनीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाया हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**पनवेल**
**दिनांक : 03.11.2025**
**सही/-**
**ॲड. सतिश मुळे**
कार्या. ऑफिस नं. 18, पहिला मजला, बॉम्बे मुच्युअल चेंबर,
आंबालाल दोशी मार्ग, नेस्ट टु बीएसई, फोर्ट, मुंबई-400001. मो.नं. 8591484843



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असनु त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-
मौजे दुरटोली, ता. रोहा, जि. रायगड येथील.

| मालकाचे नांव | गट नं. | एकुण क्षेत्र हे.आर | आकार रु. पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| श्री.अविनाश सागर संपगावकर व इतर ३ | ३९७ | जिरायत ००-७६-७०<br>वरकस ००-११-१०<br>पो.ख. ००-०४-८०<br>एकुण ००-९२-६०<br>पैकी<br>००-४६-०० | ११.२४ | खालसा |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन चार्ज, अॅटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन (१४) चौदा दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि.०४/११/२०२५
सही/-
**ॲड. पी. जी. दाभाडे**
रा. फ्लॅट नं.४०२, बी.विंग, चौथा मजला,
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर,
डॉ.वागळे हॉस्पिटल जवळ, ता. रोहा,
जि. रायगड पिन नं.४०२१०९
मोबा नं. ९२७२७१३९५६



### पनवेल महानगरपालिका, पनवेल
**ई- निविदा सुचना**
**मलनि:स्सारण विभाग**

मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई - निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब - १ नमुन्यातील खालील कामाची निविदा महाराष्ट्र शासनाकडील नोंदणीकृत संस्था, ठेकेदार, किंवा नोंदणीकृत कंपनी, भागीदारी कंपनी नोंदणीकृत LLB कायदा २००८ अंतर्गत संबधितांकडून मागविण्यात आली आहे.

| अनु क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (GST वगळून) | निविदा अनामत रक्कम (रू.) | कोरी ई निविदा किंमत (रू.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | PMC/SEWARAGE /३५/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका मालकीच्या प्रभाग समिती 'अ' मधील सर्व सार्वजनिक व कार्यालयांमधील शौचालयांचे सुशोभिकरण करणे व इतर अनुषंगिक कामे करणे | १,६९,०४,८५८/- | १,५०,०००/- | १,१८०/- |
| २ | PMC/SEWARAGE /३६/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका मालकीच्या प्रभाग समिती 'ब' मधील सर्व सार्वजनिक व कार्यालयांमधील शौचालयांचे सुशोभिकरण करणे व इतर अनुषंगिक कामे करणे | १,३१,६९,२०५/- | १,३२,०००/- | १,१८०/- |
| ३ | PMC/SEWARAGE /३७/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका मालकीच्या प्रभाग समिती 'क' मधील सर्व सार्वजनिक व कार्यालयांमधील शौचालयांचे सुशोभिकरण करणे व इतर अनुषंगिक कामे करणे | १,११,६१,१९०/- | १,१२,०००/- | १,१८०/- |
| ४ | PMC/SEWARAGE /३८/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका मालकीच्या प्रभाग समिती 'ड' मधील सर्व सार्वजनिक व कार्यालयांमधील शौचालयांचे सुशोभिकरण करणे व इतर अनुषंगिक कामे करणे | १,६०,४५,८४९/- | १,५०,०००/- | १,१८०/- |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिका संकेतस्थळ https://mahatenders.gov.in या साईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याची सर्व संबंधित निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

जा.क्र./पमपा/मल.वि./४८२५/प्र.क्र. १४, १५, १६ व १७/१४०७/२०२५
दिनांक : ०४/११/२०२५
सही/-
उपआयुक्त (आरोग्य)
पनवेल महानगरपालिका



### महाराष्ट्र शासन
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**
पिनकोड - ४१० २०६
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५२७७८ फॅक्स- ०२२-२७४६७४४०
ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. २३ (ई-निविदा) सन २०२५-२६
(फेर निविदा क्र.१)

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स ०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप-या निविदेमध्ये एकूण ०७ काम समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक ०७/११/२०२५ सकाळी १०.०० ते दिनांक १४/११/२०२५ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड
दिनांक :-

सही/-
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पनवेल**



### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)
ज.म.र अर्ज ३२९/२०२५

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. वकार मुजफ्फर सुबेदार, — अर्जदार
रा. मु. पो. मजगांव, ता. मुरुड, जि. रायगड

**विरुद्ध**

निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत विहूर
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड — सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. ०१/०८/१९६७ रोजी मौजे मोरे, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत विहूर, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी. अर्जदार यांचा दि. ०१/०८/१९६७ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक १२/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.
कळावे.

आज ता०३/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## निवडक



### डोलकाठीसाठी ढाक डोंगरावरील गरुड ध्वज

**कर्जत :** परंपरेनुसार देऊळवाडी किरवली येथील कार्तिक पौर्णिमेच्या उत्सवासाठी डोलकाठीच्या टोकाला बांधण्यासाठीच्या गरुड ध्वजाची पूजा राजेश बडेकर यांच्या हस्ते देऊळवाडी येथील मंदिरात करण्यात आली. त्यानंतर श्री ग्रामदेवी बहिरी तळई संस्थानाचे सचिव दिलीप बडेकर, पोलीस पाटील विवेक बडेकर, ज्ञानेश्वर जाधव, अनिल खंडागले, बिपिन बडेकर, अरविंद बडेकर, सनी गायकर, किरण गायकवाड, निखिल बडेकर, सोहम बडेकर, नयन बडेकर, नितीन बडेकर, सुरेंद्र रसाळ, प्रकाश बडेकर, सुनील अहिर, प्रशांत दिसले, केतन बडेकर, श्यामा बडेकर, जय बडेकर, बाळा बडेकर, शुभम बडेकर, अंकित गायकर, राज बडेकर, प्रतीक बडेकर आदी ग्रामस्थ गरुड ध्वज आणण्यासाठी ढाक डोंगरावर गेले होते. त्यानंतर गरुड ध्वजाची पूजा पोलीस पाटील विवेक बडेकर यांच्या हस्ते करण्यात आली. दिलीप बडेकर यांच्या हस्ते करून अभिषेक करण्यात आला आणि देवतेला यात्रेला येण्याचे आवाहन केले. त्यानंतर हा गरुड ध्वज देऊळ वाडी येथे आणण्यात आला.




### रक्तदान करून मानवतेचा 'संदेश'

**अलिबाग :** अलिबाग तालुक्यातील चौल-रेवदंडा बायपास मार्गावरील स्पाईस रेस्टॉरंटने 'रक्तदान श्रेष्ठदान' या संदेशाला साजेसे उदाहरण दिले आहे. स्वादिष्ट जेवणाची चव आणि सामाजिक जाण यांचा संगम घडवत, स्पाईस रेस्टॉरंट तर्फे 'एक पाऊल समाजासाठी' या उपक्रमांतर्गत मंगळवारी (दि.४) रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात तब्बल ९९ वेळा रक्तदान करून मानवतेचा संदेश देणारे समाजसेवक संदेश बेडेकर यांच्या कार्याचा विशेष गौरव करण्यात आला. त्यांच्या निःस्वार्थी सेवाभावाला उपस्थित मान्यवरांनी सलाम केला. दरम्यान, या रक्तदान शिबिराचे उद्घाटन शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी चौलचे उपसरपंच अजित गुरव, विभागप्रमुख मारुती भगत, उपविभागप्रमुख शैलेश घरत, शाखाप्रमुख अशोक नाईक, दिपेश पाटील, डॉ. समीर धाटावकर तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. डॉ.दिपक गोसावी व त्यांच्या सहकाऱ्यांच्या माध्यमातून कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.



### टॉवर लाईनमुळे उपासमारीची वेळ

**शिहू :** वन हक्क कायद्यानुसार वन हक्क प्राप्त जमिनिंवर कोणतताही प्रकल्प राबविण्यापूर्वी संबंधित ग्रामपंचायत मधून ग्रामसभेच्या माध्यमातून पूर्णसंमती घेणे गरजेचे होते. तसेच, वनविभागाच्या व महसूल विभागाच्या माध्यमातून पंचनामा करणे अनिवार्य होते. शिहू हद्दीतील दळी जमिन ही आदिवासी बांधवांना शासनाने वाडवडिलांपासून उदरनिर्वाहासाठी दिली आहे. या जमिनीत भात, नाचणी, वरी, तसेच इतर भाजीपाल्याचे पीक घेऊन येथील आदिवासी बांधव हे आपल्या कुटुंबाचे उदरनिर्वाह करत आहेत. इतर कोणतेही उत्पनाचे साधन नसल्यामुळे कुटुंबाचे पोट या जमिनीवर अवलंबून आहे. परंतु, गेल इंडिया कंपनीच्या टॉवरचे काम येथील शेतीत सुरु आहे. हे काम सुरु करण्यापूर्वी कंपनीने आदिवासी शेतकऱ्यांची सहमती न घेता बेकायदेशीरपणे टॉवर उभारले आहेत. टॉवर लाईनचे काम सुरु करण्यापूर्वी तेथील शेतीचे पंचनामे करून योग्य तो मोबदला देणे बंधनकारक असताना देखील आदिवासी बांधवांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांची आर्थिक फसवणूक केली आहे. त्यामुळे येथील कुटुंब उघड्यावर पडलेले आहेत. शेतीच्या नुकसान भरपाईची मागणी येथील संबंधित नुलेल्या ठेकेदारांकडे केली असता अरेतुरेची भाषा वापरून हिनतेची वागणूक दिली जात असल्याचे बाधित शेतकऱ्यांनी 'कृषीवल'च्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले. या संदर्भात बाधित शेतकऱ्यांनी रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांची भेट घेऊन आपल्यावर झालेल्या अन्यायाबाबत निवेदन देऊन व्यथा मांडल्या आहेत.

# रेशन दुकानावर कारवाई

## विविध प्रकारच्या तक्रारींमुळे परवाना रद्द

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुक्यातील दोन रेशन धान्य दुकानांविरोधात विविध प्रकारच्या तक्रारी आल्यामुळे दुकान नंबर ९ आणि १७चा परवाना रद्द करण्यात आला आहे, असे पुरवठा अधिकारी पनवेल यांनी सांगितले.

रेशन दुकाने दररोज ८ तास उघडी असणे गरजेचे आहे. मात्र, तालुक्यातील काही दुकाने महिन्यातून दोन ते तीन दिवसच बहुतांशी उघडे असतात. त्यामुळे महिन्याभरात कधीही धान्य घेण्यासाठी आलेल्या लाभार्थ्यांना परत जावे लागते. त्यांना आठवड्यातून फक्त एक दिवस रेशनिंग दुकान बंद ठेवण्याची परवानगी आहे. मात्र, मोजकेच दिवस दुकाने उघडी असतात. रेशन धान्य लाभार्थ्यांना धान्य बाबत काही तक्रारी असल्यास ते दुकानातील तक्रार वही तक्रार लिहू शकतात. मात्र, दुकानात तक्रार वहीच नसल्याने काय करायचे, असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे. तसेच, रेशन दुकानात लोकांना स्पष्टपणे वाचता येईल, असा महिती फलक असला पाहिजे. या फलकावर दुकानाची वेळ, सुट्टीचा दिवस, दुकान क्रमांक, तक्रार वही उपलब्ध असल्याची नोंद, रेशन कार्यालयाचा पत्ता व फोन, भाव व देय प्रमाण, उपलब्ध कोटा ही माहिती असणे अनिवार्य असते. असे बऱ्याच ठिकाणी दिसत नाही. अशाच तक्रारी सातत्याने पनवले तालुक्यातील दोन रेशनिंग दुकानांबद्दल येत होत्या.




> **काही दुकानात रेशनकार्ड स्वतः कडे ठेवून घेतले जातात. महिनाभर धान्याचे वितरण करण्याचा शासन नियम असताना त्याला तीलांजली दिली जात आहे. दोन ते चार दिवस धान्याचे वितरण करून दुकानाला लॉक लावले जाते. त्यानंतर ग्राहकांना धान्य दिले जात नाही. त्यामुळे काही वेळेला दुकान मालक आणि ग्राहकांमध्ये वादाचे प्रसंग ओढवतात. पुरवठा अधिकाऱ्यांनी यावर कारवाई करणे गरजेचे आहे.**
> **– रेशनिंग धारक, पनवेल**

पनवेल तालुक्यासह शहरात एकूण १९९ रेशनिंगची दुकाने आहेत. नवीन पनवेल येथील

### अधिकाऱ्यांकडून पाहणीची गरज

पनवेल तालुक्यातील दोन रेशन धान्य दुकानांवर नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत कारवाई करण्यात आली आहे. असेच प्रकार तालुक्यातील इतर ठिकाणीही घडत असतील. त्यामुळे पनवेलच्या पुरवठा अधिकाऱ्यांनी येथील सर्वच रेशनिंग दुकानांची पाहणी करून योग्य ती कारवाई करावी, जेणेकरून सामान्य नागरिकाचे हाल होणार नाहीत, अशी मागणी पनवेलकरांमधून होत आहे.

दुकान नंबर ९ आणि १७ बाबत नागरिकांकडून तक्रारी करण्यात आल्या होत्या. याबाबत पुरवठा विभागाने दुकानांची पाहणी केली असता त्या ठिकाणी भाव फलक, साठा फलक नसल्याचे दिसून आले. तसेच, संगणकीकृत यादी नाही, धान्य नमुने नाही, भेट पुस्तिका नाही, वेळ फलक नाही, शेरे बुक आणि तक्रार बुक नसल्याचे देखील निदर्शनास आले. त्याचबरोबर दुकानात धान्य देखील कमी आढळून आले आणि लाभार्थ्यांना पावती देखील दिली जात नसल्यामुळे जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी दुकान नंबर ९ आणि १७ चा परवाना रद्द करण्याचे आदेश दिले. यावेळी दुकानाची १०० टक्के अनामत रक्कम शासन जमा करावी, तसेच लाभार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून नजीकच्या दुकानाला हे रेशनिंग दुकान जोडण्यात यावे, असे आदेश देण्यात आले आहेत.

दरम्यान, काही वर्षांपासून प्राधिकार कोप्रोली येथे प्राधिकार पत्र नसतानाही रेशनिंग दुकान सुरू होते. स्थानिक नागरिकांनी केलेल्या तक्रारीनंतर हे रेशनिंग दुकान बंद करण्यात आले आणि बचत गटाला देण्यात आले. प्राधिकार पत्र नसताना दुकान चालवणे हा गुन्हा आहे. तसे असताना देखील या दुकानदारावर अद्याप देखील गुन्हा दाखल झालेला नाही. त्याच्या मागे कोणाचा वरदहस्त आहे का, असा सवाल या निमित्ताने उपस्थित झाला आहे.

# खोपालीत जनआरोग्य योजनेचे रजिस्ट्रेशन

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

गंभीर आजारांवरील उपचारांसाठी पुर्णपणे निःशुल्क गुणवत्तापूर्ण आरोग्य सुविधेचा लाभ मळिण्यासाठी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना शासनाने सुरू केली आहे. या योजनेची माहिती सर्वसामान्यांपर्यत पोहचवावी यासाठी नारायणी अमोल केदारी यांनी सुधाकर घारे फाऊंडेशनच्या माध्यमातून प्रभाग क्र.१३ मधील काजुवाडी, ठाकुरवाडी आणि आदिवासीवाडी परिसरातील ४०० महिलांनी मोफत रजिस्ट्रेशन केले आहे. दैनंदिन जिवनात लोकांना अनेक विशिष्ट आजारांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे राज्य सरकार आणि केंद्र सरकारने महात्मा फुले जनआरोग्य योजना सुरू केली आहे. ती योजना लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी वरची खोपोलीसह अनेक ठिकाणी रजिस्ट्रेशन करून घेतले आहे. काजुवाडीतही महात्मा फुले जनआरोग्य योजनेचे रजिस्ट्रेशन करण्याची मागणी स्थानिकांनी केल्यामुळे सुधाकर घारे फाऊंडेशनच्या माध्यमातून शिबीर आयोजित केले होते. या शिबिराला नागरिकांनी तसेच महिलांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. रजिस्ट्रेशन केलेल्या नागरिकांना घरपोच कार्ड पोहचविणार असल्याचे नारायणी केदारी यांनी सांगितले.



● पेझारी येथील न्यू साई वाटिका हॉटेलचे उद्घाटन करताना शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील, सुप्रिया पाटील, प्रसाद भोईर, अनिल पाटील, राजेंद्र म्हात्रे, अमरनाथ पाटील आदी मान्यवर.

# शेतकरी संघातर्फे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

यंदा ऑक्टोबर महिन्यामध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. नोव्हेंबर महिना उगवला तरी अजूनही पाऊस बरसत आहे. या बरसणाऱ्या पावसामुळे भात शेतीबरोबरच कडधान्य व आंबा पिकांचेही नुकसान होणार असल्याने, शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. अजून खरिपातील शेतकऱ्यांचे भाताचे एकमेव नगदी पीक घरी आले नाही. रब्बी पिकेही यावर्षी बेभरोशाची झाली आहेत. या अवकाळीच्या अस्मानी संकटाने शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावून नेला आहे. भातपिके पाण्यात भिजून त्यापासून मळिणारा पेंढासुद्धा उन्हाळ्यात गुरांच्या चाऱ्यासाठी उपयोगी येणार नाही. अशी बिकट अवस्था शेतकऱ्यांची झाली आहे. या ऋतुचक्रातील अस्थिरतेमुळे कोकणातील शेतकरी आर्थिक अडचणीत आला असून, कष्टाने पिकविलेल्या पिकांचा चिखल झाला असून, शेतकऱ्यांच्या स्वप्नांची माती झाली आहे. या अस्मानी संकटाच्या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने मदतीची पावले उचलावीत आणि ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी शेतकरी संघातर्फे करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन सोमवारी (दि.३) जिल्हाधिकारी किशन जावळे यांना देण्यात आले आहे.

या निवेदनातून रायगड जिल्ह्याचे ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई

# मारहाण प्रकरणी तिघांविरोधात गुन्हा

**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधि ।**

तळोजा सेक्टर १ येथील खालीद खान, त्यांचा मोठा भाऊ आणि त्यांच्या गॅरेजमध्ये काम करणारा मुलगा असे तिघेजण जारा ऑटो पार्ट्स या गॅरेजवर गेले होते. त्यावेळी शादाब बेग व त्याचे मित्र सोहेल आणि नदीम अन्सारी यांनी तेथे येऊन त्यांना, मोटरसायकलचे काम फ्री मध्ये करा आणि प्रत्येक महिन्याला ५ हजार रुपये हप्ता म्हणून द्या.जर हप्ता दिला नाही तर पालिकेत अर्ज करून गॅरेज समोरील शेड आणि हातपाय तोडून हिसकावून लावू, अशी धमकी दिली. त्याला नकार दिला असता शादाब बेग व त्याच्या मित्रांनी त्यांना शिवीगाळ करत लोखंडी रॉडने मारहाण केली. या मारहाणी विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# जयंत पाटील यांच्याकडून गांगल कुटुंबियांची भेट



**। रोहा । प्रतिनिधी ।**

रोहे शहरातील संजय गांगल यांच्या मातोश्री निवृत्त शिक्षिका विजया विनायक गांगल यांचे ३१ ऑक्टोबर रोजी वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झाले. पतीच्या निधनानंतर त्यांनी माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. पुण्यात डी.एड. पर्यंत शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी रोहा येथील जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळेत शिक्षिका म्हणून सेवा दिली. त्यांच्या पश्चात मुलगा संजय, मुलगी साधना, त्यांचे पुतणे ॲड. संजय गांगल, सुन, जावई, नातवंड, पतवंड असा मोठा परिवार आहे. सोमवारी (दि.३) शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील, सुप्रिया पाटील, ॲड. हेमंत गांगल, संदीप गांगल, शेकाप जिल्हा चिटणीस मंडळ सदस्य अनिल पाटील, आरडीसी बँकचे संचालक गणेश मढवी, शिवराम महाबळे, विनायक धामणे, राजा मळेकर, मनोहर महाबळे, हरीशचंद्र खांडेकर, प्रताप देशमुख, सुबोध देशमुख व अशोक कोशिंबकर आदी मंडळींनी गांगल कुटुंबियांना सांत्वनपर भेट दिली.

# मारहाण करून गाडीचे नुकसान

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

वावेघर येथील लतीफ शेख आणि रोहान यांच्यात शाब्दिक वाद झाला. त्यांनतर लतीफ आपला भाऊ अली याला परत कामावर घेता का, असे विचारण्यास नांदगाव येथील त्यांच्या भंगाराच्या दुकानात गेले. त्यावेळी रेहानने लोखंडी रॉडने लतीफ यांच्या डोक्यामागे मारले. त्यानंतर रेहानच्या मित्राने देखील त्यांना मारले. यावेळी लतीफचा मित्र आयुब शेखला देखील जखमी केले. त्यानंतर आणखी एकाने लतीफ शेख यांना शिवीगाळ करून लाथा बुक्यांनी मारहाण केली. तसेच, सेलेरिओ गाडीचे तोडफफोड करून नुकसान केले. या प्रकरणी चौघांविरोधात पनवेल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बिल्डर लॉबीचा 'उत्सव' सापळा

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण शहरात सध्या बिल्डर लॉबीने आकर्षक जाहिरातींची आतषबाजी सुरू केली आहे. आजच बुक करा आपल्या हक्काचं घर आणि मळिवा आकर्षक बक्षिसे! अशा घोषणा देत स्कूटर, मोबाईल, भेटवस्तू आणि सवलतींच्या आमिषाने ग्राहकांना ओढले जात आहे. मात्र, या जाहिरातींच्या मागे ग्राहकांच्या विश्वासावर घाव घालणारा डाव लपला असल्याची चर्चा उरण शहरात चांगलीच रंगली आहे.

उरण येथील आनंदनगर परिसरात रुद्रा रियालिटी नावाच्या बिल्डर ग्रुपकडून १ व २ बीएचके घरांसाठी 'उत्सव ऑफर'ची जाहिरात करण्यात आली आहे. आजच बुक करा आणि मळिवा




खात्रीशीर भेटवस्तू! असा संदेश देत ग्राहकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. स्थानिक नागरिक आणि बांधकाम क्षेत्रातील जाणकारांच्या मते, बिल्डर लॉबी विविध आमिष दाखवून ग्राहकांना

### आमिष देऊन ग्राहकांची शिकार

फसवते. प्रकल्पांची आवश्यक परवानग्या, दर्जा, रेरा मंजुरी, पूर्णत्व प्रमाणपत्र नसतानाही घरं विकली जातात. बक्षिसांच्या नादात लोक कर्जबाजारी होतात.

उरणमध्ये रिडेव्हलपमेंटच्या माध्यमातून शहरात मोठ्या प्रमाणावर टॉवर उभारले जात आहेत. त्यामुळे जुन्या प्रकल्पांना बुकिंग मिळत नसल्याने बिल्डर लॉबीकडून बक्षिसांच्या आमिषाचा डाव खेळला जात आहे. उरणमधील स्थानिकांना नवीन सदनिकांची गरज भासत नसल्याने बिल्डरांना ग्राहक मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळेच ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी स्कूटर, मोबाईल, भेटवस्तू अशा बक्षिसांच्या नावाखाली प्रचाराचा मोठा गाजावाजा सुरू आहे.

# दोन ठिकाणी घरफोडी

**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।**

वरचा ओवळा येथील पुष्पक नगर येथे एकाच रात्री दोन ठिकाणी घरफोडी झाली आहे. चोरट्यांनी लाखो रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला असून पनवेल शहर पोलीस ठाण्यात ३० ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. येथील श्री गणेश सोसायटीत राहणारे अंबादास उंबरे हे रात्री जेवण करून झोपले होते. ३० ऑक्टोबर रोजी त्यांची पत्नी झोपेतून उठली असता घरातील सामान अस्ताव्यस्त व कपाट उघडे दिसले. त्यांनी पाहणी केली असता सोन्याचा नेकलेस, लहान पोत, सोन्याचे टॉप, अंगठी, रोख रक्कम, मोबाईल असा एकूण ५ लाख ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरून नेला होता. त्याचवेळी त्यांच्या शेजारील जेके प्राइड सोसायटीत राहणारे संजय झुगे यांच्या घरातून देखील रोख रक्कम आणि मोबाईल चोरून नेला आहे.

वाहतूक शाखेची कारवाई सुरू | बोगस पत्रकारांचा उरणमध्ये सुळसुळाट

# 'प्रेस'च्या नावाखाली गैरधंदे

**। उरण । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील काही वाहनचालक शासनाची कोणतीही मान्यता नसताना आपल्या वाहनावर 'पोलीस', 'प्रेस', 'ॲडव्होकेट', 'महाराष्ट्र शासन' अशा नावांचे लोगो आणि स्टीकर लावत असल्याचे आढळून आले आहे. या गैरप्रकाराविरोधात रायगड जिल्हा वाहतूक शाखेने मोहीम सुरू केली असून, आतापर्यंत ६६ वाहनचालकांवर कारवाई करून तब्बल ३५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई सुरू आहे.




उपप्रादेशिक परिवहन विभागाची मान्यता नसतानाही अशा प्रकारचे लोगो लावणे हा कायद्याने दंडनीय गुन्हा आहे. तरी देखील जिल्ह्यात दुचाकी, तीन चाकी आणि चारचाकी वाहनांवर अशाप्रकारचे स्टीकर व लोगो लावून काहीजण मी खास आहे, असा भाव दाखवीत फिरत आहेत. काही ठिकाणी तर 'प्रेस' स्टिकरच्या आडून नशील्या पदार्थांची खुलेआम विक्री होत असल्याचे समोर आले आहे. या गंभीर प्रकारामुळे पत्रकारितेच्या सन्मानावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, उरणमध्ये अशा लोगोवाल्यांवर कधी कारवाई होणार, याकडे उरणकरांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, उरणमध्ये 'प्रेस' स्टीकरचा व्यवसायच फोफावला असून, काहींनी तर या स्टिकरची उघडपणे विक्री करून नवा धंदाच सुरू केला आहे. यामध्ये कधीही प्रसिद्ध न होणारी ऑनलाईन माध्यमे, युट्युब चॅनल्स आणि बोगस वृत्तपत्रे यांचा मोठ्या प्रमाणावर समावेश असल्याचे समोर आले आहे. अशा माध्यमांशी संबंधित बनावट पत्रकारांचा उरणमध्ये सुळसुळाट झाला आहे. मी पत्रकार आहे असे सांगत वसुली, दबाव आणि राजकीय कार्यक्रमांतील मोठेपणा मिरवण्यात ते बिनधास्तपणे गुंतले आहेत. त्यामुळे या सर्व बोगस पत्रकारांची चौकशी होणे अत्यावश्यक असल्याची मागणी उरणकरांमधून होत आहे.

या पार्श्वभूमीवर उरण तालुका मराठी पत्रकार संघाने यापूर्वीच उरण पोलीस ठाण्यात निवेदन देऊन, अशा बोगस पत्रकार आणि 'प्रेस'च्या नावाखाली गैरधंदे करणाऱ्यांवर तात्काळ कारवाईची मागणी केली आहे. मात्र, अजूनही ठोस हालचाल न झाल्याने स्थानिक नागरिक व पत्रकार वतुळात संतापाची लाट आहे. खऱ्या पत्रकारांचा सन्मान राखायचा असेल, तर 'प्रेस'च्या नावाखाली धंदे करणाऱ्यांवर कडक कारवाई अपरिहार्य आहे, असा इशारा उरण तालुका मराठी पत्रकार संघाने दिला आहे.

# शेतकऱ्यांच्या तोंडाला पुसली पाने

- **शासनाची तुटपुंजी मदत**
- **सुधागडातील शेतकऱ्यांमध्ये नाराजी**

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

राज्यात जून ते सप्टेंबर २०२५ दरम्यान झालेल्या अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांसाठी शासनाने विशेष पॅकेज जाहीर केले आहे. परंतु, या तुटपुंजी मदतीच्या स्वरूपावर सुधागड तालुक्यातील शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

शासनाने जाहीर केलेल्या या विशेष पॅकेजनुसार रब्बी हंगामात प्रति हेक्टर १० हजार रुपयांप्रमाणे (३ हेक्टर मर्यादेपर्यंत) राज्य आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत मदत देण्यात



येणार आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, हेक्टरी १० हजार रुपये ही रक्कम अत्यंत तुटपुंजी असून, खरीप हंगामात झालेल्या प्रत्यक्ष नुकसानीच्या तुलनेत ही मदत अपुरी आणि अन्यायकारक आहे. शेतकरी महेश पोंगडे यांनी सांगितले की, जिल्ह्यासह सुधागड तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांचे शेतीचे क्षेत्र काही गुंठ्यांच्या दरम्यान आहे. तसेच, खरीप हंगामात भात पिक नर्सरी पंचनामे झाल्यामुळे क्षेत्र नोंदणी कमी झाली आहे. त्यामुळे हेक्टर आधारित मदतीच्या गणनेत हे अल्प क्षेत्रधारक शेतकरी यांना गुंठेवारीनुसार प्रति गुंठा फक्त १०० रुपये मदत मिळणार असल्याचे या शासन निर्णयामध्ये दिसत आहे. त्यामुळे शासनाने याबाबत स्पष्टता द्यावी. वाढीव नुकसान भरपाईचा विचार करावा. तसेच, शासनाच्या मदत पॅकेजमध्ये लवचिकता, न्याय्य परिगणना आणि स्थानिक परिस्थितीचा विचार होणे अत्यावश्यक आहे, अन्यथा शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढत जाईल, असे त्यांनी सांगितले.

> **अतिवृष्टी व परतीच्या पावसामुळे येथील शेतकरी शेती न विकता, ती ओसाड न ठेवता हिंमतीने शेती करत आहेत. त्यांना प्रति गुंठा ५ हजार नुकसान भरपाई देऊन त्यांना वर्षानूवर्षे शेती करण्यासाठी प्रोत्साहन भत्ता दिला पाहिजे.**
> **– महेश पोंगडे, शेतकरी, सुधागड**

# भाजपला हेच हवे आहे?

मतदारयादीतील भानगडींबाबत विरोधकांनी मुंबईत काढलेल्या सत्याच्या मोर्चाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. निवडणुका, मतदान आणि मतमोजणी यांमध्ये बरेच घोटाळे होत असून भाजपवाले चालबाजी करीत आहेत असा सामान्य माणसाचा विश्वास पक्का होऊ लागला आहे. त्यामुळे हा केवळ राजकीय पक्षांचा मोर्चा न राहता सामान्य मतदारही त्यात सहभागी झाले होते. भाजपबाबत सर्वांनाच संशय असला तरी विरोधकांचा मोर्चा निवडणूक आयोगाच्या विरोधात होता व मतदारयादीतील दुबार आणि बोगस मतदार हटवावेत अशी त्यांची प्रमुख मागणी होती. याला आयोगाने उत्तर देणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात दरवेळीप्रमाणे भाजपने हा आरोप आपल्या अंगावर घेतला व मोर्चाला प्रत्युत्तर म्हणून तथाकथित मूकमोर्चा काढला. चोराच्या मनात चांदणे असते ते असे. वास्तविक दुबार वा दुहेरी मतदार किंवा बोगस नावे वा पत्त्यांच्या नोंदी या सर्वच पक्षांना त्रासदायक ठरत असल्या पाहिजेत. त्यामुळे भाजपने मोर्चातील मागण्यांना पाठिंबाच द्यायला हवा होता. पण त्याने मोर्चा काढणाऱ्या विरोधकांनाच वेड्यात काढण्याचा प्रयत्न केला. मतदारयादीमध्ये नावे घुसवणे वा वगळणे हे भाजपच्या इशाऱ्यावरून होते आहे हा विरोधकांचा आरोप आहे. त्यासाठी भाजपशी संबंधित काही व्यक्ती वा संस्था कार्यरत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यांची काही नावेही काँग्रेस नेत्यांनी उघड केली होती. हे आरोप खोडायचे असतील तर त्यांची निःपक्षपाती चौकशी व्हायला हवी. आयोगानेही मतदारयादीतील घोळ मान्य करून ते दुरुस्त करण्यात येतील अशी भूमिका घ्यायला हवी. बाहेरून कोणी व्यक्ती एखाद्या मोबाईल एपद्वारे नावे घालू वा काढू शकते का हेही नीट तपासून पाहायला हवे. पण आयोगाने याबाबत सतत नकाराचा पवित्रा घेतला आहे. याबाबत विरोधकांनी जे पुरावे दिले आहेत त्यापैकी काही नावे घेऊन ती कोणी घातली वा काढली हे शोधून काढणे सहज शक्य आहे. यात काही तांत्रिक त्रुटी असतील तर त्यांचा कोण गैरफायदा घेतो आहे का हे तपासणेही शक्य आहे. नव्हे आयोगाची ती जबाबदारीच आहे. पण ते करण्याऐवजी विरोधकांना खोटे पाडण्यातच आयोगाची सर्व शक्ती चालली आहे.

### मूक मोर्चावाल्यांची बडबड

कहर म्हणजे आदल्या दिवशी मूक मोर्चा काढणाऱ्या भाजपने सोमवारी तोंडाळपणाची हद्द गाठली. आशिष शेलार यांनी यात हिंदू विरुध्द मुस्लिम असा वाद उभा करण्याचा हास्यास्पद प्रयत्न केला. हे शेलार वकिलीचे शिक्षण घेतलेले आहेत. सध्या सांस्कृतिक खातेही त्यांच्याकडे आहे. त्यामुळे त्यांच्याकडे किमान बुध्दिमत्ता, तर्कशक्ती आणि किमान सभ्यपणा असावी हे अपेक्षित आहे. पण भाजपवाले हमखास अशा अपेक्षांना टांग मारतात. त्यानुसार शेलार यांनी मुस्लिम दुबार मतदारांचा तथाकथित मुद्दा उपस्थित केला. विरोधकांचे आमदार जिथून निवडून आले आहेत त्या जामखेड, मुंब्रा, इस्लामपूर इत्यादी मतदारसंघांमध्ये हजारोंनी दुबार मुस्लिम मतदार असून त्याविषयी विरोधक गप्प का असा त्यांचा सवाल होता. वास्तविक शिवसेना, मनसे वा दोन्ही काँग्रेस यापैकी कोणीही हा मुद्दा उपस्थित करताना हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन असा फरक केला नव्हता. मतदारांची नावे दोन ठिकाणी असणे हा दोष आहे, त्यात धर्माचा काही संबंध नाही. विरोधक यावर गप्प असण्याचे काही कारण नाही. हे असले मुद्दे काढून आपण विरोधकांच्या दुबार मतदारांच्या आरोपाचा पुरावाच देत आहोत हेही वकीलबुवा शेलार यांच्या ध्यानात आले नाही. दुसरे म्हणजे, इतक्या संख्येने दुबार मुस्लिम मतदार असतील तर हिंदुत्वाचे रक्षण करण्याचा दावा करणारा भाजप काय करीत होता असा प्रश्न निर्माण होतो. आजवर त्याने हा प्रश्न का उपस्थित केला नाही? एरवी लव्ह जिहादच्या नावाने मोर्चे काढणारे हे दिवटे हिंदुत्ववाले असल्या मुद्द्यांवर गप्प बसतील हे संभवतच नाही. थोडक्यात प्रकरण भाजपच्या अंगावर शेकायला लागल्यावर समोरच्याला देशद्रोही ठरवायचे किंवा त्यात हिंदू-मुस्लिम वाद निर्माण करायचा हा यांचा नेहमीचा उद्योग आहे. भाजपने हा पोरकटपणा आता बंद करावा. मुस्लिम नव्हे तर सर्वच दुबार मतदारांचा प्रश्न त्याने निवडणूक आयोगाकडे लावून धरावा. आयोग सध्या केवळ भाजपचेच ऐकतो हे दिल्लीपासून मुंबईपर्यंत सर्वत्र दिसते आहेच. या निमित्ताने का होईना मतदारयादीतील भानगडी दूर होतील. पण तसे न केल्यास या भानगडी म्हणजे भाजपचेच कारस्थान आहे हा समज पक्का होईल.

### प्रकरणे न्यायालयात जातील

शनिवारच्या मोर्चामध्ये शिवसेना व मनसे एकत्र होते. राज ठाकरे यांनी विविध मतदारसंघातील दुबार मतदारांची संख्या वाचून दाखवली व या दुबारांच्या नावांच्या याद्याच मोर्चापुढे ठेवल्या. या याद्या साफ झाल्याखेरीज निवडणुका होऊ देणार नाही असा इशारा राज काही दिवसांपासून देत आहेत. अशा निवडणुकांवर बहिष्कारच घालू असेही ते म्हणत आहेत. मात्र हे करणे भाजपच्या पथ्यावर पडणारे ठरेल. निवडणुकीत पराभव होणार असल्यानेच विरोधक हा प्रचार करीत असल्याचा आरोप भाजपवाले करीत आहेतच. त्यात भर पडेल. उद्धव ठाकरे यांनी या प्रकरणी न्यायालयात जाणार असल्याची घोषणा केली आहे. पण निवडणूक आयोगाने त्यांना न जुमानता मंगळवारी पत्रकार परिषद घेतली व नगरपंचायतींचा कार्यक्रम जाहीर केला. आता निवडणूक प्रक्रिया सुरू झाली असे मानले जाईल. आणि, एकदा ही प्रक्रिया सुरू झाली की त्यात न्यायालये हस्तक्षेप करीत नाहीत. त्यातच जिल्हा परिषदा व पालिकांच्या निवडणुका तीन ते पाच वर्षे रखडल्या आहेत. त्या येत्या जानेवारीच्या आत घ्या असा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आहे. त्याचा हवाला देऊन निवडणूक आयोग सोईस्करपणे विधानसभेला वापरलेल्या मतदारयाद्याच पुन्हा वापरल्या जाणार आहेत. लोकसभा ते विधानसभा निवडणुकांच्या दरम्यानच्या सहा महिन्यांच्या काळात गेल्या वर्षी अभूतपूर्व ४५ लाख नवीन मतदारांची नोंदणी झाली होती. यामध्ये प्रचंड भानगडी होत्या व त्याचमुळे आपला पराभव झाला असे विरोधकांना वाटते व ते सकृतदर्शनी खरे वाटते. महाराष्ट्रातील जनतेच्याच नव्हे तर खुदद महायुतीच्या मतदारांच्या मनातही या भानगडींचा संशय आहे. अशा स्थितीत आयोगाने त्याच मतदारयाद्या रेटण्याचा प्रयत्न केला तर सामान्य लोकांचा निवडणूक प्रक्रियेवरचा विश्वास डळमळीत होईल. आयोगाची लपवाछपवी, उडवाउडवी ही लोकशाहीसाठी अत्यंत घातक ठरू शकते. त्यामुळे आयोगाने वेळीच भानावर यावे व याद्यांबाबत विरोधकांना विश्वासात घेऊन कार्यवाही करावी. यासाठी राज ठाकरे म्हणाले त्याप्रमाणे निवडणुका आणखी एक-दोन महिने पुढे गेल्या म्हणून काही बिघडणार नाही. इव्हीएमबाबत विरोधकांना आधीपासून शंका आहेतच. त्यात हा दुबार व बोगस मतदारांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्याकडे लक्ष न देता आयोग निवडणुका रेटू पाहील तर ते कोणाच्याच हिताचे राहणार नाही. नंतर याबाबतची प्रकरणे न्यायालयात जाऊन हा सर्व गोंधळ आणखी वाढेल व निवडून आलेल्यांना कारभार करणे अशक्य होईल. अर्थात, भाजपला हेच हवे आहे की काय अशी शंका त्यांच्या वागण्यावरून येत आहे.

विचार

# अमेझॉन नेटवर्क आउटेजचे गंभीर संकट

*अलिकडेच अमेरिकेतील एका डेटा सेंटरमध्ये ॲमेझॉन कंपनीच्या वेब सेवेच्या एका मोठ्या केंद्रात इंटरनेट पत्त्यांची माहिती देणारी यंत्रणा अचानक काम करेनाशी झाली. ही अडचण माहितीचा साठा ठेवणाऱ्या मोठ्या व्यवस्थेच्या संपर्क खुणांपर्यंत पसरली. परिणामी, लाखो सॉफ्टवेअर ॲप्स, वेबसाइट्स आणि इंटरनेट जोडणी असलेलल्या साधनांचे कामकाज बंद पडले. याचा परिणाम अवघ्या जगाला जाणवला. असे का घडले?*




डॉ. दीपक शिकारपूर

एकविसाव्या शतकाची सुरूवात होऊन आता २५ वर्षे झाली आहेत. तरीही, गेल्या पंधरा-वीस वर्षांमध्ये ज्या प्रकारे बदल झाले, तितके त्याआधीच्या ५० वर्षांमध्येही झाले नव्हते असे म्हणता येईल. कॉंप्युटर, इंटरनेट, त्यानंतर आलेला स्मार्टफोन यांच्या जमलेल्या गूळपीठामुळे महानगरांपासून खेड्यांपर्यंत सर्वांच्याच जीवनात फरक पडला. संगणक आणि संगणकीय प्रणाली पूर्वीप्रमाणे फक्त सांगकाम्या राहिल्या नसून मानवी व्यवहार जास्त चांगल्या पद्धतीने समजून घेण्याची क्षमता त्यांना दिली जात आहे. बदलत्या तंत्रज्ञानाचे परिणाम अनेक क्षेत्रांमध्ये क्रांतिकारी परिवर्तनाने जाणवणार आहेत. आपल्या आसपासच्या डिजिटल विश्वाची सतत उत्क्रांती होत राहणार आहे. त्यामुळेच या तंत्राचे व्यावहारिक उपयोगही वाढताना दिसणार आहेत. हे एक असे युग आहे, जिथे तंत्रज्ञानाचा वापर सर्व क्षेत्रात वाढत आहे. या युगात आपल्या दैनंदिन जीवनात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. अनेक व्यवसाय आणि व्यक्ती पूर्णपणे डिजिटल तंत्रावर अवलंबून आहेत. बँकिंग, ई कॉमर्स, सोशल मीडिया, गेमिंग, स्ट्रीमिंग, उद्योगांचे क्लाउडआधारित ऑपरेशन्स यापैकी बऱ्याच गोष्टी ऑनलाइन अवलंबून आहेत. 'रोटी, कपडा आणि मकान'नंतर इंटरनेट आणि डिजिटल उपकरणे या अत्यावश्यक गरजा बनल्या आहेत. अशा परिस्थितीत डिजिटल सेवा ठप्प झाल्यास अनेक प्रकारचा मनस्ताप आणि नुकसान होईल, हे नक्की. असेच काही तरी ऐन दिवाळीत घडले. ॲमेझॉन वेब सर्व्हिस औटेज हे त्या संकटाचे नाव. औटेजचा म्हणजे सेवा किंवा पुरवठा तात्पुरता खंडित होणे किंवा उपलब्ध नसणे.

२० ऑक्टोबर २०२५ या दिवशी एक मोठी गोष्ट घडली. अमेरिकेतील व्हर्जिनिया भागातील एका मुख्य माहितीगृहात (डेटा सेंटरमध्ये) अडचण आली. हे माहितीगृह ॲमेझॉन कंपनीच्या जागतिक जाळ्याचे (वेब सेवेचे) एक मोठे केंद्र आहे. या केंद्रात इंटरनेट पत्त्यांची माहिती देणारी यंत्रणा (प्रणाली) अचानक काम करेनाशी झाली. ही अडचण माहितीचा साठा ठेवणाऱ्या एका मोठ्या व्यवस्थेच्या (डेटाबेस सेवेच्या) संपर्क खुणांपर्यंत पसरली. परिणामी, लाखो सॉफ्टवेअर ॲप्स, वेबसाइट्स आणि इंटरनेट जोडणी असलेली साधने (उपकरणे) थांबली आणि त्यांचे कामकाज बंद पडले. सेवा थांबण्याचा हा काळ जवळपास पंधरा तास चालला. याचा परिणाम एका देशापुरता नव्हता, तर संपूर्ण जगाला जाणवला. धन व्यवहार (बँकिंग), मनोरंजनासाठीचे खेळ, वस्तूंची खरेदी-विक्री आणि सरकारी खात्यांची कामे अशा अनेक महत्त्वाच्या सेवा खोळंबल्या. आपल्या देशातही या आउटेजचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर जाणवला. त्यामुळे ई-कॉमर्स कंपन्या आणि ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, पेटीएम, रेझरपेसारख्या पेमेंट गेटवे प्लॅटफॉर्म्सच्या काम ात व्यत्यय आला. बरेच भारतीय स्टार्टअप्स ॲमेझॉन क्लाउड सेवेवर अवलंबून असल्यामुळे ग्राहक सेवा आणि व्यवहार ठप्प झाले. हा प्रसंग दिवाळीच्या दिवशीच घडल्यामुळे ऑनलाइन खरेदी, स्ट्रीमिंग आणि डिजिटल पेमेंट्सवर मोठा परिणाम झाला. अशा या नेटवर्क औटेजची सामान्य कारणे समजून घ्यायला हवीत. यामुळे हार्डवेअर बिघाड रूटर्स, स्विचेस, सर्व्हर किंवा डेटा केबल्समधील दोषांमुळे सेवेत अडथळा येतो.

कॉन्फिगरेशन चुका, चुकीचे अपग्रेड्स, फर्मवेअर बग्ज किंवा डीएनएस सेटिंग्जमधील त्रुटी एखाद्या कंपनीची सेवा मोठ्या प्रमाणावर ठप्प करू शकतात. अशा वेळी डिनायल ऑफ सर्विस (डिओएस) हल्ल्यांमुळे नेटवर्क अतिभारित होते आणि अनुपलब्ध बनते. विद्युत पुरवठ्यातील अडथळ्यांमुळे डेटा सेंटरमध्ये युपीएस किंवा जनरेटर फेल होऊन सेवा बंद पडतात. मानवी त्रुटी, कॉन्फिगरेशन किंवा ऑटोमेशन स्क्रिप्ट्समधील चुकांमुळे मोठ्या प्रमाणावर परिणाम होऊ शकतो. म्हणूनच नेटवर्क औटेज टाळण्याच्या काही उपाययोजना महत्वाच्या ठरतात. आजच्या काळात इंटरनेट आणि नेटवर्क सेवा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनल्या आहेत. त्या अचानक थांबणे हा मोठा धोका ठरतो, कारण त्यामुळे आर्थिक नुकसान आणि कामाची प्रचंड हानी होऊ शकते. अशा सेवा थांबण्यापासून बचाव करण्यासाठी काही सोपे उपाय सांगितले जातात. पहिला उपाय म्हणजे दुप्पट व्यवस्था (कंट्रोलड रिडंडसी) कार्यरत ठेवणे. म्हणजेच प्रत्येक सेवेची दुप्पट व्यवस्था सुनिश्चित करणे. भारतातील कुठल्याही घरी दहा पाहुणे जेवायला बोलावले असल्यास गृहिणी वीस लोकांचा स्वयंपाक करतात. हे तसेच आहे. दुसरा महत्वाचा उपाय म्हणजे नेटवर्क मार्ग कार्यरत असणे. एकाच वेळी दोन किंवा त्याहून अधिक इंटरनेट सेवा पुरवठादारांकडून (आयएसपी ) जोडणी घ्यावी. आणीबाणीच्या प्रसंगी त्याचा मोठा फायदा होतो. एका कंपनीची सेवा बंद पडल्यास लगेच दुसऱ्या मार्गाने काम सुरू ठेवता येते.

अन्य काही उपाय हार्डवेअर नेटवर्क यंत्रसामग्रीच्या रुपात योजता येतात. सर्व्हर, राउटर आणि स्विच यासारखी महत्त्वाची यंत्रे अतिरिक्त संख्येने उपलब्ध ठेवावी लागतात. एक यंत्र बिघडल्यास, दुसरे आपोआप काम सुरू करते. याला फेलोवर सेफ्टी व्यवस्था म्हणतात. याच कारणासाठी वाहनात स्टेपनी टायर असते. म्हणूनच कंपन्यांनी शक्य असल्यास माहिती साठवणारे केंद्र (डेटा सेंटर) एकाच ठिकाणी न ठेवता वेगवेगळ्या ठिकाणी ठेवली पाहिजेत. यामुळे एखाद्या ठिकाणी नैसर्गिक आपत्ती (भूकंप किंवा पूर) आल्यास, दुसऱ्या ठिकाणाहून सेवा सुरू ठेवता येते. येथे नमूद करण्याजोगी आणखी एक बाब म्हणजे सेवा घेताना आपल्या यंत्रणेची नियमित देखरेख आणि तपासणी करणेही गरजेचे आहे. नेटवर्क सेवा अखंड सुरू ठेवण्यासाठी अशी देखरेख अत्यंत आवश्यक असते. यात स्वयंचलित प्रणालींची भूमिका महत्वाची असते. नेटवर्कमधील प्रत्येक घटकावर सतत लक्ष ठेवणारी स्वयंचलित साधने वापरावी लागतात. यामुळे मोठी समस्या येण्यापूर्वीच लहान त्रुटी ओळखता येतात आणि लगेच दुरुस्त करता येतात. यंत्रणा अद्ययावत ठेवणेही विशेष गरजेचे ठरते. त्यासाठी यंत्रणेच्या उत्तम वापरासाठी सर्व सॉफ्टवेअर आणि उपकरणे वेळेवर अपडेट केली पाहिजेत. जुन्या तंत्रज्ञानात अनेक त्रुटी असतात, ज्यामुळे सेवा थांबण्याची शक्यता वाढते. म्हणूनच हे पाऊल महत्वाचे ठरते. वीज पुरवठा हा असाच एक दखलपात्र मुद्दा. नेटवर्क उपकरणांसाठी अखंड वीजपुरवठा यंत्रणा आणि जनरेटर सेवा उपलब्ध असणे अनिवार्य आहे. विजेच्या अनियमिततेमुळे किंवा सेवेत खंड झाल्यामुळे सेवा थांबणार नाही, याची काळजी घ्यावी लागते.

या टप्प्यावर आणखी काही प्रकारची काळजीही महत्वाची ठरते. त्यात सुरक्षितता आणि प्रशिक्षणाचा समावेश होतो. सेवा अखंड सुरु रहावी यासाठी केवळ तांत्रिक उपाय पुरेसे नाहीत; तर मानवी घटक आणि सुरक्षिततेकडेही लक्ष देणे महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ सायबर हल्ला संरक्षण. नेटवर्कवर होणारे सायबर हल्ले सेवा बंद पाडू शकतात. यासाठी मजबूत फायरवॉल आणि सुरक्षितता प्रणाली वापरावी लागतात. नेटवर्क चालवणाऱ्या कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण देणेही महत्वाचे ठरते. त्यांना अडचणी आल्यास काय करायचे, याचे स्पष्ट नियम तयार असावेत. सेवा थांबल्यास काय करायचे, याचे आणीबाणीचे नियोजन प्रत्येक कंपनीकडे तयार असणे महत्वाचे ठरते. कर्मचाऱ्यांनी या नियोजनानुसार वेळोवेळी सराव करणे गरजेचे आहे. ताज्या ॲमेझॉन नेटवर्क आऊटेजने हे सिद्ध केले की डिजिटल अर्थव्यवस्थेत स्थैर्य राखण्यासाठी फक्त एका तंत्रज्ञान पुरवठादारावर अवलंबून राहणे घातक ठरू शकते. भविष्यातील सुरक्षेसाठी कंपन्यांनी विविध क्लाउड पुरवठादार, डेटा सेंटर क्षेत्रे आणि डीएनएस व्यवस्थापन वापरून स्वतःची डिजिटल संगणक व्यवस्था अधिक सशक्त, सक्षम ठेवणे हेच खरे शहाणपण ठरेल.

deepak@deepakshikarpur.com
**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

# प्रशासनाचे वरातीमागून घोडे!



राकेश लोहार

रायगड जिल्ह्यातील धोकादायक अवस्थेतील पूल आणि साकवांचा प्रश्न नवीन नाही. प्रसारमाध्यमांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी याविरोधात वेळोवेळी आवाज उठवला आहे. पण, प्रशासनाची बेफिकीरी मात्र दिवसेंदिवस वाढत चालल्याचे दिसून येत आहे. जीव धोक्यात घालणारे हे पूल वर्षानुवर्षे दुरुस्तीच्या प्रतिक्षेत आहेत. परंतु, पावसाळा आला की, सार्वजनिक बांधकाम विभाग 'पूल कमकुवत असून, अवजड वाहनांसाठी बंद' एवढे सूचना फलक लावण्यापलीकडे आजतागायत काहीच करीत नाही, हीच मोठी शोकांतिका आहे. पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करणे आवश्यक असताना, त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. आणि, पुलांचे ऑडिट करुन त्यात जे पूल कमकुवत असल्याचे अहवाल देण्यात आलेत, त्यावरुन बिनधास्तपणे अवजड वाहतूक सुरू असून, त्याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत आहे. निष्काळजी कामाचा फटका सर्वसामान्यांना बसत आहे. परंतु, त्याचे कोणतेच सोयरसूतक प्रशासनाला नाही, असेच म्हणावे लागेल. कारण, अहवालातून वस्तुस्थिती दिसत असतानाही त्याकडे दुर्लक्ष करायचे आणि दुर्घटना झाल्यावर त्याकडे धाव घ्यायची, असे वरातीमागून घोडे मिरविण्याची जणू या प्रशासनाला आता सवयच लागून गेल्याचे दिसून येत आहे. निष्पाप लोकांचे जीव जाण्यापर्यंत वाट पाहण्याऐवजी, जीव जाऊ नये यासाठी वेळीच उपाययोजना केल्यास गंभीर परिस्थिती उद्भवणार नाही, याची जाणीव प्रशासनास असू नये, याबाबत आश्चर्य वाटते.

याआधीच रोहा मार्गावरील नांगरवाडी येथील साकव कोसळले आहे. आता वढाव येथील पूल कोसळला. जीवितहानी टळली असली तरी धोका कायम होताच. परंतु, प्रशासन कोणतीही बाब गांभीर्याने घेत नाही, त्याचा फटका सामान्य जनतेला सोसावा लागतो. एसी केबिनमध्ये बसून असणाऱ्या अधिकाऱ्यांना याची झळ कधीच पोहोचणार नाही. परंतु, सर्वसमान्य जनतेला मात्र रोज मरणयातना भोगाव्या लागत आहेत. जनतेच्या जीवाशी खेळण्याचा अधिकारा यांना दिला कोणी? अधिकारी म्हणजे मोठे कोणी नाही! तुम्ही लोकसेवक आहात, याची जाण आपणास असायला हवी. लोकांच्या कामांना, त्यांच्या अडचणी सोडवायला तुम्हाला तिथे बसवलेय, हे ध्यानात घेऊन काम करावे, अशी सामन्य जनतेची अपेक्षा आहे. परंतु, वारंवार तक्रारी देऊनदेखील अधिकारी लोक प्रश्नांकडे दुर्लक्ष करीत असतील, आणि त्यानंतर अशा दुर्घटना घडत असतील, तर त्या जबाबदार अधिकाऱ्यांना सदोष मनुष्यवधाचा गुन्हा का दाखल करु नये?

सध्या जे पूल कोसळत आहेत, हे फक्त अपघात नाहीत, तर प्रशासनाच्या निष्क्रियतेचा आणि बेफिकीरीचा थेट पुरावाच आहे. सरकार आणि प्रशासन नेहमीच ग्रामीण भागातील पूल, रस्ते दुरुस्तीकडे दुर्लक्ष करीत आले आहे, असे माझे ठाम मत आहे. कारण, वेळच्या वेळी काम झाली असती, तर अशा दुर्घटना वारंवार झाल्याच नसत्या. अधिकाऱ्यांना सर्वसामान्यांच्या जगण्या-मरण्याचा काय फरक पडणार आहे का? गलेलठ्ठ पगार, आरामशीर खुर्चीत बसून कारभार करायचा, तोही असा! दुसरे काय करताहेत हे अधिकारी, असा प्रश्न आता सामान्य जनताच विचारु लागली आहे. त्यांच्या संतापाचा आता उद्रेक होणेच बाकी आहे. ही जनता जर रस्त्यावर उतरली, तर कामात दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांना पळताभुई थोडी होईल, हे मात्र निश्चित.

जिल्ह्यातील पूल, रस्ते, साकव आज धोकादायक अवस्थेत आहेत. तातडीने दुरुस्ती न केल्यास भीषण अपघात यापुढेही होतच राहतील. अनेकदा अपघाताची घटनास्थळे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणूनदेखील त्यावर उपाययोजना करण्याऐवजी हा रस्ता आमचा नाही, तो रस्ता आमचा नाही, अशी उडवाउडवीची उदाहरणे देऊन हेच अधिकारी वेळ मारुन नेतात. परंतु, उपाययोजना करणे तसेच राहते. यावर कुठेतरी अंकुश असला पाहिले. अलिबाग-कुरुळ मार्गावरील मोऱ्यांना कठडे नाहीत, याठिकाणी मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. याबाबत कित्येकदा अधिकाऱ्यांच्या कानावर घातले आहे. परंतु, याबाबतील करतो, बघतो, असेच अधिकाऱ्यांचे सुरू आहे. त्यामुळे अशा ठिकाणी मोठा अपघात झाल्यावर त्याला सर्वस्वी जबाबदार हे संबंधित अधिकारीच असतील. आणि अशा अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल व्हायलाच हवेत. एखादा अपघात होऊ नये, यासाठी आधीच उपाययोजना केल्यास पुढील अनर्थ टळेल. अपघात झाल्यावर सारा लवाजमा घेऊन येण्यापेक्षा अधिकाऱ्यांनी आधीच मार्ग आपले काम चोख करावे, त्यामुळे गंभीर प्रसंग उद्भवणार नाही. परंतु, त्या करण्याचे कर्तव्यच संबंधित प्रशासन करीत नसेल, तर त्यांना जाब विचारावाच लागेल.

लोकसंसद

## योग्य वेळ येताच नियतीने 'अमोल' न्याय केला!



भारतीय महिला क्रिकेट संघाने इतिहासात प्रथमच एक दिवसीय क्रिकेट स्पर्धेचा विश्वचषक उंचावला आणि त्याचवेळी 'चक दे इंडिया' या चित्रपटातील महिला हॉकी संघाचा प्रशिक्षक कबीर खानची सर्वांना आठवण झाली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत चित्रपटातील कबीर खान आपल्या दुर्दम्य इच्छाशक्तीच्या आणि कुशल डावपेचांच्या बळावर महिला हॉकी संघाला विश्वविजेतेपद मिळवून देतो. पण चित्रपटातील 'कबीर खान'ची वास्तव जीवनातील भूमिका पार पाडली ती आपल्या मराठमोळ्या अमोल मुजुमदारने! शेवटपर्यंत हार मानायची नाही अशी संघातल्या खेळाडूंना सातत्याने प्रेरणा देत, स्पर्धेत बाद फेरीतच गाशा गुंडाळायची परिस्थिती आली असताना अमोलने महिला क्रिकेट संघाचे मनोबल उंचावत भारतीय संघाला विश्वविजेतेपद मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला. १७१ प्रथम श्रेणी क्रिकेट सामन्यांमध्ये ११९६७ धावा, पदार्पणाच्या रणजी सामन्यात २६० धावा, एकूण ३० शतके आणि ६० अर्धशतके, ४८.१३ धावांची नेत्रदीपक सरासरी, क्षेत्ररक्षण करताना टिपलेले १६२ झेल, २००६-०७ मोसमात मुंबईला रणजी करंडक मिळवून देणारा कर्णधार! होय, हे सर्व वर्णन आणि आकडेवारी ज्याची आहे तो खेळाडू म्हणजे अमोल मुजुमदार! पण एवढी सारी कर्तबगारी असूनही अमोलला भारतीय संघाचा टिळा लागला नाही. पण योग्य वेळ येताच नियतीने न्याय केला. अमोल मुजुमदार यांनी भारतीय महिला क्रिकेट संघाला विश्वचषक जिंकून देण्यामध्ये मुख्य प्रशिक्षक म्हणून मोलाची भूमिका बजावली आणि क्रिकेटच्या इतिहासात त्यांचे नाव सुवर्ण अक्षराने कोरले गेले.

**-प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# शब्दांचीही सुमने फुलती, येता घरोघरी देव दीपावली

कार्तिक महिन्यात येणाऱ्या पौर्णिमेच्या 'त्रिपुरारी पौर्णिमा' असे म्हणतात. त्रिपुरारी पौर्णिमा म्हणजे दिवाळी सणाचा उत्तरार्ध आहे. याच दिवशी देवदिवाळी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. कार्तिक शुद्ध पौर्णिमेला हिंदू धर्मातील दोन पवित्र तत्व म्हणजे शिव आणि विष्णू यांची भेट होते. म्हणून घरोघरी दिवे प्रज्वलीत केले जातात. घरी रांगोळ्या काढल्या जातात. फटाक्यांची आतषबाजी होते. कार्तिक पौर्णिमेला मुख्यत्वे करून कार्तिकेयाचे पूजन केले जाते. एकादशीपासून सुरू झालेले तुळशी विवाह करण्याचा हा शेवटचा दिवस असतो. या दिवशी 'हरिहर भेट' म्हणजे विष्णू आणि शंकराची भेट होते, असे मानले जाते. म्हणून त्यावेळी बेल व तुळस वाहून त्यांची पूजा करतात. कार्तिक शुद्ध पौर्णिमेला त्रिपुरारी पौर्णिमा असं म्हणतात. यादिवशी प्रत्येक मंदिरातून विशेषतः शिवमंदिरातून त्रिपुर वाती लावल्या जातात. मंदिर परिसर लक्ष लक्ष दिव्यांनी उजळून निघतो. अनेक ठिकाणी याला देव दिवाळी म्हणूनही संबोधलं जातं. या दिवशी फक्त शिवमंदिरच नाही तर घरोघरी, अंगणातात देखील दिव्यांची आरास केली जाते. याच दिवशी भगवान शंकारांनी त्रिपुरासुरांचा वध केला होता, अशी मान्यता आहे, म्हणूनच ते त्रिपुरारी या नावानेही ओळखले जातात. त्रिपुरासुरांच्या वधाची एक अख्यायिका सांगितली जाते.

तारकासुरांच्या वधानंतर त्याच्या तीन दैत्य पुत्रांनी ब्रह्मदेवाला कठोर तपश्चर्या करून प्रसन्न केले. थोरला तारकाक्ष, मधला विद्युन्माली आणि धाकटा कमलाक्षने ब्रह्मदेव प्रसन्न झाल्यावर त्यांच्याकडून अढळ अशा तीन अद्भुत स्थानांचा वर मागून घेतला. ही तीन स्थानं (पुरे) त्रिपुरे म्हणून ओळखली जायची. त्रिपुरे म्हणजे तीन शहरे, जी आकाशातून फिरणारी असावीत. हजारो वर्षांनी ही शहरे एका ठिकाणी यावीत. त्या वेळी, मध्यान्ह समयी, अभिजीत मुहूर्तावर व चंद्र- पुष्य नक्षत्रावर असताना आणि आकाशातून पुष्करावर्त नावाच्या नीलमेघांची छाया पडलेली असताना जर कोणी असंभव स्थानातून एकाच बाणाने तीनही पुरांना बाण मारला तरच ती जळून नष्ट व्हावी, नाहीतर ती कधीही नष्ट होऊ नयेत! असा वर त्यांनी ब्रह्मदेवांकडे मागितला होता. या त्रिपुरासुरांनी तिन्ही लोकांत हाहाकार माजवला. देवांनी मदतीसाठी शंकराचा धावा केला आणि महादेवांनी असंभव गोष्ट संभव करून एका बाणात त्रिपुरी भस्म करून टाकली अशी अख्यायिका सांगितली जाते. यादिवशी शिव आणि विष्णुची भेट होते म्हणून बेल, तुळस वाहून पूजा करण्याची प्रथा आहे. त्रिपुरारी पौर्णिमा हा भगवान शंभोशंकराच्या विजयाला समर्पित आहे. या दिवशी, भगवान शिवांनी त्रिपुरासुराचा वध केला होता. यामुळे, या दिवशी त्रिपुरा राक्षसाचे प्रतीक म्हणून साडेसातशे त्रिपुरवातींचे हवन केले जाते. त्रिपुरारी पौर्णिमेला भगवान शिवाची पूजा केल्याने जीवनातील अंधकार दूर होतो आणि सर्व समस्यांचे देवघरात दिवा लावल्यानंतर घराच्या प्रवेशद्वारावर आणि तुळशीपाशी आवर्जुन दिवा लावावा, असे सांगितले जाते. कार्तिक पौर्णिमेला सायंकाळी चंद्राला अर्घ्य द्यावे, असे म्हटले जाते. असे केल्याने कुंडलीतील चंद्र बळकट होण्यास मदत मिळते, अशी मान्यता आहे असे म्हणतात. त्रिपुरासुराच्या कथेप्रमाणे त्रिपुरासुराने जो उच्छाद मांडला होता, त्याला श्रीशंकर भगवानांनी शह दिला. त्रिपुरासुराच्या जाचातून सर्व देवतांची सुटका झाली. अनेक वर्षे त्रिपुरासुराच्या जाचात असलेल्या देवतांनी कार्तिक पौर्णिमेला जणू काही मोकळा श्वास घेतला आणि स्वर्गलोकात आपले आसनस्थान ग्रहण केले. तो दिवस देवतांसाठी दिवाळीपेक्षा कमी नव्हता. त्यामुळे स्वर्गात आणि देवलोकात हा दिवस 'देवदिवाळी' म्हणून साजरा केला जाऊ लागला. त्यामुळे हिंदू संस्कृतीत 'त्रिपुरारी पौर्णिमे'च्या दिवशी देवदिवाळी साजरी केली जाते. याचदिवशी श्रीविष्णूचा विवाहदेखील झाला होता, असा समज असल्यामुळे या तिथीला 'देवदिवाळी' असे ही म्हटले जाते. शंभोशंकराच्या भक्तांसाठी त्रिपुरारी पौर्णिमा हा सण विशेष महत्त्वाचा आहे.

पान १ वरून

## आयोगाची ‘स्टार’ खेळी

**कोणत्या विभागात किती नगरपरिषद, नगरपंचायती?**

कोकण १७, नाशिक ४९, पुणे ६०, संभाजीनगर ५२, अमरावती ४५, नागपूर ५५

**महिलांसाठी खास गुलाबी मतदान केंद्र**

निवडणूक आयोगाने यावेही मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी ३२ कॅम्पेन बनवण्यात आल्याचही माहिती दिली. दिव्यांग मतदार, तान्ह्या बाळासह स्त्रिया, ज्येष्ठांना पहिल्यांदा मतदान करु दिले जाईल. अनेक ठिकाणी गुलाबी मतदान केंद्र स्थापन करण्यात येणार आहेत. या केंद्रांवर सर्व अधिकारी व कर्मचारी या महिला असतील.

अधिक मतदार मतदान करतील. या निवडणुका इलेक्ट्रॉनिक मशीन आणि बॅलेट युनिट वारण्यात येतील, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली. त्यामुळे मंगळवारपासून संपूर्ण राज्यात आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.

राज्यातील २९ महापालिका, ३२ जिल्हा परिषदा, ४२ नगर पंचायती, ३३६ पंचायत समिती, २४६ नगरपालिकांची मुदत संपली असून, त्यासाठी निवडणुका घेण्यात येणार आहेत. त्याच्या पहिल्या टप्प्यात नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुका घेण्यात येणार असल्याचे राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केले आहे.

**दुबार मतदारांसमोर डबल स्टार येणार**

दुबार मतदारांचा प्रश्न सोडविण्यासाठी एक टूल तयार करण्यात आला आहे. त्यानुसार, ज्या मतदारांची दुबार नावे आहेत, त्या ठिकाणी दोन स्टार्स असतील. या मतदारांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला जाईल. त्या मतदाराला त्या कोणत्या मतदान केंद्रावर मतदान करायचे आहे, हे विचारले जाईल. त्यानंतर त्यांनी पसंती दर्शवलेल्या मतदान केंद्रांवर मतदान करता येईल. अशा प्रकारे दुबार मतदारांना एकाच मतदान केंद्रांवर मतदान करता येईल. संबंधितांनी काहीही संपर्क केला नाही, तर सगळ्या मतदान केंद्रांवर डबल स्टा मतदार अशी नोंद केली जाईल. त्यानंतर हा मतदार मतदान केंद्रावर मतदानासाठी आला तर त्याच्याकडून मी दुसऱ्या कोणत्याही मदान केंद्रावर मतदान करणार नाही किंवा केले नाही, असे प्रतिज्ञापत्र घेतले जाईल, असे निवडणूक आयुक्तांनी सांगितले.

**असा असेल निवडणूक कार्यक्रम**

नामनिर्देशन पत्र – १० नोव्हेंबर, अंतिम मुदत – १७ नोव्हेंबर, छानणी – १८ नोव्हेंबर, अर्ज माघारी घेण्याची तारीख – २१ नोव्हेंबर, निवडणूक चिन्ह वाटप – २६ नोव्हेंबर, मतदान– २ डिसेंबर, निकाल– ३ डिसेंबर

**एकूण किती मतदार?**

एकूण मतदार – १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६, महिला मतदार – ५३ लाख २२ हजार ८७०

**नगरपालिका उमेदवारांसाठी खर्चमर्यादा किती?**

अ वर्ग अध्यक्षपद – १५ लाख, नगरसेवक – ५ लाख. ब वर्ग अध्यक्षपद – ११ लाख २५ हजार, नगरसेवक – ३ लाख ५० हजार. क वर्ग अध्यक्षपद – ७ लाख ५० हजार, नगरसेवक – २ लाख ५० हजार

**नगरपंचायत उमेदवारांसाठी खर्चमर्यादा किती?**

अध्यक्षपद – ६ लाख, नगरसेवक – २ लाख २५ हजार

## आघाडी–मनसेच्या शिष्टमंडळाला भेट नाकारली

मनसेचे बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई यांच्यासह अतुल लोंढे, राजीव झा यांचा समावेश होता. शिष्टमंडळातील सर्व नेते आयोगाच्या अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी कार्यालयात गेले असता, अधिकाऱ्यांनी सर्वांना भेट देण्यास नकार दिला. केवळ दोन नेत्यांना भेटणार असल्याचे निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. मात्र, जोपर्यंत आमच्या सर्व नेत्यांना सोबत घेऊन आयोगाचे अधिकारी भेट घेत नाहीत, तोपर्यंत आम्ही कार्यालयातून बाहेर पडणार नाही, अशी ठाम भूमिका घेत सर्वांनी एकत्रितपणे ठिय्या आंदोलन सुरू केले. भेट द्यायची असेल, केवळ दोघांना नाही, तर सर्वांना भेट द्या, अशी मागणी अनिल देसाई यांनी केली. दरम्यान, शिष्टमंडळाने पुकारलेल्या ठिय्यामुळे दिल्लीत मोठा राजकीय तणाव निर्माण झाला आहे.

## विनायक तेलंग नवे कार्यकारी अभियंता

बांधकाम विभागात काम करीत आहेत. त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागासह पंचायत समिती अलिबाग बांधकाम विभागातदेखील काम केले आहे. त्यामुळे त्यांना अलिबागसह संपूर्ण जिल्ह्याचा दांडगा अभ्यास आहे. ग्रामीण भागातील रस्ते, पुलांची त्यांना चांगली माहिती आहे. जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे राऊत यांच्या सेवानिवृत्तीनंतर राहुल देवांग यांच्याकडे अतिरिक्त कारभार सोपविण्यात आला होता. गेली अनेक महिने ते कार्यकारी अभियंता म्हणून काम पाहात होते. आता विनायक तेलंग हे कार्यकारी अभियंता म्हणून रुजू झाले आहेत. रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारित असलेल्या पाच हजार किलोमीटरपैकी तीन हजार किलोमीटरचे रस्ते दुरूस्तीच्या प्रतीक्षेत आहेत. निधीअभावी हे रस्ते तयार करण्यास जिल्हा परिषद बांधकाम विभाग उदासीन ठरले आहे. नव्याने रुजू झालेले कार्यकारी अभियंता विनायक तेलंग ग्रामीण रस्ते दुरुस्त करण्यावर भर देतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## पूल, रस्त्यांचा प्रश्न कायमच

रस्त्यातून प्रवास करताना वाहन चालकांसह प्रवाशांना प्रचंड त्रास होत आहे. तसेच अलिबाग–रोहा मार्गावरील नवघर पुलासह नांगरवाडी परिसरातील साकवची अवस्था बिकट झाली असताना सोमवारी सायंकाळी वढाव–खानाव येथील साकव (पूल) कोसळला. या दुर्घटनेमध्ये वावे येथील स्वप्नील गायकर हा तरुण जखमी झाला आहे. अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात त्याच्यावर उपचार सुरु आहेत. अलिबाग–रोहा मार्गावरील रस्त्यांवर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. खड्ड्यांची अवस्था बिकट झाली आहे. अपघात सातत्याने होत आहेत. या खड्डेमय रस्त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहे. या मार्गावरील प्रवाशांना खड्ड्यांचा प्रश्न कायमच भेडसावत असताना आता पूल व साकवच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. मोठा गाजावाजा करीत रस्त्याचे काम करण्यास सुरुवात केली. परंतु, गेल्या अनेक वर्षांपासून हे काम पूर्ण करण्यास सार्वजनिक बांधकाम विभाग उदासीन ठरले आहेत.

**गेल कंपनीला नोटीस बजावणार**

अलिबाग–रोहा मार्गावरील रस्ता कमी क्षमतेचा असून, येथील पुलांची (साकव) मोठ्या क्षमतेची अवजड वाहने पेलण्याची क्षमता नाही. तरीदेखील गेल कंपनीत येणारी अवजड वाहने या रस्त्यावरून धावत होती. गेल कंपनीच्या अवजड वाहनांच्या वर्दळीची परवानगी घेतली नसल्याची माहिती कार्यकारी अभियंता यांना दिली. त्यामुळे अधीक्षक अभियंता यांनी कंपनीच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त करीत कंपनीला नोटीस बजावण्याची सूचना कार्यकारी अभियंता यांना दिली. पूल चांगल्या स्थितीत होता. मात्र, क्षमतेपेक्षा अवजड वाहने पुलावरून गेल्याने पूल कोसळल्याचे ते म्हणाले.

**पुलाच्या दुरुस्तीचे काम सुरु**

पूल दुर्घटनेनंतर सार्वजनिक बांधकाम विभाग खडबडून जागे झाले. अधीक्षक अभियंता सुषमा गायकवाड यांनी याबाबत दखल घेत तातडीने ब्रेकरच्या मदतीने पुलावरील माती, खडी साफ करण्याबरोबरच लोखंडी पाईपच्या मदतीने पूल तयार करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. पुलाच्या दुरुस्तीचे काम सुरु करण्यात आले असून, हे काम दोन दिवसांत होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

वढाव–खानाव येथील पडलेल्या पुलाच्या जागी सध्या तात्पुरत्या स्वरुपात पाईपद्वारे पूल बांधण्याचे काम सुरु केले आहे. दोन दिवसांत हे काम पूर्ण केले आहे. खानाव येथून पर्यायी रस्त्याची व्यवस्था केली आहे. फक्त मोठ्या वाहनांना यातून प्रवेश दिला जाणार नाही.

– मोनिका धायतडक, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

## आता पाल्हे पुलाचा नंबर?

बायपासमार्गे नागाव, रेवदंडा आणि मुरुड तालुक्याला जोडणारा पाल्हे पूल हा एकमेव मार्ग आहे. कारण, पावसाळ्यादरम्यान अलिबाग–नागावदरम्यान असणारा बेली येथील पूल कमकुवत असल्याचे कारण सांगत बांधकाम विभागाने आधीच अवजड वाहतुकीसाठी बंद केला आहे. दरम्यान, ही सर्व वाहतूक पाल्हे पुलावरुन वळवण्यात आली आहे. परंतु, पाल्हे पूलही अवजड वाहतुकीसाठी बंद असतानादेखील या मार्गावरुन वाहतूक वळवल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत असून, बांधकाम विभाग आणि प्रशासनाचा निष्काळजीपणा उघड झाला आहे.

**‘तडक’ कार्यवाहीची अपेक्षा फेल**

पाल्हे पूल कमकुवत असल्याचे खुद्द कार्यकारी अभियंता मोनिका धायतडक यांनीच याआधी सांगितले असून, पुलाची दुरुस्ती करण्यात येत असल्याचे त्या म्हणाल्या होत्या. जूनपासून आज पाच महिने व्हायला आले तरी अद्याप दुरुस्ती पूर्ण झालेली नाही. पुलाच्या लोखंडी सळ्या बाहेर आल्या आहेत. अद्याप तीन पिलरचे मजबुतीकरण बाकी असताना अवजड वाहने जातातच कशी? रात्री–अपरात्री पूल कोसळून दुर्घटना घडल्यास याला सर्वस्वी सार्वजनिक बांधकाम विभाग जबाबदार असेल, असा संताप नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

**रस्ते सुरक्षेच्या बाबतीत जिल्हा प्रशासन फेल ठरले आहे. वढाव येथील पूल कोसळल्यामुळे आता पाल्हे येथील एकमेव पूल अलिबाग, मुरुड, रोहा तालुक्यांना जोडणारा मार्ग आहे. आणि, पूल जर कोसळला, तर कामानिमित्त बाहेर पडणारे शेकडो लोक बेरोजगार होतील. बांधकाम विभागाची बेफिरी, निष्क्रियता आणि कंपन्यांच्या ओव्हर लोड वाहनांमुळे वढावचा पूल कोसळला, तसाच धोका पाल्हे पुलाला आहे. त्यामुळे नवीन पूल होत नाही, तोपर्यंत कंपन्यांची अवजड वाहने तात्काळ बंद करावीत.**

**– ॲड. राकेश नारायण पाटील, सामाजिक कार्यकर्ते**

**अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा**

कवकुवत झालेल्या पुलावरुन एसटी बस सुरू करुन बांधकाम विभाग नागरिकांच्या जीवाशी खेळत आहे. या पुलाची दुरुस्ती होणार तरी कधी? या प्रश्नाचे उत्तर देणे कार्यकारी अभियंता मोनिका धायतडक यांनी टाळले. पुलाची अवस्था गंभीर असताना प्रशासनाचे अधिकारी यावर काहीच बोलायला तयार नाहीत. मोठी दुर्घटना झाल्यास त्याला बांधकाम विभागाचे अधिकारीच जबाबदार असतील. अशा अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल का करण्यात येऊ नये, असा सवाल ॲड. राकेश पाटील यांनी केला आहे.

**सद्यःस्थिती पूल कसा आहे?**

पाल्हे पुलाच्या डागडुजीचे काम मागील जून महिन्यापासून सुरू आहे. अद्याप ते सुरूच आहे. सद्यःस्थितीत पुलाच्या खालील लोखंडी सळ्या बाहेर आल्या आहेत. तीन पिलरची डागडुजी करण्यात आली आहे. अद्याप तीन पिलरचे काम बाकी आहे. त्यातील एक पिलर अक्षरशः वाकला आहे. अशातच अवजड वाहने गेल्यास पूल कोसळण्याची शक्यता आहे. शेवटची घटका मोजणाऱ्या पुलाची सद्यःस्थिती अधिकाऱ्यांना मात्र माहिती नसावी, ही मोठी शोकांतिका आहे.

वढाव पूल कोसळल्याने वाहतूक पूर्णपणे सहाण बायपासमार्गे वळविण्यात आली. पाल्हे पुलावरुन हलकी वाहतूक सुरू आहे. बांधकाम विभगाकडून पत्र आल्यास तात्काळ कार्यवाही करुन पुलावरील अवजड वाहतूक बंद करण्यात येईल. संबंधित पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांना तशा सूचना देण्यात येतील.

**– अभिजीत भुजबळ, पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतूक विभाग**

## शासन रेशन दुकानदारांवर मेहरबान?

निदर्शनास आले. डोळ्यांनी कमी दिसू येणाऱ्या वृद्ध आदिवासी महिलांनी हे धान्य शिजवून आपल्या कुटुंबासहीत खाल्ले असते तर त्यांना डायरीयासारख्या अनेक आजरांना बळी पडावे लागले असते. आणि शासनाचा स्वस्तातला शिधा नागरिकांना महाग पडला असता. याबाबत सामाजिक कार्यकर्ते व ऑल इंडिया पँथरचे नरेश गायकवाड यांनी सदरची बाब सुधागड तहसीलदार व पुरवठा निरीक्षक यांच्या निदर्शनास आणून दिली. याबाबत नरेश गायकवाड यांना तहसील कार्यालयाच्या आवारात याविरोधात आंदोलनदेखील केले.

सर्वसामान्य व आदिवासी नागरिकांना अळ्या व लेंडीयुक्त धान्य वितरित करून शासन त्यांची चेष्ठा करीत आहे. असे वारंवार होत असूनदेखील तहसीलदार यांच्याकडून केवळ आश्वासित केल्याचे पत्र देऊन संबंधित बेजबाबदार रेशनिंग दुकानदार व अधिकारी, गोदाम व्यवस्थापक यांना पाठीशी घालत असल्याचे निदर्शनास येते.

– नरेश गायकवाड, ऑल इंडिया पँथर सेना रायगड

शासनाकडून मिळणारे रेशनिंगचे धान्य निकृष्ट दर्जाचे किंवा खराब असेल तर ते रेशनिंग दुकानदाराने वितरित करू नये. असे धान्य आल्यास ते परत करावे. नागरिकांना चांगले व दर्जेदार धान्य देणे हे शासनाचे स्पष्ट निर्देश आहेत. त्यामुळे असे खराब धान्य रेशनिंग दुकानदार वितरित करीत असेल तर ते चुकीचे आहे. याबाबत संबंधित तहसीलदार योग्य ती कार्यवाही करावी.

– दिपाली ब्राम्हणकर, एडीएसओ रायगड


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification

| Sr. No. | Tender No.EE/400kV R.S. (O&M) Dn/ NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-16/ 25-26/ Rfx No. 7000037756 | Scheme for SITC of 1 No. of 22kV Bay for MSEDCL at 400 kV Nagothane s/s under 400 kV RS O&M Division Nagothane… 3rd call | **Rs. 20,22,308.83/-** | **14.11.2025 up to 23:59hrs** |

**EMD 1 % of estimate Cost i.e. 20,223.08/-,** Tender fee Rs. 500/- + GST

For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

**Contact Person:** Mitesh Goyal (Dy. EE) Mob No. 9461456635 Email ID: **ee7230@mahatransco.in**

**Note:** All eligible supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane.**



**Change in Name**

My old Name was SHEETAL ASHOK SHETYE & I have change this name to SHITAL ASHOK SHETYE from today onwards. I will be recognize by my new name i.e. SHITAL ASHOK SHETYE As per the affidavit Reg. no. 25520417712686004O8325/ 04.11.2025 before Executive Magistrate Alibag- Raigad.



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
**(महाराष्ट्र शासन अंगिकृत)**
**ई निविदा सूचना क्रमांक ५६/२०२५-२०२६ (मुंबई)**

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | दिघी बंदराभिमुख औद्योगिक क्षेत्र (डिपीआयए)... महाराष्ट्र राज्यातील दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉरच्या दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र क्लस्टर क्रमांक ७ येथे थीम आधारीत औद्योगिक उद्यानांसाठी डीबीएफओटी पीपीपी आधारावर जागतिक/आंतरराष्ट्रीय विकासकांची निवड करण्यासाठी प्रस्तावाची विनंती. | रू. ०.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०४/११/२०२५ ते दिनांक १९/१२/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ०९/१२/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. पूर्व अहर्ता बैठक दिनांक १२/१२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता अधिक्षक अभियंता (कों), मऔविम, पनवेल यांचे कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण/महामंडळाचा खुलासा दिनांक १२/१२/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.


## जिल्ह्यात कुष्ठरोगाच्या उच्चाटनासाठी मोहीम

कुष्ठरोगाविषयी जनजागृती करणे. सन २०२७ पर्यंत कुष्ठरोगाचा प्रसार रोखणे, हे ध्येय साध्य करण्याच्या दिशेने वाटचाल करणे. कुष्ठरोग हा मायक्रोबॅक्टेरियम लेप्रे नावाच्या जंतूमुळे होतो. या जंतूमुळे त्वचेवर, नास्तवर आणि शरीराच्या नसा इतर अवयवावर परिणाम होतो.

## आज देहेनमध्ये अध्यात्मिक परिषद

सत्रात आगरी बोलीचे बादशाह चंद्रकांत पाटील, डॉ. अविनाश पाटील यांचे मार्गदर्शन असणार आहे. या परिषदेच्या दरम्यान बिडवागळे येथील चंद्रकांत म्हात्रे, श्रीगावमधील मिरीग पाटील, हेमनगरमधील मच्छिंद्र पाटील, देहेन येथील शांताराम पाटील, कोळघर येथील शैलेश पाटील, कोपरमधील महेंद्र ठाकूर, चरी येथील गोरखनाथ पाटील, मेढेखार येथील विद्या म्हात्रे, कोळघर येथील वनिता पाटील, वायशेत येथील प्रमोद पाटील, आवेटी येथील सुनील म्हात्रे, कुर्डूसमधील धनाजी पिंगळे, देहेन येथील प्रमोद जुईकर, महेंद्र जुईकर, शशिकांत पाटील, नवीन देहेन येथील प्रल्हाद पाटील, अरुण पाटील, शहापूरमधील अमरनाथ भगत, राजमळा बामणोली येथील संतोष पाटील यांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख ह.भ.प. जगन्नाथ महाराज राऊत असणार असल्याची माहिती आगरी सामाजिक संस्था अलिबागचे अध्यक्ष कैलास पिंगळे यांनी दिली.

## आवासच्या यात्रेवर पावसाचे सावट

परंतु, पावसामुळे ग्राहकांकडून फारसा प्रतिसाद मिळाला नसल्याचे दुकानदारांकडून सांगण्यात आले. काही भक्त आदल्या दिवशी सोमवारी दर्शनासाठी आले होते. तर, काही भक्त मंगळवारी यात्रेच्या दिवशी आले होते. त्यामुळे दर्शनासाठीदेखील मोठी गर्दी नसल्याचे सांगण्यात आले. आकाश पाळणा व इतर खेळाचे स्टॉल होते. परंतु, त्या परिसरात चिखल, पाणी असल्याने त्या ठिकाणी खेळण्यासाठी कोणीच फिरकले नसल्याचे सांगण्यात आले.


**जाहीर नोटीस**

माझे आशील यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे:-

मौजे बोरीस, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत.

| मौजे | भुमापन क्र. / उपविभाग | क्षेत्र एकक आर.चौ.मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| बोरीस | ५०/२/ब | ०.३८.४० | २.५० |
| बोरीस | ५१/१ | ०.१०.१० | १.२५ |
| बोरीस | ५२/३/अ/३ | ०.११.१० | १.६९ |

येणेप्रमाणे वर्णनाच्या मिळकती त्यात असलेला झाड झाडोरा, वहिवाटीचे हक्क, कुंपण, वगैरे सह अशा मिळकती बाबत सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक अशोक नारायण शेळके, शोभा शंकर म्हात्रे, शकुंतला कृष्णा भगत, सर्व मु. बोरीस, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी माझे आशिल यांना खरेदी देण्याचे मान्य केले असुन विद्यमान मालक यांनी संदर्भित मिळकत त्यांचे मालकीची, कब्जे वहीवाटीची व निर्वेध असल्याचा भरवसा माझे आशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहु मिळकतीत कोणाचाही गहाण, बक्षीस, साठेकरार, दान, फरोक्त, कब्जा, वहीवाटीचे हक्क, कुळ वहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, नोटरी सत्यप्रती व कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजणेत येईल. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख ०१.११.२०२५

**(ॲड.एस.वाय.बारटके)**
मु.पो. ता.अलिबाग, जि.रायगड



**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां.विभाग,**
**पनवेल पिनकोड - ४१० २०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
**दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८**
**फॅक्स ०२२-२७४६७४४०**
**ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र.३१**
**(ई-निविदा) सन २०२५-२६**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२- २७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप- या निविदेमध्ये एकूण १६ काम समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक १०.११.२०२५ सकाळी १०.०० ते दिनांक १७.११.२०२५ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

ई-निविदाजा.क्र./सा.बां./पनवेल/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सही/-
सा.बां.विभाग, पनवेल, जि.रायगड **कार्यकारी अभियंता,**
दिनांक :- **सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पनवेल**



**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग,**
**पनवेल पिनकोड - ४१०२०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.com
**दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५२७७८**
**फॅक्स ०२२-२७४६७४४०**
**ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र.३४**
**(ई-निविदा) सन २०२५-२६**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र.०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदारांकडून कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑफलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

टिप :- या निविदेमध्ये एकूण १५ कामे समाविष्ठ असुन ऑफलाईन निविदा विक्री व बीडप्रिपरेशन दिनांक १०.११.२०२५ सकाळी १०.०० ते दिनांक १७.११.२०२५ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आलेली आहे.

ई-निविदा जा.क्र./ सा.बां./पनवेल/--
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सही/-
सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड **कार्यकारी अभियंता,**
दिनांक :- **सा.बां. विभाग, पनवेल**


## निवडक

### जयपाल पाटील, मिलिंद पाटील यांचा सन्मान

**अलिबाग :** समाजासाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या रायगड जिल्ह्याच्या दोन व्यक्तिमत्त्वांचा राष्ट्रीय पातळीवर सन्मान झाला आहे. आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात कार्यरत रायगड भूषण जयपाल पाटील आणि ज्योतिष अभ्यासक मिलिंद अनंत पाटील सारळ, अलिबाग यांना विद्यावाचस्पती (मानद डॉक्टरेट) या सन्मानाने गौरवण्यात आले आहे. हा सन्मान सोहळा पंडित दीनदयाळ उपाध्याय हिंदी विद्यापीठ, मथुरा उत्तरप्रदेश यांच्यावतीने पंचतारांकित हॉटेल नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आला. या सन्मानानंतर सारळ परिसरात आणि अलिबाग तालुक्यात आनंदाचे वातावरण आहे. मित्रमंडळी, सामाजिक संस्था आणि स्थानिक नागरिकांनी पाटीलबंधूंवर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. त्यांच्या कार्याने प्रेरित होऊन युवकांमध्ये समाजकार्यासाठी नवी उमेद निर्माण झाली आहे. मिलिंद पाटील यांची अध्यात्माशी नाळ जोडलेली साधना आणि जयपाल पाटील यांचे जनजागृतीचे कार्य दोघांनीही आपल्या क्षेत्रात ‘कर्मयोग’ जिवंत केला आहे. त्यांचा हा सन्मान केवळ दोन व्यक्तींचा नसून, तो रायगडच्या संस्कृतीचा, कर्तृत्वाचा आणि निष्ठेचा सन्मान आहे.



### आयुर्वेदिक कांस्य उपचार पध्दत सुरू

**गडब :** पेण तालुक्यातील काराव–गडब ग्रामपंचायतीतर्फे नागरीकांसाठी आयुर्वेदिक कांस्य उपचार पध्दत सुरु करण्यात आली आहे. याचे उद्घाटन ग्रामपंचायतीचे सरपंच मानसी पाटील, उपसरपंच सिता पाटील, सदस्य दिनेश म्हात्रे, सदस्या वैशाली म्हात्रे, संध्या म्हात्रे, ग्राम अधिकारी मच्छिंद्र पाटील यांच्या उपस्थित करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायतीचे कर्मचारी, अंगणवाडी सेविका, ग्रांमस्थ उपस्थित होते. या उपचार प्रणालीचा उपयोग शरीरातील हानिकारक घटक, विषद्रव्ये काढून टाकण्यासाठी, शरीरातील पित्ताचे प्रमाण कमी करण्यासाठी, शरीरातील रक्तप्रवाह सुरळीत करण्यासाठी होणार आहे. तसेच मधुमेहामुळे पायाच्या संवेदना कमी होऊ नये आणि मोबाईल, संगणकामुळे येणारा डोळयांचा थकवा दूर करण्यासाठी, डोळ्यांच्या स्नायूंना चालना मिळण्यासाठी, शरीरात वाढलेली अतिरिक्त उष्णता कमी करण्यासाठी, शरीरातील वाताचे प्रमाण कमी करण्यासाठीही याचा उपयोग होईल. तर तळपायाच्या भेगा, पायाची जळजळ अशा समस्या कमी करण्यासाठी, गुडघेदुखी, टाचदुखी, कंबरदुखी, अशा त्रासाचे प्रमाण कमी करण्यासाठी, पायावरील सूज कमी करण्यासाठी आदि उपायासाठी या उपचार प्रणालीचा उपयोग होणार आहे. ग्रामपंचायत हद्दीतील नागरीकांनी या उपचार प्रणालीचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रामपंचायतीमार्फत करण्यात आले आहे.



### मुक्ता खटावकर यांचा गौरव


**पनवेल :** रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएसई स्कूलच्या मुख्याध्यापिका मुक्ता भानुदास खटावकर यांनी श्रीलंकेत आयोजित इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन क्वालिटी एज्युकेशन २०२५ या आंतरराष्ट्रीय शिक्षण परिषदेमध्ये स्कूल प्रतिनिधी म्हणून सहभाग घेतला. ही परिषद श्रीलंकेतील उवा प्रांतात दि. २८ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान पार पडली. या परिषदेत शैक्षणिक गुणवत्ता, पाठ्यक्रम विकास, विज्ञान व तंत्रज्ञान, शाळांमधील नेतृत्व विकास, आर्टिफिशियल इंटेलिजन्सद्वारे शिक्षण क्षेत्रातील क्रांती, तसेच विविध शैक्षणिक धोरणांवर सखोल चर्चा झाली. या परिषदेत सुमारे १२० मुख्याध्यापक सहभागी झाले होते. महाराष्ट्रातून १९ मुख्याध्यापकांना सहभागाची संधी लाभली. त्यात मुक्ता खटावकर यांनी उल्लेखनीय सहभाग नोंदविला. त्यांनी टेक्नॉलिजिकल पेडागॉजिकल कन्टेन्ट नॉलेज या विषयावर सादरीकरण करून तांत्रिक शैक्षणिक सामग्री ज्ञानाबाबत मार्गदर्शन केले. त्यांच्या या सादरीकरणाची उपस्थित मान्यवरांनी प्रशंसा केली. परिषदेच्या समारोप प्रसंगी उवा प्रांताचे राज्यपाल जे.एम. कपिला जयसेखरा यांच्या यांच्यामार्फत चीफ सेक्रेटरी ऑफ उवा प्रांत यांच्या हस्ते त्यांना प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले.

### अल्पवयीन मुलीचा बुडून मृत्यू

**सिंधुदुर्ग :** सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण तालुक्यातील कुंभारमाठ येथील गोवेकरवाडी रस्त्याच्या बाजूलाच असणाऱ्या खाणीच्या पाण्यात आंघोळीसाठी गेलेले पाच जण बुडले. यात एका सोळा वर्षीय मुलीचा बुडून मृत्यू झाला, तर चार जणांना वाचविण्यात यश आले. कुंभारमाठ गोवेकरवाडी येथील भानुदास लोंढे यांच्याकडे दिवाळीत मुंबईवरून अंजली प्रकाश गुरव (३०), गौरी प्रकाश गुरव (१८), गौरव प्रकाश गुरव (२१), करिश्मा सुनील पाटील (१६), दुर्वेश रवींद्र पाटील (९) हे आले होते. हे सर्वजण सोमवारी (दि.३) सायं. ४ वा. दरम्यान गोवेकरवाडी लगतच्या चिरेखाणीत आंघोळ करण्यासाठी उतरले होते. मात्र, त्यांना पाण्याचा अंदाज न आल्याने हे सर्वजण पाण्यात बुडू लागले. हा प्रकार रस्त्यावरून जाणाऱ्या राहुल भिसे या तरुणाला दिसताच त्याने तात्काळ पाण्यात उडी घेत बुडणाऱ्या महिलेसह अन्य मुलांना वाचविले. मात्र, यात करिश्मा पाटील ही पाण्यात बुडून बेपत्ता झाली. यात गंभीर बनलेल्या अंजली गुरव हिला तात्काळ ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. अन्य तीन मुले सुखरूप आहेत.

### रत्नदुर्गवरील शिवसृष्टीचे पर्यटकांना आकर्षण

**रत्नागिरी :** रत्नागिरी शहराचे ऐतिहासिक वैभव असलेल्या रत्नदुर्ग किल्ल्यावर साकारण्यात आलेली ‘शिवसृष्टी’ आता पर्यटकांच्या आकर्षणाचा मुख्य केंद्रबिंदू ठरत आहे. शिवसृष्टीचे लोकार्पण झाल्यापासून आजपर्यंत तब्बल एक लाख वीस हजार पर्यटकांनी या शिवसृष्टीला भेट दिली आहे.



या विक्रमी प्रतिसादामुळे रत्नागिरीच्या वैभवात मोठी भर पडली असून, शहराच्या पर्यटनात लक्षणीय वाढ झाली आहे. शिवसृष्टीमुळे रत्नागिरी शहर पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. या वाढलेल्या पर्यटकांमुळे स्थानिकांना रोजगाराच्या नवीन संधी निर्माण झाल्या असून, येथील स्थानिक उद्योगधंद्यांनाही मोठी चालना मिळाली आहे. या शिवसृष्टीचे सर्वात मोठे आणि खास वैशिष्ट्य म्हणजे, हे ‘अरबी समुद्राच्या बाजूला असलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे पहिले स्मारक’ आहे.

# पुरोगामी संपादक बाळासाहेब जाधव

**आज महाराष्ट्रातील एक प्रमुख वृत्तपत्र म्हणून 'पुढारी'ची ओळख आहे. ही सारी कर्तबगारी बाळासाहेबांची! बाळासाहेबांनी सामाजिक भान राखत सार्वजनिक कार्यात भाग घेतला. पुरोगामी विचारांचा धागा पुढे नेला. या विचारसरणीतूनच पत्रकारितेत स्वतंत्र ठसा उमटवीत असताना त्यांनी अनेक लोकलढ्यांचे नेतृत्व केले. सव्यसाची संपादक म्हणून ते ओळखले जातात.**

**खा. शरद पवार**



बाळासाहेबांचा आणि माझा परिचय तसा जुना १९६६ साली ते पुण्यात आय. एल. एस. लॉ कॉलेजला शिकायला होते, विलासराव देशमुख, सुशीलकुमार शिंदे आदी त्यांचे मित्रमंडळ. या काळात त्यांची ओळख झाली आणि आमचा स्नेह जमला. तेव्हा मी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचा अध्यक्ष होतो. १९६७ साली बारामती मतदारसंघातून मी विधानसभा निवडणूक लढवली. आमदार झालो. या काळात या तरुण मित्राची भेटगाठ होत असे. बाळासाहेबांचे पिताजी 'पुढारी'चे ग. गो. जाधव यांनी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतलेला. महात्मा गांधी यांचा सहवास त्यांना लाभला होता. जेधे-जवळकर, मामा वरेरकर, प्रबोधनकार ठाकरे यांच्या सहवासात त्यांनी पत्रकारितेचे धडे घेतलेले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासमवेत त्यांनी काळा राम मंदिर प्रवेश सत्याग्रहात भाग घेतला होता. याच ध्येयवादातून त्यांनी कोल्हापुरात १९३९ साली 'पुढारी'ची स्थापना केली आणि प्रथमपासून ध्येयवाद आणि सामाजिक बांधिलकी जपली. स्व. यशवंतराव चव्हाण, वसंतराव दादा पाटील, बाळासाहेब देसाई आदी नेते त्यांचे निकटवर्तीय होते. तत्कालीन मुंबई कौन्सिलवर ते कोल्हापूरचे पहिले आमदार म्हणून नियुक्त झाले होते.

ग. गो. जाधव यांच्याशी माझे चांगले संबंध होते. कोल्हापूरला आली की, त्यांची भेट होत असे. त्यांचा संपन्न वारसा बाळासाहेबांना लाभला. ग. गो. जाधव यांनी बिकट काळात 'पुढारी' चालवला. जिल्हा पातळीवरील वृत्तपत्रे फारशी टिकल्याचे उदाहरण नाही. परंतु, बाळासाहेबांनी 'पुढारी'ची सूत्रे घेतली आणि 'पुढारी'चा विस्तार केला. जनमानसाशी 'पुढारी'ची वीण घट्ट आहे. ही सारी कर्तबगारी बाळासाहेबांची. बाळासाहेबांनी सामाजिक भान राखत सार्वजनिक कार्यात भाग घेतला. पुरोगामी विचारांचा धागा पुढे नेला. या विचारसरणीतूनच पत्रकारितेत स्वतंत्र ठसा उमटवीत असताना त्यांनी अनेक लोकलढ्यांचे नेतृत्व केले. १९७२ च्या डिसेंबराराध्ये सीमाभागात मराठी भाषिकांवर अत्याचार झाले, तेव्हा त्यावर बाळासाहेबानी खरासरीत अग्रलेख लिहिला सीमाभागातील अत्याचाराची संतप्त प्रतिक्रिया कोल्हापुरात उमटली. दंगल उसळली तेव्हा मी गृहराज्यमंत्री होतो. मी तात्काळ बाळासाहेबांना फोन केला. वस्तुस्थिती समजून घेतली, परिस्थिती नियंत्रणात आणण्यासंबंधी आमची चर्चा झाली. मग त्यांनी व तत्कालीन जिल्हाधिकारी दैठणकर, जिल्हा पोलिस प्रमुख त्यागी यांनी शहरात फिरून शांतता प्रस्थापित केली. १९७४ मध्ये छ. शिवराज्याभिषेक त्रिशताब्दी आणि राजर्षी शाहू महाराज जन्मशताब्दी असा योग आला. तेव्हा बाळासाहेबांनीच हा महोत्सव लोकोत्सव म्हणून साजरा करण्यासाठी पुढाकार घेतला. भव्यदिव्य स्वरूपात हे दोन्ही सोहळे साजरे झाले. त्यावेळचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक, वसंतराव दादा पाटील, बॅ. ए. आर. अंतुले यांच्यासह मी या सोहळ्याला उपस्थित होतो. या सोहळ्यात बाळासाहेबांनी सरकारी पातळीर शाहू जयंती सुरू व्हावी, अशी मागणी केली होती. त्याप्रमाणे सरकारी पातळीवर शाहू जयंती सुरू झाली. हे श्रेय बाळासाहेबांचेच! ज्येष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांना 'ज्ञानपीठ' पुरस्कार मिळाला. तेव्हा त्यांचा भव्य सत्कार करण्याचे बाळासाहेबांनी ठरवले. सत्कार समितीचे अध्यक्षपद त्यांच्याकडेच आले. सत्कारासाठी प्रमुख पाहुणे म्हणून त्यांनी चव्हाणसाहेबांना बोलवायचे ठरवले. अध्यक्ष म्हणून मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांना निमंत्रण दिले. तेव्हा आणीबाणी होती. कराड साहित्य संमेलनात दुर्गाबाई भागवत यांनी आणीबाणीवर तोफ डागलेली होती. त्यामुळे सत्कार सोहळ्यात खांडेकर काय बोलतील, हे सांगणे कठीण होते. त्यांनी आणीबाणीवर टीका केली असती, तर अडचण झाली असती. त्यामुळे चव्हाणसाहेबांचे स्वीय सचिन डोंगरे यांनी बाळासाहेबांना फोन केला. साहेब येणार नाहीत, म्हणून सांगितले. जेव्हा बाळासाहेबांनी चव्हाण साहेबांना आणि मला फोन केला, तेव्हा मी सांगितले की, खांडेकरांनी काही टीका केली तर साहेबांची अडचण होईल. तेव्हा बाळासाहेब म्हणाले, खांडेकर काही टीका करणार नाहीत. तसा मी त्यांचा शब्द घेतो. त्यानंतर ते खांडेकरांना भेटले, कोणाची अडचण होईल, असे काही बोलणार नाही. असा शब्द त्यांनी खांडेकरांकडून घेतला. तसे त्यांनी मला आणि चव्हाणसाहेबांना सांगितले. मग चव्हाणसाहेबांनी निमंत्रण स्वीकारले. बाळासाहेबांना दिलेला शब्द खांडेकरांनी देखील पाळला.

खांडेकरांचा सत्कार बाळासाहेबांनी शाहू खासबाग मैदानावर ठेवला होता. हे मैदान कुस्त्यांचे. तिथे साहित्यिकाचा सत्कार ही अपूवाईच. पूर्वी कधी कोणा साहित्यिकाचा सत्कार तिथे झाला नव्हता. नंतरही झाला नाही, मैदान भरेल की नाही, ही आम्हाला शंका, पण मैदान गर्दीने भरून गेले. कुस्त्यांना होते तशी गर्दी होती. चव्हाणसाहेब आणि शंकरराव चव्हाण हे एकाच व्यासपीठावर कधी येत नसत; पण बाळासाहेबांचे दोघांशीही घनिष्ट संबंध होते. त्यांच्या शब्दासाठी दोघे एका व्यासपीठावर आले. समारंभाची सुरुवात बाळासाहेबांच्या प्रास्तावाने झाली. ते बोलताना म्हणाले, आज शाहू महाराज असते तर त्यांनी भाऊसाहेबांची हत्तीवर बसवून मिरवणूक काढली असती. मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी आपण मुख्यमंत्री म्हणून भाऊसाहेबांना मानवंदना देण्यासाठी येथे आलो आहोत, असे उद्गार काढले. चव्हाणसाहेब हाडाचे साहित्यिक, त्यांचा व्यासंग मोठा त्यांनी खांडेकरांच्या साऱ्या साहित्यकृतींचा साहित्यिक भाषेत आढावा घेतला. ते जर राजकारणात पडले नसते, तर निश्चितच फार मोठे साहित्यिक झाले असते!

या सत्काराने खांडेकर भारावून गेले. पावसाळ्यात पंचगंगेला आलेला पूर मी पाहिला आहे; पण भर उन्हाळ्यात लोकगंगेला आलेला महापूर मी प्रथमच पाहत आहे, अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. खरोखर हा सत्कार समारंभ अविस्मरणीय झाला. या कार्यक्रमानंतर आम्ही बाळासाहेबांच्या घरी भोजन केले. १९७८ मध्ये मी सीमाभागात झालेल्या मराठी भाषिकांवरील अत्याचारानंतर बाळासाहेबांनी कोल्हापुरात सीमा कृती समिती स्थापन केली. ते कार्याध्यक्ष होते. या कृती समितीतर्फे कोल्हापूरात १९८६ मध्ये संयुक्त महाराष्ट्र सीमा परिषदेचे विराट अधिवेशन घेण्यात आले. सारे संयोजन बाळासाहेबांचे.

सीमा परिषदेचे अध्यक्ष एस. एम. जोशी, एम. तथा अण्णा, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, प्रा. एन. डी. पाटील यांच्यासह मी व सर्वपक्षीय नेते अधिवेशनाला उपस्थित होतो. त्यावेळी विषय नियामक समितीत ठाकरे यांनी ठराव मांडला. सीमा प्रश्नावर आमदार-खासदार, मंत्र्यानी राजीनामे द्यावेत, हा तो ठराव. मी त्याला विरोध केला. ठाकरे संतापले, बैठकीतून बाहेर पडले, थेट पन्हाळ्याला निघून गेले. तेव्हा मग मी आणि अण्णा बाळासाहेबांच्या बंगल्यावर गेलो. त्यांना परिस्थिती सांगितली. तेच मार्ग काढतील, अशी चर्चा केली. मग आम्ही तिघेही पन्हाळ्याला गेलो. ठाकरे एका गेस्टहाऊसवर होते. बाळासाहेब आधी त्यांना भेटले. त्यांनी ठाकरेंची समजूत काढली, त्यानंतर मी व अण्णा आत गेलो. बाळासाहेबांनी ऐक्याचा ठराव केला. त्यावर आम्ही सर्वांनी सह्या केल्या. बाळासाहेबांनी पेच सोडवला.

१९८९ मध्ये मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होतो. तेव्हा 'पुढारी'चा सुवर्ण महोत्सव साजरा झाला, राजीव गांधी पंतप्रधान म्हणून 'पुढारी'च्या सुवर्ण महोत्सवासाठी कोल्हापूरला प्रथमच आले होते. याप्रसंगी मी प्रमुख अतिथी म्हणून कार्यक्रमास उपस्थित होतो. मी व राजीव गांधी यांनी 'पुढारी'च्या सुवर्ण महोत्सवात 'पुढारी'ने स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्योत्तर काळात केलेल्या राष्ट्रीय व सामाजिक तसेच पत्रकारितेच्या कार्याचा मुक्तकंठाने गौरव केला. 'पुढारी'च्या हीरक महोत्सवाला भारतरत्न लता मंगेशकर या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनीही 'पुढारी'चा गौरव केला. 'पुढारी'च्या अमृत महोत्सवाला विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रमुख पाहुणे होते. त्यांनीही बाळासाहेब आणि 'पुढारी'ची सामाजिक बांधिलकी तसेच राष्ट्रभक्ती पत्रकारितेचा गौरव केला.

कोणत्याही दैनिकाच्या सुवर्ण महोत्सव व अमृत महोत्सवाला दोन पंतप्रधान लाभणे ही खरोखरच दुर्मीळ गोष्ट आहे. बाळासाहेबांनी 'पुढारी'ची धुरा अखंड ५० वर्षे चालविली व जे योगदान पत्रकारितेत दिले, त्याचीच पावती या दोन कार्यक्रमांमुळे त्यांना मिळाली, असे म्हणावे लागेल. यावरून बाळासाहेबांची कर्तबगारी आणि त्यांचे सर्वांशी असलेले घनिष्ट संबंध दिसून येतात.

बाळासाहेबांबरोबर माझे अनेक एकत्र कार्यक्रम झाले. माजी खा. सदाशिवराव मंडलिक यांच्या अमृत महोत्सवाला मी प्रमुख पाहुणा व बाळासाहेब प्रमुख वक्ते होते. आपल्या स्पष्टवक्तेपणाने त्यांनी केलेले भाषण सभा जिंकून गेले. चिमटे घेत आणि हंशा पिकवीत भाषण करण्याची त्यांची हातोटी कौतुक करण्यासारखी आहे. वसंतराव दादा पाटील यांनी विनाअनुदान तत्वावर मेडिकल, इंजिनिअरिंग आदी कॉलेजेस सुरू करायला परवानगी द्यायचे धोरण पुढे आणले. या धोरणानुसार डॉ. डी. वाय. पाटील यांनी माझ्याकडे दोन मेडिकल कॉलेजची मागणी केली होती. बाळासाहेब हे त्यांचे मित्र. त्यांनी माझी विधानभवनात भेट घेतली आणि डी. वाय. पाटील यांची मेडिकल कॉलेजबद्दलची मागणी मांडली. त्यानंतर बाळासाहेबांनी त्याचा सतत पाठपुरावा केला. तेव्हा मी डी. वाय. पाटील यांना मुंबई आणि कोल्हापूर अशी दोन मेडिकल कॉलेज मंजूर केली.

१९९० मध्ये मी मुख्यमंत्री असताना कोल्हापुरात श्री जोतिबा परिसर विकासासाठी बैठक घेतली. शिवाजीराव देशमुख जिल्हाधिकारी होते. या प्रकल्पासाठी सरकार काही निधी देणार नव्हते. लोकांकडून निधी जमा करायचा होता, ती जबाबदारी कोणी लोकप्रतिनिधी घ्यायला तयार नव्हते. बैठकीत खा. बाळासाहेब माने यांनी बाळासाहेब जाधव ही जबाबदारी घेऊ शकतील, असे सुचवले. मग मी त्यांना बोलातून घेतले. बाळासाहेबांनी निधी संकलनाची जबाबदारी स्वीकारली. त्यांनी पाच कोटी रुपयांचा निधी जमा केला. जोतिबा परिसराचा कायापालट झाला. त्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे.

महाराष्ट्रात ऊस दरासाठी झालेल्या आंदोलनात बाळासाहेबांनी नेहमीच समन्वयाने लवादाची भूमिका पार पाडली. तिढा सोडवला. २०११ साली स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी आमच्या बारामतीत ऊस दरासाठी उपोषण सुरू केले.

तेव्हा पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री होते. या पेचप्रसंगावर चर्चा करण्यासाठी आम्ही एकत्र बसलो होतो. तेव्हा मी सांगितले की, बाळासाहेब जाधव यांनी याआधी ऊस दरात तोडगा काढला आहे. राजू शेट्टीशी त्यांचे चांगले संबंध आहेत. त्यांना मध्यस्थी करायला सांगा, त्यांना पुण्याला बोलावून घ्या. त्यानंतर मी व पृथ्वीराज चव्हाण यांनी बाळासाहेबांना फोन करून पुण्याला बोलावून घेतले. इतरही मंत्र्यांनी त्यांना फोन केले. त्यानुसार बाळासाहेब पुण्यात आले. कौन्सिल हॉलवर शेतकरी संघटना आणि मंत्री, सरकारी प्रतिनिधी यांची बैठक झाली. बाळासाहेबांनी दोन्ही बाजू ऐकल्या. ऊस दराचा तोडगा काढला, तो उभयपक्षी मान्य केला. चव्हाण यांच्या मुख्यमंत्री पदाला शंभर दिवस पूर्ण झाले होते. त्यांनी पत्रपरिषद घेतली, तेव्हा बाळासाहेबांना या प्रश्नात लवाद म्हणून आपण बोलावल्याचे जाहीरपणे सांगितले. त्यांनी बाळासाहेबांचे आभारही मानले. तसेच मी देखील फोन करुन त्यांचे आभार मानले. कोल्हापूर खंडपीठ, मराठा आरक्षण, कोल्हापूरचा टोल अशा अनेक जिव्हाळ्याच्या प्रश्नावर त्यांनी आवाज उठवला आणि आंदोलनाचे नेतृत्वही केले. त्याच्या पाठपुराव्यामुळे अनेक प्रश्न मार्गी लागले. सव्यसाची संपादक म्हणून ते ओळखले जातात. २०१५ मध्ये माझा अमृतमहोत्सवी वाढदिवस उत्साहाने साजरा झाला. अनेक उपक्रम झाले. अनेक वृत्तपत्रांनी माझ्यावर पुरवण्या काढल्या. तथापि, माझ्यावर 'पुढारी'ने जो विशेषांक काढला त्याची सर इतरांना आली नाही. एवढा वाचनीय संदर्भमूल्य असलेला विशेषांक दुसरा निघाला नाही.

गतवर्षी जानेवारीत माझ्या हस्ते बाळासाहेबांचा नागरी सत्कार झाला. माजी आमदार श्रीपतराव शिंदे आणि गडहिंग्लजच्या नगराध्यक्षा त्यांच्या कन्या स्वाती कोरी यांनी हा सोहळा आयोजित केला होता. त्यांच्या कर्तृत्वाचा मी गौरव केला. बाळासाहेबांवर लोकांचे प्रेम किती आहे, हे या सोहळ्यातून दिसून आले. कमालीच्या स्पर्धेमध्ये त्यांनी 'पुढारी'चा साऱ्या महाराष्ट्रात, गोवा, कर्नाटकात विस्तार केला. स्वतंत्र स्थान निर्माण केले, सतत पन्नास वर्षे संपादक म्हणून काम पाहणे आणि ते यशस्वीपणे करणे, ही मोठी कर्तबगारी. त्याचवेळी सार्वजनिक जीवनातही आपला ठसा त्यांनी उमटवला आहे. पद्मश्रीसह अनेक मानसन्मान त्यांना लाभले. त्यांच्या सहस्रचंद्रदर्शन सोहळ्यानिमित्त त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा !

### महाराष्ट्रातील महत्त्वाचे व्यासपीठ

साधेपणा, विनम्रता हे ग. गो. जाधव यांचे गुणविशेष होते. जागरूक राहून शालीन भाषेत विचार मांडण्याचा दृष्टिकोन हे 'पुढारी'चे वैशिष्ट्य होते. जाणकार मंडळींना 'पुढारी'कार काय म्हणतात, ते जाणून घेण्याची जिज्ञासा, आस्था होती. 'पुढारी'हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे व्यासपीठ ठरले. ग. गो. जाधव यांची परंपरा पुढे चालविण्याचा धोरणात्मक निर्णय बाळासाहेबांनी घेतला. सीमाप्रश्नी त्यांनी वृत्तपत्राची ताकद उभी केली. कोल्हापूर, इचलकरंजी भागातील ऊसप्रश्नी सामंजस्याचे वातावरण त्यांनी निर्माण केले. अशा प्रश्नांबाबत योग्य भूमिका घेऊन वृत्तपत्राला उभे राहता येते, ही परंपरा त्यांनी पाळली. त्यात बाळासाहेबांचे योगदान मोठे होते. ग. गो. जाधव यांनी लावलेल्या रोपट्याला त्यांनी मोठे केले. सामान्य जनतेच्या पाठिंब्यावर सामाजिक काम उभे करण्यात बाळासाहेबांचा मोठा वाटा होता. त्यांना मी पन्नासहून अधिक वर्षे ओळखतो. त्यांचेच काम त्यांचे चिरंजीव योगेश समर्थपणे पुढे चालवत आहेत. त्यांनी तंत्रज्ञानाचा केलेला वापर उल्लेखनीय ठरतो. त्याबद्दल वाचक म्हणून मला आनंद आहे. बाळासाहेबांची प्रकृती उत्तम राहो आणि त्यांना प्रदीर्घ काळ आयुरारोग्य लाभो, हीच प्रार्थना.

# आगरी समाजातर्फे पोलीस भरतीसाठी प्रशिक्षण

**| कर्जत | प्रतिनिधी |**

कर्जत तालुका आगरी समाज संघटना यांच्याकडून पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या तरुणांसाठी मैदानी प्रशिक्षण सुरू केले आहे. या प्रशिक्षणाची अधिकृत सुरुवात धामोते येथील नेरळ विद्याभवन शाळेच्या मागे असलेल्या मैदानावर झाली. समाज संघटनेचे आजीव सदस्य आणि संचालक बाबू घारे यांच्या हस्ते आगरी समाज संघटनेच्या उपक्रमाचा अधिकृत शुभारंभ मंगळवार (दि.४) नोव्हेंबर रोजी करण्यात आला.

तालुक्यातील २२ तरुण त्या ठिकाणी मैदानी प्रशिक्षण घेत आहेत. दरम्यान, कर्जत तालुका आगरी समाज संघटना यांच्याकडून तरुणांना पोलीस भरती प्रशिक्षण मोफत दिले जात असून भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत हे प्रशिक्षण सेंटर सुरु राहणार आहे.

पोलीस भरतीची तयारी करणारे तरुणांना आर्थिक बाब लक्षात घेऊन कोणत्याही अकॅडमीमध्ये जाऊन प्रशिक्षण घेता येत नाही. अशा तरुणांसाठी कर्जत तालुका आगरी समाज संघटनांनी मैदानी प्रशिक्षण देण्याचा निर्णय जाहीर केला होता. त्यानुसार गेला



**■ धामोते येथे २२ तरुणांचा सहभाग**

**■ भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत केंद्र राहणार सुरु**

महिनाभर तालुक्यातील अनेक गावातील तरुण पोलीस भरतीसाठी मैदानी प्रशिक्षण घेत आहेत. धामोते येथील नेरळ विद्या भवन शाळेच्या मैदानावर हे प्रशिक्षण दिले जात आहे.

त्यावेळी कर्जत तालुका आगरी समाज संघटनेचे अध्यक्ष संतोष पेरणे, उपाध्यक्ष भगवान धुळे, जितेंद्र गवळी, संतोष धुळे, प्रभाकर गवळी, रामदास माळी, महेश भगत, संदीप चंचे, बबलू विरले, सोमनाथ विरले आदी उपस्थित होते. यावेळी समाज संघटनेचे वतीने प्रशिक्षक अनंता भोईर यांचा सत्कार करण्यात आला. मैदानी प्रशिक्षणासाठी लागणारे साहित्य आणि व्यायामाचे साहित्य संघटनेचे संचालक बाबू घारे यांनी उपलब्ध केले आहे त्याबद्दल घारे यांचा तसेच मैदान उपलब्ध करून देण्यासाठी महेश विरले यांचे कर्जत तालुका आगरी समाज संघटना यांनी आभार मानले आहेत.

> आपले आयुष्य बळकट करण्यासाठी आणि शरीरसदृढ होण्यासाठी हे प्रशिक्षण घेण्यात येत आहे. तसेच त्याचे प्रशिक्षक अनंता भोईर आहेत. त्यांना सुद्धा दांडगा अनुभव आहे. त्यांनी मागील वर्षांमध्ये एक छोटा उपक्रम घेतला. त्यामध्ये साधारणतः पाच मुलं पोलीस झाले आहेत. इतरही समाजातील गरीब मुलं असतील त्यांना खर्च परवडत नाही अशा मुलांनी या संधीचा लाभ घ्यावा.
>
> **- बाबू घारे**

तरुणांना धामोते येथील मैदानावर आठवड्यातून पाच दिवस सकाळी प्रशिक्षण दिले जाते. दर रविवारी माथेरान घाटात हे प्रशिक्षण दिले जात असून आठवड्यातील तीन दिवस आगरी समाज हॉल येथे जिम निर्माण करून उपलब्ध करून देण्यात आली आहे. तर परीक्षा पेपरासाठी मार्गदर्शन करण्यासाठी तज्ञ उपलब्ध करून देणार असल्याचे समाज संघटना अध्यक्ष संतोष पेरणे यांनी सांगितले आहे.

# काळ्या काचांवर कारवाईची मागणी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

वाहनाला काळ्या काचा लावल्यास त्या वाहनातून प्रवास करणाऱ्या व्यक्तीबाबतची माहिती इतरांना होत नाही. यातून काही अनुचित प्रकार घडू शकतात. त्यामुळे काळ्या काचा लावून फिरणाऱ्यांवर निर्बंध घालण्यात आले आहेत. तसेच चारचाकी वाहनांच्या काचांना काळ्या फिल्म लावल्यास वाहनधारकाला दंड करण्याची तरतूद मोटार वाहन कायद्यात आहे. मात्र पोलिसांकडून अशा वाहनधारकांविरोधात पाहिजे त्या प्रमाणात आजही कारवाई करण्याबाबत चालढकलपणा केला जात असल्याने आजमितीस शहराच्या विविध भागात काळ्या काचा लावून मिरविणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे.पनवेल, उरण, नवी मुंबई आदी ठिकाणी चार चाकी वाहनांना काळ्या काचा लावणाऱ्यांचे प्रमाण वाढू लागलेले दिसून येत आहे.

पनवेल व उरण, नवी मुंबई परिसरात अनेक वाहनांवर काळ्या काचा लावलेली वाहने रस्त्यांवरून धावतांना दिसतात. पनवेल तालुका आणि पनवेल महानगरपालिका हद्दीत चार चाकी वाहनांच्या काचांना काळ्याकाचा लावलेल्या दिसत आहेत. या काळ्या काचामुळे सदर गाडीमध्ये कोण बसले आहे हे देखील समजत नाही. यात पत्रकार आणि पोलीस देखील मागे नाहीत. त्यांच्या गाड्यांना देखील काळ्या काचा लावलेल्या दिसतात. आलिशान कार आणि त्याला काळ्या काचा लावून फिरण्याचा मोह वाहनचालकांना आवरत नाही. काळ्या काचांच्या वापरावर बंदी असूनही पनवेल परिसरात त्यांचा सर्रास वापर केला जात आहे. दरम्यान, परिवहन विभागाच्या परवानगीने तसेच अतिमहत्त्वाच्या व्यक्तींना आपल्या वाहनांवर काळ्या काचा लावण्याची मुभा आहे. अनेकदा समाजकंटकांकडून गैरकृत्य, गुन्हे करण्यासाठी काळ्या काचांचा गैरवापर होण्याचा धोका असल्याने काळ्या काचा वापरण्यावर बंदी घालण्यात आली. मात्र ही बंदी नावापुरतीच असल्याचे एकंदरीत परिस्थितीवर अधोरेखित होतांना दिसते. वाहनांना काळ्या फिल्म लावल्यास कारवाईची तरतूद असली तरी याविषयी फार गांभीयाने कारवाई होत नसल्याने काळ्या फिल्म लावून चारचाकी वाहने शहरातील रस्त्यांवरून धावतांना दिसतात. दरम्यान, वाहनाला काळ्या काचा लावून फिरल्यास सुरुवातीला ५०० रूपयांचा दंड आकारला जातो. मात्र त्याच वाहनधारकाने दुसऱ्यांदा नियमांचे उल्लंघन केल्यास १५०० रूपयांचा दंड आकारला जातो. दरम्यान, अशा व्यक्तींवर वाहतूक पोलिस व आरटीओ यंत्रणांनी कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

● अलिबागमधील नामांकित हॉस्पिटलसाठी नर्स, वॉर्डबॉय, बहुउद्देशीय कार्यकारी महिला पाहिजेत.
मो. ९९२३५०६७७९/८३९०४५५५६५/७५०६३२९९११

● अकाउंटट पाहिजे- पात्रता B com, Tally अनुभव ५ वर्षे ठिकाण-बामणसुरे, चोंढी, पगार - २५००० महिना Contanct - 9823585321

● "जन्नावार हॉस्पीटल" अलिबागमध्ये कामासाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No : 7798034509

● ऑफिस वर्कसाठी मुलगा/मुलगी पाहिजे. वेळ : १० ते ६ वेतन : ५०००/- कॉम्प्युटर नॉलेज व मराठी टायपिंग आवश्यक. धुमाळ हॉस्पिटल जवळ, चेंढरे-अलिबाग. संपर्क : ७२६३८८५७९०

● श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६ अलिबाग

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# 'स्थानकाला गव्हाण-जासई नाव द्या'

**| उरण | प्रतिनिधी |**

नेरुळ/बेलापूर ते उरण या लोकल मार्गावरील गव्हाण रेल्वे स्थानकाला गव्हाण जासई नाव न देता स्थानकाचे उद्घाटन केल्यास जासई ग्रामस्थ आंदोलन करतील असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. सोमवारी सिडको कार्यालयात जाऊन या संदर्भात जासई ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष घरत यांनी १३ जुलै २०२३ च्या सिडकोच्या ठरावानुसार नामविस्तार करावा अशी मागणी केली होती. ती पूर्ण न करताच उरण ते नेरुळ/बेलापूर मार्गावरील गव्हाण व तरघर या दोन्ही स्थानकांच्या उद्घाटनाची तयारी पूर्ण करण्यात आली आहे. केंद्रीय रेल्वे मंत्र्यांच्या हस्ते हे उद्घाटन करण्यात येणार आहेत. मात्र गव्हाण जासई अशी नामविस्तार करण्याची मागणी असतांनाही गव्हाण रेल्वे स्थानकाच्या फलकावर केवळ गव्हाण नाव लिहण्यात आले आहे. त्यामुळे जासई ग्रामस्थांमध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे. या स्थानकासाठी गव्हाण आणि जासई या दोन्ही गावांची जमीन संपादीत करण्यात आली आहे. भूसंपादन होत असताना जासई ग्रामस्थांनी व ग्रामपंचायतीने सिडकोकडे गव्हाण जासई नामकरणाची मागणी केली होती. तसा ठराव करून सिडकोकडून रेल्वे विभागाकडे करण्यात आला होता. मात्र तरीही नामविस्तार न केल्याने सिडकोला जाब विचारण्यासाठी जासई ग्रामपंचायतीच्या वतीने विचारणा करण्यात आली. यावेळी संतोष घरत, धीरज घरत, आदित्य घरत, विनायक घरत, संतोष कृष्णाजी घरत, अभिषेक घरत आदी उपस्थित होते.




## नेत्र चिकित्सा शिबिराचे आयोजन

**नागोठणे :** नागोठणे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच फरमान दफेदार यांचे स्मरणार्थ त्यांचे पुत्र सद्दाम व रमीज दफेदार यांच्या सहकार्याने नागोठणे लायन्स क्लब यांच्या वतीने नवीन पनवेल येथील आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल यांच्याकडून बुधवार (दि.५) नोव्हेंबर रोजी मोफत नेत्र व मोतिबिंदू तपासणी आणि शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नागोठण्यातील स्व. बाळासाहेब ठाकरे बालोद्यानमधील लायन्स क्लबच्या कार्यालयात सकाळी ९ वा. पासून सुरू होणाऱ्या या मोफत नेत्र व मोतिबिंदू तपासणीचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सद्दाम दफेदार यांनी केले आहे.

# भुजबळवाडीत तुळशी विवाह



**| पनवेल | प्रतिनिधी |**

नवीन पनवेल सेक्टर १५, भुजबळवाडी,येथे तुलसी विवाह निमित्त संपूर्ण भुजबळ कुटुंबीय आणि तेथील रहिवासी यांनी एकत्र येऊन सामुदायिक तुळशी विवाह संपन्न केला. यावेळी मोठ्या संख्येने स्त्री-पुरुष, भुजबळ कुटुंबीय त्याचबरोबर बच्चे कंपनी हजर होते.

यावेळी माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, सुभाष भुजबळ, तेजस भुजबळ, हेमंत भुजबळ, अमित भुजबळ, संकेत भुजबळ, मधुरा भुजबळ, प्रियांका भुजबळ, अंजली भुजबळ, प्रशांत भुजबळ, सुरेखा भुजबळ, शेखर भुजबळ, संतोष भुजबळ, राकेश भुजबळ, अनंत जाधव, प्रमोद भुजबळ, गोविंद राजपुरोहित आदी उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की खालील वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीचे मालक सौ. कल्पना संतोष जाधव, श्री. नरेश संतोष जाधव, श्री. सतिष संतोष जाधव, सौ. सुप्रिया विश्वनाथ गायकवाड यांनी त्यांचे स्वकष्टार्जित मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील मिळकत आमचे अशिल वृषाली दिलीप शिंदे यांना कायम स्वरूपी खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले असून तशी बयाना पावती सुद्धा आमचे अशिलांनी मिळकतीचे मालक यांचेसोबत केलेली आहे. मौजे-सावेळे, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड येथील शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

| भुमापन कमांक व उपविभाग | शेतजमिनीचे क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. आ. |
|---|---|---|
| ९/४ | ०.१७.९० जिरायत<br>०.२०.०० वरकस<br>०.०१.८० पोटखराबा<br>०.३९.७० एकूण | २.५० |

तरी शेतजमिन मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा, पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षीस, दान, जप्ती, लिज, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशिर हक्क, खरेदीखत, भारतातील कोणत्याही कोर्टाचे मनाईहुकूम, करारनामा व इतर हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार वकील यांच्या नमुद केलेल्या कार्यालयाचे पत्त्यावर आपल्या हरकती लेखी पुराव्यासह देण्यात यावे. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आली तर ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

कर्जत
तारीख ०५/११/२०२५

सही /-
**ॲड. प्रणित शिवराम भिंगारदिवे**
पत्ता : ऑफीस नंबर ०५, पहिला मजला,
नेमीनाथ शॉपींग सेंटर, मुद्रे बुद्रुक, कर्जत, ता. कर्जत
जि. रायगड, मो. नं. ९५९४९३०८८९

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता.मुरूड, जि. रायगड )
ज. म. र अर्ज ३७८/२०२५

**जाहिर नोटीस**

खुर्शीद बेगम महमद चिलवान,
रा. मु. पो. विहूर, ता. मुरुड जंजिरा, — अर्जदार
जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत मजगांव, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार खुर्शीद बेगम महमद चिलवान, हिचा जन्म दिनांक १७/०१/१९६० रोजी माहेरच्या घरी म्हणजे मौजे मजगांव, ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत मजगांव कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३(३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार खुर्शीद बेगम महमद चिलवान, हिचा दिनांक १७/०१/१९६० रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि. २१/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही, असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता ३०/१०/२०२५ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरूड-जंजिरा**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीचे मालक १. सौ. प्रतिभा परशुराम भगत, २. महादेव बारकू कोळंबे, ३. जिजाबाई जनार्दन तळपे यांनी त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील मिळकत आमचे अशिल यांना कायम स्वरूपी खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिलांचे बरोबर केलेली आहेत. मौजे चांदई, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड ४१०२०१ येथील सामाईक शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे नमुद केले आहे.

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.चौ.मी) | आकार (रू.पै) |
|---|---|---|
| २१/६ | एकूण क्षेत्र ०.८९.०० या पैकी जमिन मालक १. सौ. प्रतिभा परशुराम भगत, २. महादेव बारकू कोळंबे, ३. जिजाबाई जनार्दन तळपे यांनी त्यांचे हिस्याचे सामाईक शेतजमिनीचे क्षेत्र ०. ५०.७० हे. आर. पो.ख. ०.०३.३० हे. आर एकूण ०.५४.०० हे.आर.चौ.मी. पैकी विक्री करत असलेले क्षेत्र ०.२०.०० हे.आर.चौ.मी | ५.९६ |

तरी शेतजमिन मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, वहिवाट, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षीस, दान, जप्ती, लिज, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशिर हक्क, भारतातील कोणत्याही कोर्टाचे केसेस व मनाईहुकूम, न्यायनिर्णय, आदेश, तसेच त्रयस्थ इसमांबरोबर केलेला करारनामा व इतर कोणतेही हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ (एकविस) दिवसांचे आत खाली सही करणार वकील यांच्या नमुद केलेल्या कार्यालयाचे पत्त्यावर आपल्या हरकती लेखी पुराव्यासह देण्यात यावे. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आली तर ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

कर्जत
तारीख ०५/११/२०२५

सही /-
**ॲड. जगदिश पांडूरंग कराळे**
कार्यालय : गाळा नंबर १०, पंकज रेसिडेन्सी,
साई हॉस्पिटल जवळ आगरी समाज हॉल शेजारी,
धामोते, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१,
मो.नं. ८३६९२१७३१३

## पनवेल महानगरपालिका

**जाहिर ई- निविदा सुचना**
**कालावधी -३ वर्ष**

पनवेल महानगरपालिका अंतर्गत सार्वजनिक उद्यानांमध्ये/सार्वजनिक ठिकाणी बेंचेस पुरविणेकामी तीन वर्षाकरिता दरकरार करणेबाबत या कामासंबंधीचा सविस्तर तपशील www.mahatender.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

जा.क्र.:पमपा/भांडार/३७२५/प्र.क्र./९२९/२०२५
दिनांक : ०४/११/२०२५

सही/-
**(गणेश शेटे)**
**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता. मुरूड, जि. रायगड)
ज. म. र अर्ज ३७७/२०२५

**जाहिर नोटीस**

परवीन अतिक दळवी,
रा. मु. पो. शिघ्रे, ता. मुरुड जंजिरा — अर्जदार
जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत शिघ्रे, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार परवीन अतिक दळवी हिचे पति अतिक फारूक दळवी, यांचा जन्म दिनांक ०४/०८/१९८२ रोजी राहत्या घरी म्हणजे मौजे शिघ्रे, ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत शिघ्रे कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार हिचे पति अतिक फारूक दळवी यांचा दिनांक ०४/०८/१९८२ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि. / / २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही. असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता ३०/१०/२०२५ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(आदेश डफळ )**
**तहसिलदार मुरूड-जंजिरा,**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे देऊळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक १) श्री. लक्ष्मण श्रीपत बडेकर २) श्री. भरत श्रीपत बडेकर ३) श्री. अरविंद श्रीपत बडेकर ४) श्री. प्रकाश श्रीपत बडेकर कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ५९ | २ / अ | ०-५३-८०<br>पैकी ०-१६-०० | ८=५० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, ॲटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक ०४/११/२०२५

**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४/९२७१८६९२०२

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता.मुरुड, जि.रायगड)
ज.म.र अर्ज ३८३/२०२५

जाहिर नोटीस

खतिजा शहादत फकी,
रा. मु. पो. साळाव, ता. मुरुड जंजिरा — अर्जदार
जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत साळाव, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार खतिजा शहादत फकी हिचे पति शहादत अली शरफुद्दीन फकी, यांचा जन्म दिनांक २३/०३/१९६४ रोजी राहत्या घरी म्हणजे मौजे साळाव, ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत साळाव कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार हिचे पति शहादत अली शरफुद्दीन फकी, यांचा दिनांक २३/०३/१९६४ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे. न्यायालयांत दि.२१/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही, असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.३०/१०/२०२५ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली. कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरूड-जंजिरा**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता.मुरुड, जि.रायगड)
ज.म.र अर्ज३८१/२०२५

**जाहिर नोटीस**

खतिजा अब्दुल रहीम झोंबरकर,
रा. मु. पो. मजगांव, ता. मुरुड जंजिरा, — अर्जदार
जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत मजगांव, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार खतिजा अब्दुल रहीम झोंबरकर, हिचा जन्म दिनांक ०१/१०/१९६८ रोजी माहेरच्या घरी म्हणजे मौजे मजगांव, ता. मुरूड जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत मजगांव कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार खतिजा अब्दुल रहीम झोंबरकर, हिचा दिनांक ०१/१०/१९६८ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि. २१/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३०/१०/२०२५ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरूड-जंजिरा**

## जाहीर नोटीस

दिनांक ०४/११/२०२५

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे हेदवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील,

| मालकाचे नाव | सर्व्हे/हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| श्री.शिवलाल बाबुलाल गुप्ता | ९८/५ | ०-५६-०० | ०-४४ |

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेली आहे. तसा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणपावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहेत. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशीर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जमीन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.
येणे प्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा. मातोश्री निवास आवळस, ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमणध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता. मुरूड, जि. रायगड)
ज.म.र अर्ज ३७६/२०२५

**जाहिर नोटीस**

रफअत सुलताना महमद चिलवान
रा. मु. पो. शिघ्रे, ता. मुरुड जंजिरा — अर्जदार
जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत मजगांव, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार रफअत सुलताना महमद चिलवान हिचा जन्म दिनांक ३०/०४/१९५६ रोजी माहेरच्या घरी म्हणजे मौजे मजगांव, ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत मजगांव कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार रफअत सुलताना महमद चिलवान, हिचा दिनांक ३०/०४/१९५६ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि.२१/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही. असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता ३०/१०/२०२५ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(आदेश डफळ )**
**तहसिलदार मुरूड-जंजिरा,**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळवण्यांत येते की, खाली नमुद केलेल्या शेत जमीन मिळकती ह्या खाली लिहीलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असून, ती त्यांचे खुद्द ताबा, कबजा मालकी, वहीवाटीतील आहे, त्या शेत जमीन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजेः घोटवडे, ता.सुधागड, जि. रायगड येथीलः-**

| मालकाचे नांव | गट/भुमापन क्र. | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. | भोगवटा वर्ग |
|---|---|---|---|---|
| भरत मुलजी खोना | १२५/१ | ३-८८-०० | १=०० | १- खालसा / भात |

वरील मिळकतींसंबंधात आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे, यास्तव वरील मिळकतींवर अन्य कोणाचा दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिएन, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, कुळवहिवाट, ताबा, कबजा, वहीवाट, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, जप्ती, मॉर्टगेज, संपादन, रिझर्व्हेशन, रेक्वीझेशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध तसेच एकत्र कुटूंब मिळकत असल्याने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसाचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रत्यक्ष भेटून मुदतीमध्ये हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती मुदतीत दाखल न केल्या गेल्यास सदरच्या वरील मिळकती पुर्णपणे निर्वेध असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल वरील जमीन मालकांशी खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.
हे कळावे,

दि.०५/११/२०२५

**ॲड. रूचिता संतोष भगत,**
ॲडव्होकेट,
पत्ता : मु.पो.जांभुळपाडा,
ता. सुधागड, जि. रायगड
मोबा. क्र. ९८६०२४७७३९

## नोटीस

दिनांक : ०४/११/२०२५

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक श्री. राजेंद्र चक्रधर ढापरे, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| नागांव ता.अलिबाग | २०७ | ०-४१-३०<br>पो.ख. ०-०१-३०<br>एकुण क्षेत्र ०-४२-६० | ९.६९ |

वर नमुद मिळकतीमधील श्री. राजेंद्र चक्रधर ढापरे यांच्या नावे असलेली बागायत मिळकत व त्यामधील ग्रुप ग्रामपंचायत नागांव हद्दीतील घर क्रमांक ४२७ क्षेत्र १४०६ चौ.फुट या मिळकतींबाबतचे

दिनांक : ०४/११/२०२५
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## अलिबाग नगरपरिषद, अलिबाग

**जाहीर नोटीस**

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणा संबंधाने अलिबाग नगरपरिषद प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह अलिबाग नगरपरिषदेकडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा कर वसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन नगरपरिषद दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

अलिबाग नगरपरिषद/जाहीर नोटीस जा.क्र. /२०२५ दि.

| अ. क्र. | अनुसूची | अनुसूची पुस्तकातील क्रमांक मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप वर्णन/ब्लॉक/ गाळा वगैरे | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याची नावे | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | १०७७Aविंग/०४७४५ | पागाची गल्ली, अलिबाग | चौथा मजला, अे विंग, सदनिका का क्र. ४०३ | एम/एम मधुर इंटरप्रायझेस थ्रु पार्टनर सतीश हरिदास ठक्कर | मोहनलाल बाबूलाल जैन |
| २ | २ | ४९५/००६४३ | रायगड बाजार समोर, अलिबाग | दुसरा मजला, सदनिका क्र.२०२, | अबंतिका अजित सिंगासने | मंगला रविंद्र जोशी |
| ३ | २ | १२५७/०१५२४ | मारूतीनाक्याजवळ अलिबाग | सदनिका क्र.१ | शांता राया कामत वगैरे ८ | अक्षय अंकुश शिंदे व अवराजिता डोगर शिंदे |
| ४ | २ | १०७३Cविंग/०५०२१ | छत्रपती शिवाजी महाराज चौक,अलिबाग | दुसरामजला, बी विंग, सदनिका क्र. बी/२०४ | भावना कमलेशकुमार जैन व कमलेशकुमार एस जैन | नीता तुषार कोलते व तुषार रघुनाथ कोलते |
| ५ | २ | १२५९/०१५२५ | मारूतीनाक्याजवळ अलिबाग | सदनिका क्र.१ | शांता राया कामत जैन ८ | अक्षय अंकुश शिंदे व कृष्णाजी शिंदे |
| ६ | २ | १८११/अ/०२१४३ | कलेक्टर रोड, अलिबाग | सदनिका क्र. १०१/०८/०९/०१० | राम फातुमल कोटवानी | रणजित सिंघ बिंद्रा हॉस्पिटलिटी प्रा लि तर्फे अधिकृत स्वाक्षरीकरीता कुनाल जानी |
| ७ | ३ | ९०५/०११९८ | शिवलकर नाका, | सदनिका क्र.१ व १०१ | इदनदास गेलाराम असरानी | राजेश इदनदास असराणी, सचिन प्रेमकुमार असराणी व भरत प्रेमकुमार असराणी |
| ८ | २ | १३५४/०१६२१ | ब्राम्हणआळी, रामनाथ रोड, अलिबाग | पहिला मजला सदनिका क्र.१०४ | मेसर्स कळसगिरी बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्सचे प्रोप्रा.प्रसाद अनंत जोग | दिलीप केशव हळदवणेकर |
| ९ | २ | ११०४Fविंग/०३६०५ | मारूतीनाक्याजवळ, अलिबाग | तळमजला, एस विंग, सदनिका क्र.१०३ | निर्मला विनायक पाटील | पंकज सुरेश रावते |
| १० | २ | १३४५Aविंग/०१६१० | ब्राम्हणआळी, अलिबाग | तळमजला सदनिका क्र.१ | मेसर्स शिवशक्ती एंटरप्रायझेस तर्फे भागीदार सतीश रमेशलाल तनीया, सुखवानी विजय अमृतलाल व घनश्याम रतनचंद पुरस्वामी | प्रमोद केशव देव |
| ११ | २ | ३२/०४०९५ | जुने मच्छीमार्केटजवळ अलिबाग | तळमजला, निवासी सदनिका क्र.१०४ | मिलन सुशांत सिन्हा | प्रणिता नयन पाटील व नयन विश्वनाथ पाटील |
| १२ | ३ | १४१०Cविंग/०१६७२ | जुन्या नगरपरिषदेजवळ अलिबाग | दुसर ामजला, सी विंग, सदनिका क्र.२०४ | निर्मला राजन खांडेकर | सोनल विशाल कांबळे |
| १३ | २ | १५८७/अ/०१८९३ | ब्राम्हणआळी, अलिबाग | रेज पहिला मजला, निवासी सदनिका क्र. १०१/५(०५) | प्रितेश जगदीश थळे | उमेश सुरेश थळे |
| १४ | २ | ३३/४४/०४१९३ | भाजीमार्केटजवळ, अलिबाग | चौथा मजला, निवासी सदनिका क्र.४०४ | हितेश छटवाल तर्फे कबुलीजबाबाकरीता अखत्यारीच्या तर्फे दस्तऐवज प्रवेशासाठी कु.मु.इस्मीयाज जहांगिर सय्यद | निसार अहमद उमर दाखवे व सिद्दीका निसार अहमद दाखवे |
| १५ | २ | १५५९/०४११२ | ब्राम्हणआळी, अलिबाग | तिसरा मजला, निवासी सदनिका क्र.३०३ | कृष्णा केशव जाधव व सरीता कृष्णा जाधव | सुषमा दिनेश साळवी व दिनेश कृष्णा साळवी |
| १६ | २ | १२७०/०५०७० | मारूतीनाक्याजवळ, अलिबाग | पहिला मजला, सदनिका क्र.पहिला मजला गाळा ०८ | अक्षय बिल्डर्स तर्फे प्रशांत मधुसूदन नाईक व संजय ज्ञानदेव चव्हाण तर्फे कबुलीजबाबाकरीता अखत्यारी किशोर अनंत पाटील | प्रदीप हरिश्चंद्र थळे |
| १७ | २ | १२७०/०५०७४ | मारूतीनाक्याजवळ, अलिबाग | पहिला मजला, सी विंग, सदनिका क्र.सी १०८ | अक्षय बिल्डर्स तर्फे प्रशांत मधुसूदन नाईक व संजय ज्ञानदेव चव्हाण तर्फे कबुलीजबाबाकरीता अखत्यारी किशोर अनंत पाटील | मकरंद रमेश नाईक व वर्षा मकरंद नाईक |
| १८ | २ | १४२६Aविंग/०१६८९ | कामतआळी, अलिबाग | तळमजला, दुकान गाळा क्र.०६ (६) | अमोल अनंत डाकी | वृषाली संतोष राऊत |
| १९ | २ | १४२६Aविंग/०१६८९ | कामतआळी, अलिबाग | तळमजला, दुकान गाळा क्र.०५ (५) | अमोल अनंत डाकी | संतोष दशरथ राऊत |
| २० | २ | ६४६/ब(बिल्डिंगC) AWING/०५०९८ | चेंढरे, अलिबाग | तिसरा मजला, ए विंग, निवासी गाळा क्र.४०४ | शार्दुल बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार प्रशांत दिनकरराव फुलगांवकर व कविता प्रशांत फुलगांवकर | अक्षय विजय पाटील व रूतिका अक्षय पाटील |
| २१ | २ | १२७०/०५०७४ | मारूतीनाक्याजवळ अलिबाग | चौथा मजला, सदनिका क्र.सी/४०४ | अक्षय बिल्डर्स तर्फे प्रशांत मधुसूदन नाईक व संजय ज्ञानदेव चव्हाण तर्फे कबुलीजबाबाकरीता अखत्यारी किशोर अनंत पाटील | अनघा अशोक थळे |
| २२ | २ | ५५१/००७३३ | चेंढरे अलिबाग | तळमजला, निवासी गाळा क्र.०१ | मे.शशांक कन्स्ट्रक्शन ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे प्रो प्रा संतोष दामोदर मोरे | अजित तुकाराम सिंगासने |
| २३ | २ | ५५१/००७३३ | चेंढरे,अलिबाग | तळमजला, निवासी गाळा क्र.०३ | मे.शशांक कन्स्ट्रक्शन ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे प्रो प्रा संतोष दामोदर मोरे | अजित तुकाराम सिंगासने |
| २४ | २ | १४३४Aविंग/०१६९८ | कामतगल्ली,अलिबाग | तळमजला, ए विंग, व्यापारी गाळा क्र.०१५ (१५) | राहुल विनोद नाईक | आशिष सदानंद वैशंपायन |
| २५ | २ | १०५८/०५१५३ | छत्रपती शिवाजी महाराज चौक,अलिबाग | पाचवा मजला, निवासी सदनिका क्र.५०२ | म्हात्रे बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे पार्टनर नितीन सुर्यकांत म्हात्रे | भालचंद्र गोपीनाथ घरत |
| २६ | २ | १६६२Cविंग/०१९८५ | जिल्हा न्यायालयाजवळ अलिबाग | पहिला मजला, निवासी सदनिका क्र.१०२(०४) | मंगेश दत्तात्रेय हळदवणेकर व भारती मंगेश हळदवणेकर | परेश मनोहर घरत |
| २७ | २ | ११०७७Bविंग-१/ ०४७४७ | पागाची गल्ली, अलिबाग | पहिला मजला सदनिका क्र.बी-१०१ | बळवंत पांडुरंग वालेकर | सुधीर भानुदास पाटील व प्रमिला सुधीर पाटील |
| २८ | २ | ८९६/०११८८ | खोजनीनाक्याजवळ, अलिबाग | सदनिका क्र.१ | बहादूर नाथाबाई हसलानी स्वतःकरीता व प्यारअल्ली नाथाभाई हसलानी | वंदना साहेबराव राठोड व चंद्रभागा जनार्दन वालेकर |
| २९ | २ | १२९५अ/६/०४२०९ | बालाजीनाक्याजवळ, अलिबाग | सदनिका क्र.१०३ ऑफिस | मे मंदार एंटरप्रायझेस तर्फे पार्टनर रमेश शांताराम काफरे | जयश्री राजेंद्र देशमुख व राजेंद्र चंद्रकांत देशमुख |
| ३० | २ | ५०३/३/०५१७५ | चेंढरे,अलिबाग | पहिला मजला, सदनिका क्र.१०१ | मे म्हात्रे बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे पार्टनर नितीन सुर्यकांत म्हात्रे | महेश जनार्दन म्हात्रे व कविता महेश म्हात्रे |
| ३१ | २ | १०७७ B विंग-९/ ०४७५५ | पागाची गल्ली,अलिबाग | दुसरा मजला, सदनिका क्र.बी-२०४ | एम/एस मधुर इंटरप्रायझेस थ्रु पार्टनर सतीश हरिदास ठक्कर | संदीप अविनाश पाटील |
| ३२ | २ | १५९७/०१९१० | ब्राम्हणआळी, अलिबाग | पहिला मजला, सदनिका क्र.१०२ | श्री.मुख्य प्रवर्तक सागरगड गृहनिर्माण संस्था | सुभाष मोतीराम म्हात्रे |
| ३३ | २ | ५८३/अ/०७७३ | चेंढरे,अलिबाग | सदनिका क्र.१ | अवंतिका अजित सिंगासने | निलेश अनंत गुरव |

**मुख्याधिकारी**
अलिबाग नगरपरिषद

# निवडक

## आयसीसीची टीम ऑफ द टूर्नामेंट जाहीर

**मुंबई :** आयसीसीने महिला विश्वचषक २०२५ च्या टीम ऑफ द टूर्नामेंटची घोषणा केली. या संघात विश्वविजेत्या भारत आणि उपविजेत्या दक्षिण आफ्रिकेच्या प्रत्येकी तीन खेळाडूंचा समावेश आहे. भारताकडून सलामीवीर स्मृती मानधना, फलंदाज जेमिमा रॉड्रिग्ज आणि प्लेअर ऑफ द टूर्नामेंट दीप्ती शर्मा यांचा समावेश करण्यात आला आहे, तर दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वुल्व्हार्डचाही समावेश आहे. ११ खेळाडूंच्या या संघात उपांत्य फेरीत पोहोचलेल्या ऑस्ट्रेलियन संघातील तीन खेळाडूंचाही समावेश आहे. या तीन खेळाडू म्हणजे ॲनाबेल सदरलँड, ॲश गार्डनर आणि अलाना किंग आहेत. इंग्लंडच्या सोफी एक्लेस्टनला संघात स्थान देण्यात आलं आहे, तर पाकिस्तानची सिद्रा नवाज ही बाद फेरी गाठण्यात अपयशी ठरलेल्या संघातून निवडलेली एकमेव खेळाडू आहे. स्मृती मानधना स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकाची सर्वाधिक धावा करणारी खेळाडू आहे. तिने ५४.२५ च्या सरासरीने ४३४ धावा केल्या, ज्यात एक शतक आणि दोन अर्धशतकांचा समावेश आहे. टीम ऑफ द टूर्नामेंटची कर्णधार म्हणून लॉरा वुल्व्हार्डची निवड करण्यात आली आहे. लॉराने संपूर्ण स्पर्धेत प्रभावी फलंदाजी केली.

## बीसीसीआयचे पदाधिकारी दुबईला रवाना

**नवी दिल्ली :** महिला विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेवर मात करत पहिला वहिला विश्वचषक उंचावला आहे. या विजयासह गेल्या तीन दशकांपासूनची भारतीय क्रिकेटरसिकांची प्रतीक्षा संपली. भारतीय महिला संघाने एकदिवसीय विश्वचषक उंचावला आहे. या विजयानंतर देशभर जल्लोष केला जात आहे. महिलांनी एकदिवसीय विश्चचषक पटकावल्यानंतर आता भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आशिया चषकाकडे लक्ष वळवलं आहे. भारतीय संघाने जिंकलेला आशिया चषक भारतात आणण्यासाठी बीसीसीआयने तयारी सुरू केली आहे. यासाठी बीसीसीआयचे अधिकारी दुबईला रवाना झाले आहेत. दुबईमध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेची (आयसीसी) बैठक होत आहे. या बैठकीत बीसीसीआयचे अधिकारी आशिया चषकाचा मुद्दा उपस्थित करतील. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे सचिव देवजीत सैकिया यांनी मुंबई विमानतळावर आयएएनएसशी बातचीत केली. यावेळी त्यांनी सांगितलं की, सद्यस्थितीत विजयी मिरवणूक आयोजित करण्याची बीसीसीआयची कोणतीही योजना नाही.

## दुखापतीमुळे रविचंद्रन टूर्नामेंटमधून बाहेर

**सिडनी :** रविचंद्रन अश्विनवर अलीकडेच गुडघ्याची शस्त्रक्रिया झाली आहे, तो सध्या त्यातून सावरत आहे. तथापि, दुखापतीमुळे तो आगामी बिग बॅश लीग हंगामातून बाहेर पडला आहे आणि आता तो त्यात खेळू शकणार नाही. त्याने सिडनी थंडरशी करार केला होता. बीबीएलमध्ये खेळणारा तो पहिलाच भारतीय खेळाडू बनणार होता. रविचंद्रन अश्विन म्हणाला, बिग बॅश लीगच्या १५ व्या हंगामातून बाहेर पडल्याने मला खूप दुःख झाले आहे. आता माझे लक्ष पुनर्प्राप्ती आणि मजबूत पुनरागमनावर आहे. सिडनी थंडर कुटुंबाच्या पाठिंब्याबद्दल मी आभारी आहे. ट्रेंट कोपलँड आणि संपूर्ण व्यवस्थापनाने आमच्या पहिल्याच संभाषणातून मला क्लबचा भाग वाटले. जर पुनर्वसन आणि प्रवास योजनांना परवानगी मिळाली तर मला हंगामाच्या शेवटी संघासोबत राहून चाहत्यांना भेटायला आवडेल.फ्फ येत्या बीबीएल हंगामात १६ डिसेंबर रोजी होबार्टमध्ये हरिकेन्सविरुद्ध सिडनी थंडर खेळेल. सिडनी थंडरचे महाव्यवस्थापक म्हणाले, रविचंद्रन अश्विनच्या दुखापतीबद्दल ऐकून मला धक्का बसला.पण या हंगामात आम्ही त्याला काही सामन्यांसाठी आमच्या डगआउटमध्ये समाविष्ट करू.

## द. आफ्रिका पाकिस्तानला लोळवणार?

**लाहोर :** दक्षिण आफ्रिका क्रिकेट टीम सध्या पाकिस्तान दौऱ्यावर आहे. दक्षिण आफ्रिका विरुद्ध पाकिस्तान यांच्यात कसोटी आणि टी २० मालिका खेळवण्यात आली. दक्षिण आफ्रिकेने दौऱ्याची सुरुवात विजयाने केली. दक्षिण आफ्रिकेने पाकिस्तानला पहिल्या कसोटीत पराभूत करत मालिकेत आघाडी घेतली. त्यानंतर पाकिस्तानने दुसऱ्या आणि अंतिम सामन्यात विजय मिळवत मालिकेत १-१ ने बरोबरी साधली. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेने कसोटीप्रमाणे टी २० मालिकेतही विजयी सलामी दिली. मात्र पाकिस्तानने त्यानंतर सलग २ सामने जिंकत मालिका आपल्या नावावर केली. पाकिस्तानने दक्षिण आफ्रिकेवर २-१ ने विजय मिळवला. त्यानंतर आता उभयसंघात ३ सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेचा थरार रंगणार आहे.मॅथ्यू ब्रिट्झके या मालिकेत दक्षिण आफ्रिकेचं नेतृत्व करणार आहे. तर शाहिन शाह आफ्रिदी या मालिकेतून एकदिवसीय कर्णधार म्हणून पदार्पण करणार आहे. शाहिन रिझवान याची जागा घेणार आहे. या मालिकेत रिझवान आणि आझम या दोघांच्या कामगिरीकडे क्रिकेट विश्वाचं लक्ष असणार आहे. या मालिकेत बाबरला खास कामगिरी करण्याची संधी आहे.बाबरने आतापर्यंत टेस्ट, वनडे आणि टी २० क्रिकेटमध्ये मिळून एकूण ३२६ सामन्यांमध्ये १४,९५९ धावा केल्या आहेत.

### आशिया कप रायझिंग स्टार्स टी-२० स्पर्धा

# भारताचे विजेतेपदावर लक्ष्य



**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

आशियाई क्रिकेट परिषदेच्या आशिया कप रायझिंग स्टार्स टी-२० स्पर्धेसाठी बीसीसीआयने भारतीय संघाची घोषणा केली आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर टीम इंडियाच्या ताफ्यात असलेल्या जितेश शर्माकडे भारतीय अ संघाचे नेतृत्व सोपवण्यात आले आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात जितेश शर्माला संजू सॅमसनच्या जागी प्लेइंग इलेव्हनमध्ये संधी मिळाली होती. या दौऱ्यावरुन परतल्यार तो कतार येथील दोहा येथे रंगणाऱ्या स्पर्धेत भारतीय संघाचे नेतृत्व करताना दिसेल.

आशिया कप रायझिंग स्टार्स टी-२० स्पर्धेसाठी निवडलेल्या भारतीय अ संघात १४ वर्षीय युवा बॅटर वैभव सूर्यवंशी यालाही संघात संधी देण्यात आली आहे. भारतीय अ संघाकडून युवा बॅटरसाठी ही पहिली मोठी स्पर्धा असेल. आयपीएलनंतर वैभव सूर्यवंशी याने ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड दौऱ्यात धमाकेदा कामगिरी करून दाखवली आहे. छोट्या फॉरमॅटमध्ये मोठा धमाका करण्यासाठी माहिर असलेला वैभव या दौऱ्यात प्रियांश आर्य याच्या साथीनं डावाची सुरुवात करताना पाहायला मिळू शकते. १४ नोव्हेंबर ते २३ नोव्हेंबर या कालावधीत वेस्ट एंड आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, दोहा येथे ही स्पर्धा पार पडणार आहे.

या स्पर्धेत पुन्हा पाहायला मिळणार भारत-पाक महामुकाबला आशिया कप २०२५ स्पर्धेत सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील संघाने तीन वेळा पाकस्तानचा पराभूत केले होते. फायनलमध्ये पाकला पराभूत करूनच टीम इंडियाने दुबईत आशिया कप स्पर्धेतील आपला दबदबा कायम ठेवला होता. त्यानंतर महिला वर्ल्ड कप स्पर्धेतही भारतीय महिला संघाने पाकिस्तानला पराभवाचा धक्का दिला. आता जितेश शर्माच्या नेतृत्वाखालील संघ पुन्हा पाक विरुद्ध भिडणार असून निकाल आधी लागला तसाच पाहायला मिळेल, अशी अपेक्षा आहे.

**टी-२० साठी भारतीय संघ**

प्रियांश आर्य, वैभव सूर्यवंशी, नेहल वढेरा, नमन धीर (उप-कर्णधार), सूर्यांश शेडगे, जितेश शर्मा (कर्णधार), रमनदीप सिंह, हर्ष दुबे, आशुतोष शर्मा, यश ठाकुर, गुरजापनीत सिंह, विजय कुमार वैश्य, युद्धवीर सिंह, अभिषेक पोरेल (विकेटकीपर), सुयश शर्मा

**राखीव खेळाडू - गुरनूर बराड, कुमार कुशाग्र, तनुश कोटियन, समीर रिझवी, शेख रशीद.**

**सामन्याचे वेळापत्रक**

- १४ नोव्हेंबर : ओमान विरुद्ध पाकिस्तान आणि भारत विरुद्ध यूएई
- १५ नोव्हेंवर : बांगलादेश विरुद्ध हाँगकाँग आणि अफगानिस्तान विरुद्ध श्रीलंका
- १६ नोव्हेंबर : ओमान विरुद्ध यूएई; भारत विरुद्ध पाकिस्तान
- १७ नोव्हेंबर : हाँगकाँग विरुद्ध श्रीलंका आणि अफगानिस्तान विरुद्ध बांगलादेश
- १८ नोव्हेंबर : पाकिस्तान विरुद्ध यूएई आणि भारत विरुद्ध ओमान
- १९ नोव्हेंबर : अफगानिस्तान विरुद्ध हाँगकाँग आणि बांगलादेश विरुद्ध श्रीलंका
- २१ नोव्हेंबर - सेमीफायनल: १ विरुद्ध २ आणि १ विरुद्ध २
- २३ नोव्हेंबर - फायनल

# सॅमसन-हर्षित राणाची पुनरागमनाची शक्यता नाही




**| नवी दिल्ली | वृत्तसस्था |**

भारत आणि ऑस्ट्रेलिया चौथ्या टी-२० मध्ये आमनेसामने येतील. पाच सामन्यांची मालिका सध्या १-१ अशी बरोबरीत आहे. भारतीय संघ दुसरा सामना जिंकून आघाडी घेण्याचा प्रयत्न करेल. तिसऱ्या सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाला ५ विकेट्सने हरवून मालिका बरोबरीत आणली. वेगवान गोलंदाज हर्षित राणा आणि यष्टीरक्षक-फलंदाज संजू सॅमसन चौथ्या टी-२० मध्ये परतण्याची शक्यता कमी आहे. चायनामन स्पिनर कुलदीप यादव देखील भारतात परतला आहे. चौथ्या सामन्यासाठी भारत त्यांच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये काही बदल करेल का? हे खूपच कमी आहे, कारण भारत विजयी संघात बदल टाळू इच्छित असेल.

तिसऱ्या टी-२० मध्ये हर्षित राणा आणि संजू सॅमसनची जागा घेणाऱ्या दोन खेळाडूंनी शानदार कामगिरी केली. संजूची जागा जितेश शर्माने घेतली आणि हर्षितची जागा वेगवान गोलंदाज अर्शदीपने प्लेइंग इलेव्हनमध्ये घेतली. जितेशने चांगली फलंदाजी केली, तर अर्शदीपने तीन विकेट्स घेत भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली आणि त्याला सामनावीर म्हणून निवडण्यात आले. कुलदीपची जागा घेणाऱ्या वॉशिंग्टन सुंदरने नाबाद ४९ धावा करून भारताला मालिकेत परतण्यास मदत केली.

भारतीय संघ चौथ्या सामन्यासाठी प्लेइंग इलेव्हनमध्ये कोणताही बदल करणार नाही. तथापि, शुबमन गिलचा खराब फॉर्म संघासाठी चिंतेचा विषय आहे. गिलला प्लेइंग इलेव्हनमधून वगळण्याची शक्यता कमी आहे. तो संघाचा उपकर्णधार आहे आणि जर त्याला वगळण्यात आले तर सर्वात मोठा प्रश्न असा असेल की अभिषेक शर्मासोबत डावाची सुरुवात कोण करेल. भारतीय संघात बॅकअप ओपनरचीही कमतरता आहे.

# मुंबई क्रिकेटमध्ये सर्वपक्षीय ‘राजकारण’

**| मुंबई | वृत्तसंस्था |**

भारतीय क्रिकेटमधील प्रतिष्ठेच्या मुंबई क्रिकेट संघटनेच्या निवडणुकीसाठी भाजप, उद्धवसेना आणि राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या आमदारांसह विविध पक्षांतील नेत्यांनी अध्यक्षपदासाठी अर्ज भरले आहेत. विशेष म्हणजे, एमसीएचे मावळते अध्यक्ष अजिंक्य नाईक यांनीही पुन्हा एकदा अध्यक्षपदासाठी अर्ज केला आहे.

भारताच्या माजी कर्णधार डायना एडुल्जी यांनीही अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला. एडुल्जी यांनी अध्यक्ष आणि उपाध्यक्ष अशा दोन्ही पदांसाठी उमेदवारी अर्ज भरला. भाजप आमदार प्रसाद लाड यांच्यासह उद्धव सेनेचे आमदार मिलिंद नार्वेकर आणि राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड व सूरज सामंत या विद्यमान एमसीए ॲपेक्स कौन्सिल सदस्यांसह मुंबई टी २० लीगचे अध्यक्ष विहंग सरनाईक, एमसीएचे माजी संयुक्त सचिव शाहआलम शेख आणि क्रिकेट प्रशासक सुनील रामचंद्रन यांनीही अध्यक्षपदासाठी अर्ज केला आहे. विविध पदांसाठी मोठ्या संख्येने अर्ज आल्याने एम सीएतील प्रमुख गटांमध्ये, विशेषतः राजकीय प्रभाव असलेल्या गटांमध्ये एकमताचा अभाव असल्याचे दिसून येत आहे.

### महाराष्ट्र रा.मार्ग परिवहन महामंडळ रायगड विभाग

# क्रिकेट संघाचे पोयनाड येथे निवड चाचणी शिबीर



**| पोयनाड | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ रायगड विभागाच्या क्रिकेट संघाचे पोयनाड येथील झुंझार युवक मंडळाच्या मैदानावर निवड चाचणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

रायगड विभागाच्या संघ निवड चाचणी शिबिराचे उद्‌घाटन रायगड जिल्हा राज्य परिवहन विभागाचे विभाग नियंत्रक सुहास चौरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी परिवहन महामंडळ रायगड विभागाचे कामगार अधिकारी सुहास कांबळे, परिवहन महामंडळ रायगड विभागीय कार्यशाळेचे प्रभारक रविंद्र तांडेल, रायगड विभाग पेण कार्यालयाचे लिपीक रुपेश चांदोरकर, वाहन परीक्षक दिलीप पालवणकर, झुंझार युवक मंडळ पोयनाडचे सचिव किशोर तावडे, क्रीडा प्रमुख नंदकिशोर चवरकर, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सदस्य ॲड.पंकज पंडित, संघ सिलेक्टर अभिषेक खातू, प्रितम पाटील यांच्या सह परिवहन महामंडळ रायगड विभागाचे ४० खेळाडू निवड चाचणी शिबिरासाठी उपस्थित होते.सदरच्या निवड चाचणी शिबिरा मधून रायगड जिल्ह्याचा क्रिकेट संघ निवडला जाणार असून निवड झालेला संघ महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धेसाठी १८ नोव्हेंबर पासून जळगाव येथे सहभागी होणार आहे.

# टॉम मूडी एलएसजीचे नवे जागतिक संचालक

**| लखनौ | वृत्तसंस्था |**

लखनऊ सुपर जायंट्सने ऑस्ट्रेलियाचे माजी अष्टपैलू खेळाडू टॉम मूडी यांना त्यांचे ग्लोबल डायरेक्टर ऑफ क्रिकेट म्हणून नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे.या भूमिकेत, मूडी आयपीएल संघाच्या लखनऊ संघाचेच नव्हे तर एसए २० लीगच्या डर्बन सुपर जायंट्स आणि इंग्लंडच्या द हंड्रेड लीगच्या मँचेस्टर युनायटेड संघाचेही पर्यवेक्षण करतील. ते संघाचे सध्याचे मुख्य प्रशिक्षक जस्टिन लँगर आणि अलीकडेच नियुक्त झालेले धोरणात्मक सल्लागार केन विल्यमसन यांच्याशी जवळून काम करतील.

## चांदीचा मुलामा दिलेले बॅट-स्टंप भेट

**| सुरत | वृत्तसंस्था |**

विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेला हरवून भारतीय महिला संघ पहिल्यांदाच विश्वविजेता बनला. या विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी, गुजरातमधील सुरत येथील एका ज्वेलर्स जोडप्याने महिला संघाला भेट म्हणून चांदीचा मुलामा असलेला बॅट आणि स्टंप सेट डिझाइन केला. दीपक चोक्सी म्हणाले, महिला क्रिकेट संघाने पहिल्यांदाच विश्वचषक जिंकला आहे ही देशासाठी खूप मोठी सन्मानाची गोष्ट आहे. जेव्हा आमचा संघ उपांत्य फेरीत होता, तेव्हा आम्ही ठरवले होते की जर संघ जिंकला तर आम्ही त्यांना आमचा आनंद एका अनोख्या पद्धतीने व्यक्त करू.

# यशस्वी जैस्वालने झळकावले शतक

**मुंबईचा पराभव टाळण्यासाठी ठोकला शड्डू**

**| मुंबई | प्रतिनिधी |**

भारत-दक्षिण आफ्रिका कसोटी मालिकेच्या तयारीसाठी रणजी करंडक स्पर्धेत खेळणाऱ्या यशस्वी जैस्वालने खणखणीत शतक झळकावले. मुंबईचा पहिला डाव २५४ धावांवर गुंडाळून राजस्थान संघाने पहिला डाव ६ बाद ६१७ धावांवर घोषित केला. दुसऱ्या डावात २६३ धावांची पिछाडी भरून काढण्याचे आव्हान मुंबई समोर आहे. राजस्थानच्या फलंदाजांनी मुंबईच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. तुषार देशपांडेने राजस्थानचा सलामीवीर अभिजीत तोमरला स्वस्तात बाद केले. त्यांतर सचिन याव व महिपाल लोमरोर यांनी दम दार खेळ केला. लोमरोर ४१ धावांवर झेलबाद झाला. सचिन ९२ धावांवर बाद झाला. दीपकने २४८ धावांची खेळी केली. कार्तिकनेही १३९ धावा केल्या आणि राजस्थानने ६ बाद ६१७ धावांवर डाव घोषित केला. दुसऱ्या डावात यशस्वी व मुशीर या दोघांनी १४९ धावा जोडल्या. मुशीर ६३ धावा केल्या. अजिंक्य रहाणे १८ धावांवर माघारी परतला. पण, यशस्वीने शतक झळकावले.

## तांडा चालला...



● आवास येथील श्री नागेश्वर यात्रेपासून अलिबाग तालुक्यातील यात्रांना सुरुवात होते. या यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे शेतकरी आपल्या बैलगाडी घेऊन या यात्रेला येत असतात. यामुळे मंगळवारी सकाळी अलिबाग ते आवास मार्गावरील रस्त्यावर बैलगाड्यांचा तांडा चालताना दिसत होता. (छायाचित्र : समीर मालोदे)

### टिम सेफर्ट वेस्ट इंडिजविरुद्धच्या

## टी-२० मालिकेतून बाहेर

**| वेलिंग्टन | वृत्तसंस्था |**

सोमवारी वेलिंग्टन फायरबर्ड्स विरुद्धच्या फोर्ड ट्रॉफी सामन्यात सेफर्ट नॉर्दर्न डिस्ट्रिक्ट्सकडून फलंदाजी करत असताना त्याच्या उजव्या हाताच्या बोटाला चेंडू लागला. वेदनांमुळे तो लगेचच रिटायर हर्ट झाला. नंतर एक्स-रेमध्ये फ्रॅक्चर झाल्याचे स्पष्ट झाले. न्यूझीलंडचे प्रशिक्षक रॉब वॉल्टर यांनी सेफर्टच्या दुखापतीबद्दल दुःख व्यक्त करताना म्हटले आहे की, टिमच्या दुखापतीमुळे आपण सर्वजण दुःखी आहोत. तो आमच्या टी-२० संघाचा एक महत्त्वाचा सदस्य आहे. पॉवरप्ले ओव्हर्समध्ये फलंदाजी आणि विकेटकीपिंगमध्ये त्याची भूमिका दोन्ही संघासाठी आवश्यक आहेत. त्याने अलिकडच्या मालिकांमध्ये उत्कृष्ट फॉर्म दाखवला आहे.




● भारतीय महिला संघाला जगजेत्ता करून घरी परतल्यावर अमोल मुझुमदार यांचे स्वागत करण्यात आले.

**आशियाई युवा क्रीडा स्पर्धेत फडकला तिरंगा | साठ किलो वजनीगटात पटकावले सुवर्णपदक**

# लोहगावचा सनी फुलमाळी ठरला गोल्डन बॉय



**| लोहगाव | वृत्तसंस्था |**

बहरीन येथे पार पडलेल्या आशियाई युवा क्रीडा स्पर्धेत लोहगावचा कुस्तीपटू सनी फुलमाळी याने कुस्ती स्पर्धेत साठ किलो वजनीगटात सुवर्णपदक पटकावले. त्याच्या या कामगिरीने केवळ आपल्या कुटुंबाचीच नव्हे, तर संपूर्ण देशाची मान त्याने अभिमानाने उंचावली आहे.

कष्ट, जिद्द आणि आत्मविश्वास यांची शिदोरी घेऊन लोहगावमधील १७ वर्षीय सनी फुलमाळी याने परिस्थितीवर मात करत इतिहास रचला आहे.

मुळ बीडचं असलेलं फुलमाळी कुटुंब उदरनिर्वाहाकरिता काही वर्षांपूर्वी लोहगावात आलं. येथे एका झोपडीवजा घरात राहू लागलं. झोपडीत राहणाऱ्या सनीच्या कुटुंबाची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे.

वडील नंदी बैल घेऊन गावोगावी भविष्य सांगण्याचे काम करतात, तर आई सुया-दाभण विकून संसाराचा गाडा ओढते. तरीही या परिस्थितीने सनीची स्वप्ने मरू दिली नाहीत.

लोहगाव येथील रायबा तालमीत वस्ताद सोमनाथ मोझे आणि सदाशिव राखपसरे यांच्या मार्गदर्शनातून त्याने कुस्तीचे धडे घेतले.

त्याची खेळाडू वृत्ती आणि अंग मेहनत पाहून त्याला लोणीकंद येथील जाणता राजा कुस्ती केंद्रात दाखल करण्यात आले.तेथे वस्ताद संदीप भोंडवे यांच्या मार्गदर्शनाखाली मेहनत घेऊन त्याने स्वत:ला तयार केले.

कष्ट आणि चिकाटीची गोष्ट सांगणारा सनी आज हजारो तरुणांसाठी जिवंत प्रेरणा बनला आहे. परिस्थिती कशीही असो, जर मनात जिद्द असेल तर स्वप्ने नक्कीच साकार होतात. हे त्याने सिद्ध करून दाखवले आहे.

सनी आता दहावीमध्ये शिक्षण घेत असून त्याचा हा झोपडीतून सुवर्णपदकापर्यंतचा प्रवास संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी ठरला आहे. त्याच्या या यशामुळे लोहगावसह पुणे जिल्हा अभिमानाने उजळला आहे. सर्वच स्तरातून त्याचे कौतुक होत आहे.

सनीला पुढील प्रशिक्षणासाठी शासनाने विशेष मदत व राष्ट्रीय स्तरावरील तयारीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिक करत आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)